ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का वा
क्र. १९९८

# मोक्ष-संदेश

## निस्पृह साधकांना बहुमोल मार्गदर्शन

IRBK-0108997

श्रीमत् प. प.
श्रीधरस्वामी महाराज
सज्जनगड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

IRBK-0108997
IRBK-0108997

# मोक्ष-संदेश

## निःस्पृह साधकांना बहुमोल मार्गदर्शन,

30,334
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

भगवान् श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

श्रीधरस्वामी महाराज

म. ग्रं. सं. ठाणे. सज्जनगडस्थ शाखा.
दा. क्र. ८९९५ नों दि. ............
वि. बा. वा. क्र. ...............



दीड रुपया

समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड

© श्रीधरकुटी प्रकाशन
सन १९६१

●

आवृत्ति पहिली
शके १८८२ : सन १९६१

●

लेखन :
सज्जनगड, पौष शु. २,
शके १८८२

●

**मूल्य दीड रुपया**

●

प्रकाशक :
**मा. भी. हिरळीकर,**
समर्थ सेवा मंडळाकरितां
१९० मंगळवार पेठ,
सातारा शहर

●

मुद्रक :
**ज. श्री. टिळक,**
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २

# प्रास्ताविक

'साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली ॥' भगवान् श्रीमत् प. प. श्रीधरस्वामी महाराज यांच्या चरणांपाशीं शेंकडों हजारों सांसारिक जसे ऐहिक दुःखशमनार्थ येतात तसेंच परमार्थमार्गावरील अनेक आर्त साधकहि मार्गदर्शनाच्या अपेक्षेनें येत असतात. अशा प्रत्येक आर्त साधकाला त्याच्या त्याच्या भूमिकेला अनुकूल असें मार्गदर्शन येथें लाभत असतेंच; तथापि सर्व साधकांना आणि विशेषतः निःस्पृह साधकांना कांहीं गोष्टी सांगण्याचें श्रीस्वामी महाराजांच्या मनांत बऱ्याच दिवसांपासून होतें. सांप्रत सज्जनगडावर श्रीस्वामी महाराजांचा एकान्तवास चालू असल्यामुळें नित्याची वाईगर्दी व वर्दळ येथें नाहीं. शिवाय गडावर त्यांच्याच प्रेरणेनें त्रयोदशाक्षारी रामनामाचें तेरा कोटींचें अनुष्ठानहि यथासांग पार पडलेलें आहे. यामुळें या संधीचा लाभ मिळून त्यांच्या हातून हा संदेशरूपी लहानसा ग्रंथ लिहून तयार झाला.

या ग्रंथांत श्रीस्वामी महाराजांनीं निःस्पृह साधकांना परमार्थमार्गावर वाटचाल करीत असतांना पाळावयाचीं कांहीं पथ्यें अगदीं परखडपणें सांगितलीं आहेत, हें तर खरेंच. पण त्याचबरोबर साधकांशीं इतकें ममतेनें, जिव्हाळ्यानें व सहानुभूतीनें एका परमोच्च पदावरील अधिकारी पुरुषानें हितगुज केलेलें अन्यत्र क्वचितच पहावयास मिळेल. श्रीस्वामी महाराजांच्या ठिकाणीं आपल्या शिष्य-भक्तांच्या बाबतींत पित्याची अधिकारवाणी आणि मातेची ममता ओतप्रोत भरलेली असते हें त्यांचें एक वैशिष्ट्यच म्हणावें लागेल.

निःस्पृह साधकांच्या दृष्टीनें तर हा ग्रंथ केवळ अनमोल आहे. या ग्रंथांत परमार्थमार्गावरील प्रवाश्यांना अनेक धोक्याच्या जागा दाखविलेल्या आहेत व सुप्त संकटांच्या सूचनाहि दिलेल्या आहेत. त्या धोक्याच्या जागा कशा टाळाव्यात आणि त्या संकटांवर मात कशी करावी याचें मार्गदर्शन तर अति अप्रतिम, सहज समजण्यासारखें सोपें, कोणतीहि शंका राहूं नये इतकें तपशीलवार आणि त्याप्रमाणें वागल्यास यशःप्राप्ति निश्चित होईल असें आत्मविश्वासपूर्वक आश्वासन देणारें आहे. हा मार्गदर्शक, हा पथप्रदर्शक येथें साधकांच्या साहाय्यासाठीं उभा आहे. निराशेनें मृतवत् झालेल्या निःस्पृहांना संजीवनी देणारी मात्राहि येथें सिद्ध केलेली आहे. आणि म्हणून इतकेंच सांगावयाचें आहे कीं, आतां 'येथें शब्द नाहीं गुरूसी । हें तों अनुसरणें शिष्यापाशीं ॥' परमार्थमार्गावरील शिष्य-साधकांना त्यांच्या यशोमंदिरापर्यंत पोहोंचण्यास हा ग्रंथ मार्गदर्शक होवो; हें पाथेय त्यांची तहानभूक भागवो हीच गुरुचरणीं प्रार्थना.

## यासाठीं हा लेखनप्रपंच

समाजाची एकंदरींत स्थिति बघून माझ्या हृदयावर आघातच झाला आहे. श्रीसमर्थांना स्मरून, फोफावलेल्या निषिद्ध कामाला विवेकाच्या फोफाट्यांत घालून जाळण्याचें सामर्थ्य येण्यासारख्या चार ओळी लिहून द्याव्यात, असें वाटलें. एकांतांत दोन वर्षें लिहिणें–वाचणें सर्व व्यवहार बंद ठेवून केवळ आत्मचिंतनांतच असावें असें मनांत योजिलें असलें तरी 'घार फिरत आकाशीं। तिचें लक्ष पिलांपाशीं।' अशासारखें होऊन, केलेला नियमहि अंशतः तरी पाळला जावा म्हणून 'मोक्षाचा पोवाडा' आणि मोक्षाचा हा 'संदेश' लेखणी हातांत न घेतां काडीनें लिहून पाठवीत आहें. 'आरे हें पाहिलेंच पाहावें। विवरलेंचि मागुतें विवरावें। वाचिलेंचि वाचावें। पुन्हा पुन्हा॥' (दा. ११–८–९) 'आवृत्तिरसकृदुपदेशात्' या ब्रह्मसूत्रांत म्हटल्याप्रमाणें अभ्यासावर, आनंदरूपावर आणि वैराग्यावर जास्ती भर देऊन त्याचा निश्चय व्हावा, म्हणून पुनः पुनः निरनिराळ्या रीतीनें तेंच तेंच अनेक वेळां लिहीत गेलों आहें. पुनरुक्ति न मानतां त्याचा उपयोग निश्चय करून घेण्याकडे करावा. मनांत आलेलें बाहेर टाकलें म्हणजे तें निवांत होतें, म्हणून केवळ कळकळीनें स्फुरलेले बोल मागेंपुढें न बघतां कागदावर उतरून पाठविले आहेत. 'एथें सांपडे एक। निश्चय ज्ञानाचा॥'

— श्रीधरस्वामी



भगवान् श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

श्रीधरस्वामी महाराज

मज्जनगड

॥ श्रीराम समर्थ ॥

# मोक्ष-संदेश

## ख-प्राप्ति : मार्ग व परिणाम

'यो वै भूमा तत्सुखम् ।' ( छांदोग्य उ. अ. ७–२३–१ )

विश्व ही एक सुखाची प्रयोगशाळा आहे. इथें जो प्रयत्न होतो, केवळ एका सुखप्राप्तीसाठींच. जगांतल्या सर्व लोकांचें एकच एक य कोणतें असेल तर तें सुखप्राप्ति हेंच होय, असें अगदीं ठळक क्षरांनीं लिहून दाखवितां येईल.

'यः कश्चित्सौख्यहेतोस्त्रिजगति यतते नैव दुःखस्य हेतोः ।' शंकराचार्य म्हणतात, 'हा तुमचा सिद्धान्त या लोकांपुरताच आहे, असें म्हांला वाटत असल्यास तसें नाहीं. तर तीन लोकांनीं उपलक्षित होणाऱ्या तुर्दशलोकात्मक साऱ्या ब्रह्मांडालाच लागू पडणारा तो आहे, हें अगदीं आहे.'

सुखाचें ध्येय एकच, तरी मार्ग दोन प्रकारचे आहेत : प्रवृत्ति णि निवृत्ति. या दोन मार्गांचें दोन प्रकारच्या नांवांचें सुख आहे : यिक सुख आणि आत्मीय सुख. या सुखांचीं विशेषणेंहि वेगवेगळीं हेत. देशकालवस्तुसापेक्ष, देहेंद्रियगम्य, क्षणभंगुर, भोगान्तीं वीट णणारें; प्राप्ति, भोग, रक्षण, नाश व भोगान्तीं असें सर्वकाळीं दुःख देणारें; सुख विसरवून आपलें वेड लावून आपल्या नादानें जन्माला कारण णारें; कधीं समाधान, शान्ति, तृप्ति न देणारें, हांव वाढविणारें, वेळीं मृत्यूसहि रण होणारें; रागद्वेष वाढविणारें, विवेक झांकून टाकणारें; धरबंध बाळ- ा नाहीं तर त्या माणसाची छीःथू करवून, त्यास दोषी ठरवून, रोगी

बनवून दंडास पात्र करणारें व अंतीं नरक देणारें; ज्या मन-इंद्रियांची ओढ याच्याकडे असते त्या मन-इंद्रियांनाच किळसवाणें होऊन नकोसें होणारें; देह-इंद्रियांची शक्ति आणि मनाची इच्छा जर असेल आणि त्या त्या वेळीं त्या त्या वस्तूची प्राप्ति होऊन देशकाल अनुकूल असतील तरच लाभणारें म्हणून केवळ अस्वतंत्र इत्यादि, हीं वैषयिक सुखाचीं विशेषणें आहेत.

आत्मसुखाचीं विशेषणें अगदीं याच्या विरुद्ध. वैषयिक सुखाच्या या प्रत्येक विशेषणाला कांहीं ठिकाणीं योग्य होईल त्याप्रमाणें निर्, अ किंवा न हीं निषेधार्थक अव्ययें जोडून, तर कांहीं ठिकाणीं काढून वाचलें म्हणजे हीं सर्व लक्षणें आत्मसुखाचीं होतात; तेव्हां तीं पुन्हा द्यावयाला नकोत. शेवटीं 'इत्यादि आत्मसुखाचीं विशेषणें आहेत' एवढें वाक्य जोडलें म्हणजे आत्मसुखाचीं विशेषणें समजून घेण्याचें काम आटोपलें. वाटल्यास शेवटीं 'नरक न देणारें' याऐवजीं 'मोक्ष देणारें' एवढें जोडल्यास हें एक वेगळें विशेषण होईल. या विषयसुखालाच संसारसुख असें म्हणतात आणि आत्मीय सुखाला मोक्षसुख असें म्हणतात. संसारसुखाकरितां जन्ममरण पत्करावें लागतें आणि याच्या उलट मोक्षसुखाकरितां जन्ममरणापासून सुटावें लागतें. यांपैकीं श्रेष्ठ कोणतें हें समजलें नाहीं तर श्रुतीला विचारूं या. 'यो वै भूमा तत्सुखम्।' तें अनंत अथवा अविनाशी, जें सर्वाधिक आहे तें सुख म्हणून समजा, असें श्रुतीचें सांगणें आहे. कोणालाहि हें समजतें. 'यदल्पं तन्मर्त्यम्।' ज्याला नाश असतो तें अल्पकालीन म्हणून अल्प असतें. 'नाल्पे सुखमस्ति।' अल्पांत सुख नसतें ( छां. उ. अ. ७—२३ ). सुख नसतें म्हणजे दुःख असतें हें स्पष्ट आहे.

'अल्पविद्यो महागर्वी' म्हणतात ना, त्याप्रमाणेंच हें अल्पसुख महागर्वाचें, याला फार मस्ती. मोठ्यांचा अपमान करून आपली शेखी मिर-

विण्याची दांडगी हांवहि अल्पांत असते; त्याप्रमाणेंच महान् सुख झांकून, त्याचा प्रचार न होऊं देतां, त्याच्यावर दोषारोप करून, हें अल्प वैषयिक सुख प्रपंचांत आपलीच शेखी मिरवीत सुटलें आहे. वाटमाऱ्याचा याचा धंदा. 'यत्तदग्रेऽमृतोपमं परिणामे विषमिव' असें याचें लक्षण. सुखाचें लक्षणच 'महान् असणारें तें सुख' असें झालें तर महान्‌विरुद्ध असणारें. अल्प. हें सुखाविरुद्ध असणारें म्हणजे दुःखरूपच हें सहज कळून येण्यासारखें आहे. वैषयिक सुखाला प्रेय व आत्मीय सुखाला श्रेय अशीं औपनिषदिक दुसरीं नांवें आहेत. स्पष्ट असतांनाहि न समजतां, आम्हीं यांपैकीं कोणतें सुख निवडून प्राप्त करून घ्यावें म्हणून श्रुतीला विचारलें असतां ती एवढेंच सांगते – 'तयोः श्रेय आददानस्य साधु भवति।' या दोहोंपैकीं श्रेयाची प्राप्ति करून घेणाऱ्याला खरें सुख लाभतें व त्याचें सर्वतोपरी कल्याण होतें. 'हीयतेऽर्थाद्य उ प्रेयो वृणीते।' आणि जो अदूरदर्शी प्रेयाची प्राप्ति करून घेतो, तो खऱ्या सुखाला आंचवतो. 'श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसो वृणीते।' बुद्धिमान् आपल्याला इष्ट होणारें श्रेय निवडून घेतो. 'प्रेयो मन्दो योग-क्षेमाद्वृणीते।' जो मंद बुद्धीचा असतो तो इंद्रियमनांची ओढ बघून, त्यांचा वेग सहन न होतां, तत्कालीन सुख देणारें प्रेय इच्छून तेंच निवडून घेतो ( कठ उ. अ. १–२. २ ). 'एतं वै तमात्मानं विदित्वा ब्राह्मणाः पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति॥' त्या त्या आपल्या आत्मरूपाला जाणून, यांत कांहीं अर्थ नाहीं म्हणून, दारा, पुत्र, द्रव्य, कीर्ति या सर्वांच्या इच्छेचा त्याग करून, विद्वान् ब्राह्मण भिक्षु होतात म्हणजे संन्यास घेतात ( बृ. उ. अ. ३ ब्रा. ५ ). यावरून काय तो निवाडा ज्यांचा त्यांनीं करून घ्यावयाचा आहे.

श्रुति-आजीचें सांगणें थोडें गूढ वाटल्यास आपल्या श्रीसमर्थ गुरु-माउलीला विचारूं. ते काय सांगतात तें कान लावून ऐकूं या. सांगण्यास

सुरुवात झाली : 'वैराग्यापरतें नाहीं भाग्य। वैराग्य नाहीं तें अभाग्य। वैराग्य नसतां योग्य। परमार्थ नव्हे ॥ (दा. १२-७-१७). वैराग्यें करावा त्याग। तरीच परमार्थयोग। प्रपंचत्यागें सर्व सांग। परमार्थ वडे ॥ (दा. १२-७-९). संसारसंगें सुख झालें। ऐसें देखिलें ना ऐकिलें। ऐसें जाणोन अनहित केलें। ते दुःखी होती स्वयें ॥ (दा. ५-३-१०१). संसारीं सुख मानिती। ते प्राणी मूढमती। जाणोन डोळे झांकिती। पढतमूर्ख ॥' (दा. ५-३-१०२). त्यांनींहि संसार केला नाहीं म्हणजे प्रेय निवडलें नाहीं. ते अर्थात् आपलें हित साधणाऱ्या बुद्धिमानांत बसतात आणि हित व्हावें म्हणून मातृहृदयानें खरें तें निक्षून निर्भीडपणें सांगतात. दुसरें एक त्यांचें असेंच वाक्य आहे. 'परम मूर्खांमाजी मूर्ख। जो संसारीं मानी सुख। या संसारदुःखा ऐसें दुःख। आणीक नाहीं ॥' (दा. २-१०-४०). हो! मनोबोधांतलाहि एक श्लोक आपल्याला आठवला नव्हे? कोणता तो? हं. बरोबर हाच : 'नव्हे सार संसार हा घोर आहे। मना सज्जना सत्य शोधूनि पाहें। जनीं वीष खातां पुढें सूख कैचें। करी रे मना ध्यान या राघवाचें' ॥ (म. बो. ६६)

'न संसारात्परो रिपुः' असें म्हणण्यांत आहे. संसार परमात्म्याचें सत्य रूप झांकून आपल्यांत गोवितो म्हणून हा शत्रु आहे. याच्या नादीं लागूं नये व याच्या नादीं लागून परमात्मसुखाला आंचवूं नये, हा या सर्व वाक्यांचा भावार्थ आहे. 'स्वानंदभावे परितुष्टिमन्तः संशान्तसर्वेन्द्रियतुष्टिमन्तः। अहर्निशं ब्रह्मणि ये रमन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ॥ त्यक्त्वैषणात्रयमवेक्षितमोक्षमार्गा भैक्षामृतेन परिकल्पितदेहयात्राः। ज्योतिः परात्परतरं परमात्मसंज्ञं धन्या द्विजा रहसि हृद्यवलोकयन्ति ॥ नासन्न सन्न सदसन्न महन्न चाणु न स्त्रीपुमान्न च नपूंसकमेकबीजम्। यैर्ब्रह्म तत्समनुपासितमेकचित्तैर्धन्या विरेजुरितरे भवपाशबद्धाः ॥' अशा रीतीनें श्रीमत् शंकराचार्यांनींहि ज्ञानशील विरक्तांना पोट भरून धन्यवाद दिले आहेत.

मृगजळांत सूर्यप्रकाशाप्रमाणें विश्वाच्या आभासांत एक केवळ परमात्मस्वरूपाच्या निव्वळ जाणीवरूप असणाऱ्या आनंदालाच निवडून तादात्म्यानें मनुष्यजन्माचें सार्थक आपल्याला करावयाचें आहे. ' निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य। यास बोलिजे नित्यानित्य। विचारणा ॥ ( दा. १३-६-१५ ). सारीं भासे असार। आणि असारीं भासे सार। सारासारविचार। शोधून पाहावा ॥ ( दा. १३-६-१६ ). नाना सुखें देवें केलीं। लोकें तयास चुकलीं। ऐसीं चुकतांच गेलीं। जन्मवरी ॥ ( दा. १३-७-२२ ). सर्व सांडून शोधा मजला। ऐसें देवचि बोलिला। लोकीं शब्द अमान्य केला। भगवंताचा ॥ २३ ॥ म्हणोन नाना दुःखें भोगिती। सर्वकाळ कष्टी होती। मनीं सुखचि इच्छिती। परी तें कैचें ॥ २४ ॥ उदंड सुख जया लागलें। वेडें तयास चुकलें। सुख सुख म्हणतांच मेलें। दुःख भोगितां ॥ २५ ॥ शाहाण्यानें ऐसें न करावें। सुख होये तेंचि करावें। देवासी धुंडीत जावें। ब्रह्मांडापरतें ॥ २६ ॥ विवेकाचें फळ तें सुख। अविवेकाचें फळ तें दुःख। यांत मानेल तें आवश्यक। केलें पाहिजे ॥ २८ ॥

विश्वांतील म्हणजे जगांतील पदार्थांपासून लाभणारें सुख प्राप्त करून घ्यावयाचें झाल्यासहि परिश्रमाचें दुःख सहन करावें लागतें. भोगतांनाहि श्रम होतातच. भोगून झाल्यानंतरहि थकवा आणि वीट येतोच. त्यामुळें विश्वाला म्हणजे विश्वांतील जीवांना आकारयुक्त प्राणिपदार्थांपासून लाभणारें सुख असार म्हणजे खरें असुख = दुःखरूप आहे. ' साकार अशा आपल्याहून भिन्न असणाऱ्या प्रत्येक बाह्य प्राणिपदार्थांपासून लाभणारें सारें दुःख ' असें दुःखाचें लक्षण अनुभवसिद्ध झालें म्हणजे या लक्षणाहून विरुद्ध वेगळें निराकार, आपल्याहून अभिन्न, देहाच्या आंत असणारें व कोणत्याहि आपल्याहून भिन्न प्राणिपदार्थांपासून न लाभणारेंच सुख असें सुखाचें लक्षण होतें व ' सुखं स्यादात्मनो रूपम्। '

आपणच बाह्य प्राणिपदार्थांच्या विरुद्ध लक्षणाचे अवीट आणि त्रिकालींहि म्हणजे प्राप्ति, भोग आणि भोगांतींहि सारखेच असणार अविनाशी, अद्वितीय, ( ब्रह्मरूपाचींहि हींच लक्षणें असल्यामुळें ) ब्रह्मरूप आहों, सुखरूप आहों, हें आपोआपच सिद्ध होतें. ' आनंदात्मा प्रियो ह्यात्मा । ' आत्मरूपच आनंदघन आहे आणि तें तसें असल्यामुळेंच प्रत्येकाचें सर्वांपेक्षां स्वतःवरच अधिक प्रेम असतें, असें सांगून पुढें सुखाकरितां कुणीकडे न बघतां, ' तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुञ्चथामृतस्यैष सेतुः । ' ( मुं. उ. २-२-५ ). सर्वप्रथम तुमच्या अद्वितीय आत्मरूपाची जाणीव करून घ्या, दुसरी भाषाच सोडा. आत्मज्ञान हें संसारमहासागराचा सेतु आहे.

आपण कोण याचा विचार गुरुमुखानें करून निजरूपाचीच जाणीव करून घ्या. तुमचें मूळ शुद्ध रूपच, तें जगाचें मुख्य मूळकारण परब्रह्मच, नित्य निरुपाधिक निरतिशय सुख आहे, असें श्रुति सांगते. ' सद्गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं । अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहात चि गेले ॥ ( दा. ५-१-२१ ). ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें । म्हणौनि सद्गुरूचीं पाउलें । सदृढ धरावीं ॥ २२ ॥ करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास । रिद्धि सिद्धि सावकास । वोळल्या जरी ॥ ३३ ॥ तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित । यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ३४ ॥ गर्भवास अति सांकडी । इच्छाबंधनाची बेडी । ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्गुरु स्वामी ॥ ( दा. ५-२-१४ ). जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियेंदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ २२ ॥ जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारें निरसी । जीवात्मया परमात्मयासी । ऐक्यता करी ॥ ( दा. ५-२-९ ). संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी । वेदविरहित टवाळी । करूंच नेणे ॥ १९ ॥ जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणि स्थूळ क्रियेचें साधन । तो चि

सद्‌गुरु निधान। दाखवी डोळां॥ २८॥ मुख्य सद्‌गुरूचें लक्षण। आधीं पाहिजे विमळ ज्ञान। निश्चयाचें समाधान। स्वरूपस्थिती॥ ४५॥ ज्ञान वैराग्य आणि भजन। स्वधर्मकर्म आणि साधन। कथा निरूपण श्रवण मनन। नीति न्याये मर्यादा॥ ५२॥ यामधें एक उणें असे। तेणें तें विलक्षण दिसे। म्हणौन सर्व हि विलसे। सद्‌गुरुपासीं॥ ५३॥' हीं श्रीसमर्थांचीं वचनें वाचीत असतां 'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्।' (मुं.उ. १–२–१२) 'आचार्याद्धयेव विद्या विदिता साधिष्ठं प्रापतीति।' (छां. उ. अ. ४–९) 'यो मा एतदक्षरं गार्ग्यविदित्वाऽस्मिँल्लोके जुहोति यजते तपस्तप्यते बहूनि वर्षसहस्राण्यन्तवदेवास्य तद्भवति।' (बृ. उ. अ. ३–८–१०) इत्यादि उपनिषद्वाक्यें विद्वानांना आठवतील. या दृष्टीनें ज्याला सर्व प्रकारेंहि दैवी संपत्तीनें थोर, श्रेष्ठ असणारा, श्रोत्रिय म्हणजे वेदवेत्ता ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ गुरु लाभतो. त्याच्या कृपेनें हा विश्वाचें सारभूत सुख असणारें ब्रह्मरूपच तो होतो. तोच एक गुरुशरण नर या जगांत खरोखर धन्य आहे. श्रीसमर्थांच्या शब्दांत 'तो परमात्मा केवळ। तयास नाहीं मायामळ। अखंड हेतूचा विटाळ। जालाच नाहीं॥' (दा. ९–३–२२).

## ज्ञानविज्ञानसंपन्न निवृत्तिमार्ग

आतांपर्यंत झालेलें विवेचन हेंच श्रीसमर्थांच्या पुढील वचनांचें तात्पर्य आहे. मननाकरितां कांहीं वचनें देतों 'पदार्थ चांगले दिसती। परि ते सर्वेचि नासती। (याचा अर्थ : लगेच भोगान्तीं वीट आणतात आणि दुःख देऊन नकोसे होतात.) अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती। लोक तेणें॥' (दा. १७–३–२२). धड आत्मसुखहि नाहीं आणि विषयसुखहि नाहीं, अशी विषयसुखाच्या पाठीमागें लागलेल्यांची स्थिति होते, असें याचें तात्पर्य आहे. 'या कारणें पदार्थज्ञान।' (पदार्थापासून सुख

लाभतें हें ज्ञान ) नाना जिनसीचा अनुमान। ( या एका पदार्थापासून नाहीं मिळालें म्हणून काय झालें, जगांत अनेक पदार्थ अनेक प्रकारचे आहेत, त्यांच्यापासून सुख मिळेल असा तर्क ) सर्व सांडून निरंजन। धुंडीत जावें॥ ( दा. १७–३–२३ ) सर्व सोडून निरंजन – निरुपाधिक स्वतःसिद्ध आत्मसुख शोधावें. ' असार म्हणिजे नासिवंत। सार म्हणिजे तें शाश्वत।' ( दा. १४–९–५ ) दिसेल तें नासेल। आणि येईल तें जाईल। जें असतचि असेल। तेंचि सार॥ ( दा. १३–२–२ ). देह देऊळ आत्मा देव। कोठें धरूं पाहातां भाव। देव वोळखोन जीव। तेथेंचि लावावा॥' ( दा. १४–८–२९ ) 'वदन्ति तत्तत्त्वविदस्तत्त्वं यज्ज्ञानमद्वयम्। ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते।' ( भाग. १–२–११ ). 'सोहं हंसा तत्त्वमसि। तें ब्रह्म तूं आहेसी। विचार पाहातां स्थिति ऐसी। सहजचि होते॥' ( दा. १३–२–२० ) 'खोटें सांडून खरें घ्यावें। तरीच परीक्षवंत म्हणावें। असार सांडून सार घ्यावें। परब्रह्म तें॥' ( दा. १३–२–२७ ) 'सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप। ( या नांवांनीं द्योतित होणारें सर्व कांहीं ) सस्वरूप म्हणिजे आपलें रूप। ( प्राप्त करून घेतलेल्या ब्रह्मस्वरूपासहित मी आहें, असें वाटल्यास, तसें म्हटल्यास, त्याच्यासहित असावयाला तें वेगळें नसून स्वरूपच असल्यामुळें या अनुभवांत अथवा अशा म्हणण्यांत आपलाच एक अनुभव व्यक्त होतो. 'सांगणें, अनुभविणें' या भाषेंत स्वमात्र निर्विकल्प स्थितीचें मौनच व्यक्त होतें. ) आपलें रूप म्हणिजे अरूप। तत्त्वनिर्शना उपरी॥' ( दा. १३–२–३० ) आपण ब्रह्मरूप आहों म्हणण्यांत ब्रह्म निराकार असल्यामुळें कोणत्याहि विशिष्ट रूपाचा बोध होत नसुन, ' मी ब्रह्मरूप आहें ' या वाक्यांतल्या 'रूप' या शब्दाला कांहीं अर्थच ऱ्हात नाहीं. नामरूपात्मक सर्व कार्यजाताचा निरास करून, आपण ब्रह्म आहों असें प्रत्ययाला आल्यामुळें, आपलें रूप अरूप म्हणजे निराकार

आनंदमात्र होतें. ' ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण । ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ॥ ( दा. ९–२–२९ ) निर्गुणासी नाहीं जन्ममरण । निर्गुणासी नाहीं पापपुण्य । निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाला ॥ ( दा. ६–३–३३ ) जालियां तत्त्वाचें निर्शन । निर्गुण आत्मा तोचि आपण । कां दाखवावें मीपण । तत्त्वनिर्शना उपरी ॥ ( दा. ६–३–३० ) आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधितां नुरे जाण । मीपण गेलिया निर्गुण । आत्मा स्वयें ॥ ( दा. ६–३–२९ ) मीपण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें । समाधान तें पावावें । निःसंगपणें ॥ ' ( दा. ७–७–५२ ) ही ओवी एकच, साधकाला पुरे होईलशी आहे. हींत सिद्धान्त, साधन, सिद्धावस्था सर्वांचाच अन्तर्भाव झाला आहे.

याच समासांत अभ्यासूकरितां अजून दोन ओव्या नमूद करण्यासारख्या आहेत; त्याहि येथें देतों. मीपणत्यागाचा अभ्यास – ' निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पितें आपण न व्हावें । मीपणासि त्यागावें । येणें रीतीं ॥ ( दा. ७–७–५६ ) जयासी आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें । येथें कल्पनेच्या नांवें । सून्य आलें ॥ ' ( दा. ७–७–५८ ) निर्विकल्पाचा अभ्यास करणाऱ्याला ही ओवी जीव कीं प्राण होईल. समाधानाची गुरुकिल्ली – ' वृत्तिरहित जें ज्ञान । तें चि पूर्ण समाधान । जेथ तुटे अनुसंधान । मायाब्रह्मींचें ॥ ( दा. ७–५–१४ ) जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर । तें अनुभवितां साचार । द्वैत कैचें ॥ ' ( दा. ७–५–१६ ) अद्वैत सिद्धान्त कसा ठसतो या ओवीनें ! शंकेला इथें वावच ठेवला नाहीं. कल्पनेचें थैमान आणि संशयाचा कल्लोळ या ओवीनें अगदीं बंद पडतो; नाहीं तर या कल्पनेचें लक्षण म्हणजे ' क्षणा येकातें उमजे । क्षणा येकातें निर्बुजे । ( काय सांगावें ) नाना विकार करिजे । ते कल्पना जाणावी ॥ ( दा. ७–५–२३ ) म्हणौन सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाच केवळ । इचें

केलियां निर्मूळ। ब्रह्मप्राप्ती ॥ ( ७–५–२६ ) कल्पनेसी मिथ्यत्व आलें। सहजचि तद्रूप जालें। आत्मनिश्चयें नासिलें। कल्पनेसी॥' ( दा. ७–५–४० ) मी केवळ आनंदघन ब्रह्मरूप आहें, ही कल्पना विरून स्थिरावलेला निर्विकल्प आनंदच्च खरोखर आपण आहोंत, असें ही ओवी आम्हांस सांगत आहे. कुटिल कल्पनेच्या मायावी जाळ्यांत आपण सांपडूं नये म्हणून रात्रंदिवस प्रयत्न करीत असतांना निराशेची छटा मुद्रेवर येऊन काळवंडलेल्या कोणत्या बिचाऱ्या साधकाची या ओव्या पाहून हर्षानें कळी उमलणार नाहीं ?

सर्व हें भासणारें जग म्हणजे केवळ कल्पनेचें रान माजलें आहे. काल्पनिकाला खरें अस्तित्व नसतें. 'पुढें ब्रह्मयानें सृष्टी कल्पिली। इच्छेसरिसी सृष्टी जाली।' ( दा. १०–४–३० ) 'नाना प्रकारींचे प्राणी कल्पिले। इच्छेसरिसे निर्माण जाले।' ( दा. १०–४–३२ ) 'धाता यथा पूर्वमकल्पयत्।' या श्रुतीचें विवरणच्च श्रीसमर्थांनीं इथें दिलें आहे. कल्पना आपल्या अर्थानें इथून तिथून एकच. कल्पना म्हणजेच्च माया. 'माया आपुली कल्पना' या आपल्या कल्पनेला 'अहं ब्रह्म ऐसें स्फुरलें। तें चि माया।' इथून प्रारंभ होऊन त्यांच्या त्यांच्या अंतःकरणवृत्तीच्या थैमानासकट स्त्रीपुरुषांच्या देहापर्यंत ती येऊन पोहोंचली आहे. 'सकळ सृष्टि विस्तारली। तितुकी माया।' हें जाणून हा कल्पनेचा प्रान्त ओलांडून, 'अहं ब्रह्मास्मि' स्फुरणहि नसतांना निर्विकल्प, स्वप्रकाश, चिन्मात्र असे एक केवळ आनंदच्च होऊन आपण राहिलों, तर आपण कोण हें ओळखून असल्यासारखें झालें. 'माया सृष्टीची रचना।' इथें नुसती साखर पेरली आहे. 'नाना रूप नाना रंग। तितुका मायेचा प्रसंग। माया भंगे ब्रह्म अभंग। जैसें तैसें ॥' ( दा. ६–५–२२ ). 'सर्वं विकारजातं मायामात्रम्।' 'सकळ माया विस्तारली। ब्रह्मस्थिती अच्छयादली। परी ते निवडून घेतली। साधुजनीं॥ ( ६–५–११ ) गोंडाळ सांडूनि नीर घेइजे।

नीर सांडूनि क्षीर सेविजे । माया सांडूनि अनुभविजे । ब्रह्म तैसें ॥' ( दा. ६–५–१२ ) ' माया जैसें मृगजळ । ऐसें बोलती सकळ । कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलें चि ॥ ( दा. ७–३–३६ ) आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें । मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८ ॥' ' मायाकार्यादिकं नास्ति नास्ति माया भयं न हि । परं ब्रह्माहमस्मीति स्मरणस्य मनो न हि ॥' आपण सदोदित निर्विकल्प, अद्वितीय, केवलज्ञानरूप असणारा आनंद आहों, हें जाणून अखिल कल्पना नष्ट करणें हें मोक्षाचें साधन आहे. ' या मा सा माया ' – या कल्पनेच्या मायाबाजारांतला कोणताहि सौदा खरा नव्हे. ' निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें । मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥' ( दा. ७–३–४९ ).

' शान्तं उपासीत ।' – कसलीहि खळबळ उरूं न देतां शान्त स्वरूपाची उपासना करा. ' आत्मसिंहासने स्थित्वा न किंचिदपि चिंतय । निर्विकल्पे स्थिरो भव ।' निर्विकल्प अशा आत्मसिंहासनावर स्थिर रहा. आनंदरूप असणाऱ्या आत्मसिंहासनावर आरूढ होऊन कसलीहि कल्पना, कसलेंहि चिंतन करूं नको, म्हणून उपनिषदांचें सांगणें आहे. जीवन्मुक्ताचें लक्षण सांगतांना उपनिषत् – ' चैत्यवर्जितचिन्मात्रे पदे परमपावने । अक्षुब्धचित्तो विश्रान्तः स जीवन्मुक्त उच्यते ॥' – ज्ञेयशून्य, परमपावन, ज्ञानमात्र स्थितींत कसलाहि क्षोभ नसतांना जो शान्तपणें विश्रांति घेत असतो तो जीवन्मुक्त म्हणून सांगतें. ' देह-बुद्धीच्या अंतीं । सकळासि एकचि प्राप्ती । येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ॥ ( दा. ७–२–३० ) साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले । अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ॥ ३१ ॥' अशा ज्ञान्यांनीं, ' आधीं दृश्य सोडिलें । मग सून्यत्व वोलांडिलें । ( अहं ब्रह्मास्मि ) मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ॥' ( दा. ८–१०–७० ). हें सर्व लक्षांत आणून साधनाचा क्रम साधकांनीं आंखावा. या अहं-

ब्रह्मास्मिरूप मूळ मायेच्या परतें, पलीकडे पाहण्याचा, केवळ आनंदरूप ब्रह्म होऊन राहण्याचा निवृत्तिमार्ग आहे. अहं ब्रह्मास्मिरूप मायेच्या पुढचा सर्व मायाबाजार – प्रवृत्ति. या प्रवृत्तीचा त्याग ही निवृत्ति. असा हा ज्ञानवैराग्यसंपन्न निवृत्तिमार्ग आहे. 'येक परब्रह्म संचलें। कदापी नाहीं विकारलें। त्यावेगळें भासलें। तें भ्रमरूप॥ ( दा. १०–६–९ ) भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथें काये म्हणोन सांगावें। निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें। भ्रमरूप॥ ३६॥ अभ्यासाचा मुगुटमणी। वृत्ती राहावी निर्गुणीं। संतसंगें निरूपणीं। स्थिति बाणे॥' ( दा. ८–९–२१ )

## खरा पंडित कोण ?

'यच्चित्तस्तन्मयो भवति।' या उपनिषद्वाक्याप्रमाणें 'जो जयास ध्याईल। तो तद्रूपचि॥' असें श्रीसमर्थांनींहि सांगितलें आहे. या तत्त्वदृष्टीनें 'निश्चळ परब्रह्म येक।' हें ओळखून निःस्पृहांनीं वागावें. 'जो निश्चळास ध्याईल। तो निश्चळचि।' वृत्तीचें चांचल्य येथें नाहीं. मीपणाचा उद्गमहि येथें नाहीं. उत्पन्न झालेलेंच दृश्य. पिंडब्रह्मांडाच्या या सर्वप्रथम उत्पन्न होणाऱ्या 'मी' या अनुभवापासून याला गोचर होणारें अखिल दृश्य चित्तांतून काढून, निश्चल आनंदच एक उरवावयाचा आहे. ही निवृत्तिरूप मोक्षमार्गाची दिशा आहे. इथपर्यंत आपली झेप पोहोंचली पाहिजे. हें ओळखून घेतलेली झेप मध्येंच कोठें न पडेल असें आपल्या देहाला आवरून, निःस्पृहांनीं तर मोठ्या हुरूपानें अहर्निश पुढें पुढेंच जात असावें. प्रापंचिकांना सर्व सांभाळून साधावें लागतें. निःस्पृहांना कसलीच उपाधि नसल्यामुळें 'सुप्तेरुत्थाय सुप्त्यन्तं ब्रह्मैकं प्रविचिन्त्यताम्। दद्यान्नावसरः किंचित्कामादीनामनागपि।' झोपून उठल्यापासून तों झोपेनें कोलमडून पडेपर्यंत अधोवृत्तीचा उद्गमच न होऊं देतां, निश्चळ चिन्मात्र आनंदाशीं तादात्म्यानें रहाण्याचा सतत

अभ्यास चालू ठेवावा. 'निद्राया लोकवार्तायाः कामादेरात्मविस्मृतेः। क्वचिन्नावसरं दत्त्वा चिंतयात्मानमात्मनि।' निद्रा, नसती उठाठेव, लोक-निंदा-स्तुति, आत्मविस्मृतीला कारण होणारे कोणतेहि कामादि विकार यांना वावच मिळूं न देतां, मीपणाच्या भानांत एक ज्ञेयशून्य आनंदाची नित्यज्ञानरूपता निश्चल अशी उरवावी, अखंड ध्यानमग्न असावें. 'अरे जें जालेंचि नाहीं। त्याची वार्ता पुससी काई।' ( दा. ८–३–१ ) या वाक्याचा अर्थ हृदयाशीं बाळगून, अंतःस्थितीची बैठक न ढळूं देतां वागावें. नामरूपात्मक कोणत्याहि प्राणिपदार्थावर प्रेम बाळगूं नये. प्रेमाच्या तसें द्वेषाच्या वस्तूचेंहि तसेंच ध्यान जडतें आणि ब्रह्मस्वरूपाचें ध्यान सुटतें, म्हणून रागद्वेषशून्य व्हावें, असें जिथें तिथें सांगण्यांत येतें.

कांहीं नको म्हणून घरदार, जमीनजुमला, आईबाप, बंधुभगिनी. इष्टमित्र सोडून आलेल्या निःस्पृह साधकांना कोणाशीं काय करावयाचें ? 'कोणी निंदा कोणी वंदा। आमुचा स्वहिताचा हा धंदा॥' असें निःस्पृहानें मानून नेटानें साधन करावें. ना कोणाचा द्वेष, ना कोणाचें प्रेम, असें निःस्पृहानें रहावें. सर्व सोडून अरण्यांत राहिलेल्या चक्रवर्ती भरत-भूपाळाला एका हरिणीच्या पिलाच्या मोहानें काय झालें तें आठवावें. परमार्थ, निवृत्तिमार्ग म्हणजे दोन्हीकडे पाताळ असलेल्या डोंगराच्या माथ्यावरून जाण्यासारखें आहे. फार तोल सांभाळावा लागतो. इकडे तिकडे बघितलें तर डोकें फिरून पाताळांत पडेन म्हणून रोख धरून. इकडे तिकडे न बघतां सरळ जावयाचें आहे. तिरसटपणा आणि लोचट-पणा दोन्ही नसावेत. 'जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यताम्।' असें श्रीशंकराचार्य उपदेशीत आहेत. जनकृपा आणि जननैष्ठुर्य दोन्ही नकोत. दोन्हींचा त्याग करावा. आपलीच कल्पना आपल्याला बाधक असते. शुकाला मोह पाडण्याकरितां रंभेनें देखील प्रयत्न केले नसतील, तितके प्रयत्न आपलीच कल्पना आपल्याला खालीं ओढण्याकरितां करीत असते. ती ती कल्पना

ब्रह्मास्मिरूप मूळ मायेच्या परतें, पलीकडे पाहण्याचा, केवळ आनंदरूप ब्रह्म होऊन राहण्याचा निवृत्तिमार्ग आहे. अहं ब्रह्मास्मिरूप मायेच्या पुढचा सर्व मायाबाजार – प्रवृत्ति. या प्रवृत्तीचा त्याग ही निवृत्ति. असा हा ज्ञानवैराग्यसंपन्न निवृत्तिमार्ग आहे. 'येक परब्रह्म संचलें। कदापी नाहीं विकारलें। त्यावेगळें भासलें। तें भ्रमरूप॥ (दा. १०–६–९) भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथें काये म्हणोन सांगावें। निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें। भ्रमरूप॥ ३६॥ अभ्यासाचा मुगुटमणी। वृत्ती राहावी निर्गुणीं। संतसंगें निरूपणीं। स्थिति बाणे॥' (दा. ८–९–२१)

## खरा पंडित कोण ?

'यच्चित्तस्तन्मयो भवति।' या उपनिषद्वाक्याप्रमाणें 'जो जयास ध्याईल। तो तद्रूपचि॥' असें श्रीसमर्थांनींहि सांगितलें आहे. या तत्त्वदृष्टीनें 'निश्चळ परब्रह्म येक।' हें ओळखून निःस्पृहांनीं वागावें. 'जो निश्चळास ध्याईल। तो निश्चळचि।' वृत्तीचें चांचल्य येथें नाहीं. मीपणाचा उद्गमहि येथें नाहीं. उत्पन्न झालेलेंच दृश्य. पिंडब्रह्मांडाच्या या सर्वप्रथम उत्पन्न होणाऱ्या 'मी' या अनुभवापासून याला गोचर होणारें अखिल दृश्य चित्तांतून काढून, निश्चल आनंदच एक उरवावयाचा आहे. ही निवृत्तिरूप मोक्षमार्गाची दिशा आहे. इथपर्यंत आपली झेप पोहोंचली पाहिजे. हें ओळखून घेतलेली झेप मध्येंच कोठें न पडेल असें आपल्या देहाला आवरून, निःस्पृहांनीं तर मोठ्या हुरूपानें अहर्निश पुढें पुढेंच जात असावें. प्रापंचिकांना सर्व सांभाळून साधावें लागतें. निःस्पृहांना कसलीच उपाधि नसल्यामुळें 'सुप्तेरुत्थाय सुप्त्यन्तं ब्रह्मैकं प्रविचिन्त्यताम्। दद्यान्नावसरः किंचित्कामादीनामनागपि।' झोपून उठल्यापासून तों झोपेनें कोलमडून पडेपर्यंत अधोवृत्तीचा उद्गमच न होऊं देतां, निश्चळ चिन्मात्र आनंदाशीं तादात्म्यानें रहाण्याचा सतत

अभ्यास चालू ठेवावा. 'निद्राया लोकवार्तायाः कामादेरात्मविस्मृतेः। क्वचिन्नावसरं दत्त्वा चिंतयात्मानमात्मनि।' निद्रा, नसती उठाठेव, लोकनिंदा-स्तुति, आत्मविस्मृतीला कारण होणारे कोणतेहि कामादि विकार यांना वावच मिळूं न देतां, मीपणाच्या भानांत एक ज्ञेयशून्य आनंदाची नित्यज्ञानरूपता निश्चल अशी ठरवावी, अखंड ध्यानमग्न असावें. 'अरे जें जालेंचि नाहीं। त्याची वार्ता पुससी काई।' (दा. ८-३-१) या वाक्याचा अर्थ हृदयाशीं बाळगून, अंतःस्थितीची बैठक न ढळूं देतां वागावें. नामरूपात्मक कोणत्याहि प्राणिपदार्थावर प्रेम बाळगूं नये. प्रेमाच्या तसें द्वेषाच्या वस्तूचेंहि तसेंच ध्यान जडतें आणि ब्रह्मस्वरूपाचें ध्यान सुटतें, म्हणून रागद्वेषशून्य व्हावें, असें जिथें तिथें सांगण्यांत येतें.

कांहीं नको म्हणून घरदार, जमीनजुमला, आईबाप, बंधुभगिनी, इष्टमित्र सोडून आलेल्या निःस्पृह साधकांना कोणाशीं काय करावयाचें ? 'कोणी निंदा कोणी वंदा। आमुचा स्वहिताचा हा धंदा॥' असें निःस्पृहानें मानून नेटानें साधन करावें. ना कोणाचा द्वेष, ना कोणाचें प्रेम, असें निःस्पृहानें रहावें. सर्व सोडून अरण्यांत राहिलेल्या चक्रवर्ती भरतभूपाळाला एका हरिणीच्या पिलाच्या मोहानें काय झालें तें आठवावें. परमार्थ, निवृत्तिमार्ग म्हणजे दोन्हीकडे पाताळ असलेल्या डोंगराच्या माथ्यावरून जाण्यासारखें आहे. फार तोल सांभाळावा लागतो. इकडे तिकडे बघितलें तर डोकें फिरून पाताळांत पडेन म्हणून रोख धरून, इकडे तिकडे न बघतां सरळ जावयाचें आहे. तिरसटपणा आणि लोचटपणा दोन्ही नसावेत. 'जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यताम्।' असें श्रीशंकराचार्य उपदेशीत आहेत. जनकृपा आणि जननैष्ठुर्य दोन्ही नकोत. दोन्हींचा त्याग करावा. आपलीच कल्पना आपल्याला बाधक असते. शुकाला मोह पाडण्याकरितां रंभेनें देखील प्रयत्न केले नसतील, तितके प्रयत्न आपलीच कल्पना आपल्याला खालीं ओढण्याकरितां करीत असते. ती ती कल्पना

आल्याशिवाय कसलाहि परिणाम होत नाहीं, हें लक्षांत ठेवावें. खलाश्याचें आपल्या दिशेकडे जसें लक्ष्य असतें, तसें परमार्थाकडे साधकांनीं लक्ष्य ठेवावें. परमार्थाची दिशा सोडून या भवसागरांत कोणी वागूं नये. ‘ तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी । लावी ऐक्यतेची समाधी । या नांव साधक ॥ ’ ( दा. ५–९–१० ) साधकांनीं दासबोधाच्या ५ व्या दशकाचा ९ वा साधकलक्षणाचा समास पाठ करून रोज म्हणावा, म्हणजे जागृति राहील.

गृहस्थांनीं जनकाचें व निःस्पृहांनीं शुकाचें उदाहरण डोळ्यांपुढून ढळूंच देऊं नये. कितीहि भोग भोगले तरी अतृप्ति वाढतच जाते आणि शेवटीं त्यांचा त्याग केल्याशिवाय सुख, शांति व समाधान लाभत नाहीं, हें ययाती राजाच्या उदाहरणावरून गृहस्थांनीं समजावें व मनाला आवरावें. निःस्पृहांचा तर तो मार्गच नव्हे, म्हणून त्या मार्गाचें कोणतेंहि दृश्य मुळीं डोळ्यांपुढें येतच नाहीं आणि येऊं नये. श्रीसमर्थांच्या या ओव्या सर्वांनीं लक्षांत ठेवाव्या : ‘ देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे । देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ॥ ( दा. ८–८–२८ ) सोहं आत्मा स्वानंद-घन । अजन्मा तो तूंचि जाण । हें चि साधूचें वचन । सदृढ धरावें ॥ ३३ ॥ महावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर । ऐसिया वचनाचा विसर । पडोंचि नये ॥ ३४ ॥ देखतां मृगजळाचे पूर । म्हणे कैसा पावों पैलपार । कळतां तर्थीचा विचार । सांकडें कैचें ॥ ४५ ॥ तथापी माया कल्पनेसी दिसे । आपण कल्पनेतीत असे । तेथें उद्वेग काइसें । निर्विकल्पासी ॥ ४७ ॥ दृश्य पदार्थ वोसरतां । आवघा आत्माचि तत्त्वता। नेहटून विचारें पहातां । दृश्य मुळींच नाहीं ॥ ५५ ॥ ’ ‘ दृश्यरूपं च दृग्रूपं सर्वं शशविषाणवत् । नोत्पन्नं नो स्थितं जगत् । ’ दृश्य आणि त्याची ती दृष्टि सशाच्या शिंगाप्रमाणें खरो-खरच नाहीं. ‘ न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपो वर्तते अविनाशित्वात् । ’— नित्य निर्लेप, नित्य अविकारी, अविनाशी, नित्य बोधरूप आत्म्याची निजस्थिति

कधींच ढळूं शकत नाहीं. जग उत्पन्न झालेंहि नाहीं आणि नाहींहि, असें जें श्रुतीचें सांगणें आहे, तें इथें तंतोतंत जुळतें.

'अविचार आणि विचार। जैसा प्रकाश अंधकार। विकार आणि निर्विकार। येक नव्हे कीं॥ ( दा. १३–६–२८ ) जेथें नाहीं विवंचना। तेथें कांहींच चालेना। खरें तेंचि अनुमाना। कदा न ये॥ २९॥ प्रत्ययास बोलिजे न्याये। अप्रत्यये तो अन्याये। जात्यांधास परीक्षा काये। नाना रत्नांची॥ ३०॥ म्हणोन ज्ञाता धन्य धन्य। जो निर्गुणेंसी अनन्य। आत्म-निवेदनें मान्य। परम पुरुष॥ ३१॥ जेथें ध्यान धारणा सरे। कल्पना निर्वि-कल्पीं मुरे। केवळ ज्ञप्तिमात्र उरे। सूक्ष्म ब्रह्म॥' ( दा. ८–८–५९ ) 'निर्विकल्पा च चिन्मात्रा वृत्तिः प्रज्ञेति कथ्यते। सा सर्वदा भवेद्यस्य स जीवन्मुक्त उच्यते॥' नाभीच्या बाजूनें कोणतीहि कल्पना न उठतां ज्ञेय-शून्य केवळ एक ज्ञान शिल्लक राहिलेली फक्त एक जाणीव जी, ती प्रज्ञा म्हणवून घेते. अशी ज्ञप्ति अथवा प्रज्ञा ज्याच्या ठिकाणीं अखंड तेवते तो जीवन्मुक्त, असा याचा अर्थ. श्रीसमर्थांच्या अनुभवांत आणि श्रुतींच्या सांगण्यांत कसा तंतोतंत मेळ बसतो पहा. 'आधीं केलें मग सांगितलें' असा श्रीसमर्थांचा बाणा आहे. 'सदा स्वरूपानुसंधान। हें मुख्य साधूचें ( निःस्पृहाचें ) लक्षण। जनीं असोन आपण। जनावेगळा॥ ( दा. ८–९–९ ) सकळ धर्मांमधें धर्म। स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म। हेंचि जाणिजे मुख्य वर्म। साधुलक्षणाचें॥ ५४॥ बाह्य साधकाचे परी। आणि स्वरूपाकार अंतरीं। सिद्धलक्षण हें चतुरीं। जाणिजे ऐसें॥ १२॥ साधु आपणचि येक। तेथें कैंचा दुःखशोक। दुजेविण अविवेक। येणार नाहीं॥ ४५॥' पाहा या ओवींशीं, 'द्वितीयाद्वै भयं भवति। यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः। तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः॥' हीं श्रुतिवाक्यें कशीं तंतोतंत जुळतात. 'आपण वस्तु मुळीं येक। ऐसा ज्ञानाचा विवेक।' असें सांगून श्रीसमर्थांनीं ८ वा ज्ञानदशक पूर्ण

केला आहे -- ' येथून हा ज्ञानदशक । संपूर्ण जाला ॥ ' ( दा. ८–१०–८१ ) नुसता दशकच पूर्ण झाला नाहीं, तर सबंध ज्ञानशास्त्रच इथें पूर्ण झालें. ' उंच नीच नाहीं परी । राया रंका येकचि सरी । जाला पुरुष अथवा नारी । येकचि पद ॥ ' ( दा. ७–२–२४ ) तत्त्वज्ञानानंतर ' मी कोण ? ' या अक्षरांची पाटी सारखी डोळ्यांपुढें बाळगावी आणि तोल सांभाळीत जावा. ' मी कोण ऐसा हेत । धरूनि पाहतां देहातीत । अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होये ॥ ( दा. ५–६–२१ ) याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें । मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ ' ( दा. ६–९–२९ ) असें श्रीसमर्थांनीं अनुभवून दिलेलें आश्वासन आहे. ' आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची । अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ॥ ' ( दा. ५--१०–३८ )

' लोक नाना देह देखती । विवेकी देहांत पाहाती । पंडित समदर्शनें घेती । येणें प्रकारें ॥ ( दा. ११–१–२४ ) इथें ' पण्डिताः समदर्शिनः ' या गीता-वाक्याची आठवण होऊन श्रीसमर्थांच्या शब्दांत याचा अर्थ कळल्याचा आनंद होतो. ' पण्डा आत्मबुद्धिः सा यस्यास्तीत्यसौ पण्डितः । ' पण्डा म्हणजे आत्मबुद्धि ( पहा : वरील ओवी – दा. ५–१०–३८ ) अशा निश्चयाची आत्मबुद्धि ज्याची झालेली असते, जो मोक्षश्रिया अलंकृत असतो तो पंडित. त्याला ' आत्मा म्हणजे तो अद्वैत । ' असा निश्चय असल्यामुळें सहजच दुसरें कांहींच दिसत नाहीं हें उघड झालें. या संदर्भाला अनुसरून असणारें एक वचन कठवल्लींत आहे : ' नित्योऽनित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान् । तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम् ॥ ' ( कठ उ. २–२–१३ ) विनाश पावणाऱ्या अखिल नामरूपांतून अधिष्ठानरूपानें जो अविनाशी आनंद व्यापून आहे, जो ब्रह्मादिकीटकांच्या इंद्रियांना चेतना आणणाऱ्या मनःप्राणादिकांनाहि चेतना देणाऱ्या त्या त्या देहां-

तल्या चैतन्यालाहि तदधिष्ठानरूपानें जो एक सत्य आनंद आहे, जो आपण एक असूनहि तत्तदुपाधिविशिष्ट चैतन्याला ऐच्छिक तो तो विविध आनंद देतो, त्या नित्य शुद्ध, अनंतानंत, सत्य आनंदाचा साक्षात्कार, जे आपल्या 'मी' म्हणून स्फुरत असलेल्या आत्मभानांत अपरोक्षपणें करून घेतात, त्यांना मात्र खरी शांति प्राप्त होते, इतरांना नाहीं. ( वैषयिक आनंद त्या सत्य आनंदाचें केवळ एक खोटें प्रतिबिंब असल्यामुळें तो सत्य आनंदच विविध आनंद देतो म्हणून इथें औपचारिक रीतीनें म्हटलें आहे )

अपरोक्ष ज्ञान्यांनाच पण्डित म्हणतात. यांना आपल्या अद्वितीय स्वरूपाचेंच अखंड भान होत असल्यामुळें यांची सर्वत्र आत्मदृष्टि असणें, यांचें समदर्शी होणें स्वाभाविक आहे, हें आपण पाहिलें. अविवेकी प्रथम विवेकी होतो म्हणजे आत्मदृष्टीनें बघणारा होतो. श्रीगुरुशरण होऊन देहांत जें आनंदरूप चैतन्य आहे तेंच, ' मी-आम्ही, तूं-तुम्ही, तो-ते अथवा ती-त्या ' अशा व्यावहारिक भाषेंत प्रकट होत असतें; प्रत्येक जण आपल्याला 'मी' म्हणत असतो, त्यामुळें 'मी'ची व्याप्ति अखंड सर्वत्र आहे. 'मी' या आत्मभानानें आनंदघन परमात्माच सर्व देहांतून चैतन्य-रूपानें आहे. त्या अद्वितीय आनंदघन परमात्म्यालाच उद्देशून ' मी-आम्ही, तूं-तुम्ही, तो-ते, ती-त्या ' म्हटलें जातें व त्या देहांतील आनंद-रूप चैतन्यावरच प्रेम केलें जातें. देह कोणालाहि प्रिय होऊं शकत नाहीं, ना याला ' मी-तूं ' म्हणून जाणण्याचें ज्ञान आहे. ' नाना देहीं देव एक विराजे। नाना नाटकलीला सुंदर रूप साजे। नाना तीर्थीं क्षेत्रीं अभिनव गति माजे। अगाध महिमा पिंडब्रह्मांडीं गाजे ॥ ' असें गुरु-मुखांतून श्रवण करून स्वपर देह न बघतां, कंदिलांत ज्योत, कांचेच्या फुग्यांत विद्युत्-प्रकाश बघितल्याप्रमाणें देहांत देहांतलें चैतन्य म्हणजे देहांतील आनंदघन परमात्मा बघणारा विवेकी बनतो आणि अशा अभ्यासानें पुढें तो आत्मव्यतिरिक्त न पहाणारा खरा पंडित होतो.

**नित्यानित्यविवेक**

'मी' हा अनुभव जाणिवरूप आहे. त्यांत आपलें निराकार अद्वितीय, ज्ञानानंदस्वरूप प्रकट होतें 'मी' या आपल्या अनुभवांत आपला अद्वितीय स्वभावच प्रकटतो, हें विवेक्याला समजून चुकलेलें असतें; एरवीं 'मी' हें भान देहाला होत नाहीं, हें थोड्या विचाराअंतीं कोणालाहि समजण्यासारखें आहे. देहालाच 'मी' हें भान होतें, तें देहापासूनच निर्माण होतें अथवा तें देहरूपच आहे, असें झाल्यास शवांत कां तें दिसून येत नाहीं ? त्या वेळीं 'मी' हें भान देहांतून नाहींसें झालेलें असतें. 'मी' या आपल्या भानानें द्योतित होणारें चैतन्य असेपर्यंत चेतन आणि तें देहाला सोडून गेलें म्हणजे देह अचेतन होत असल्यामुळें, देह ज्याच्यापासून झाला त्या रजरेताला त्यापासून झालेल्या रक्त, मांस, त्वचा, स्नायु, अस्थि, मज्जा, रेत, केश, नख, आणि इतर लाळ, कफ आदि अजून उच्चारूं नये म्हणून वाटणारें असें पुष्कळ देहांत भरलें आहे, त्या कशालाहि कोणी ' मी ' म्हणत नाहीं आणि तें देहाबाहेर गेलें असतां, घराबाहेर फेकून दिलें असतां, ' मी देहाबाहेर गेलों, मी घराबाहेर फेकला गेलों ' असें कोणालाहि वाटत नाहीं. कातडी फाटली म्हणजे ' मी फाटलों ' असें वाटत नाहीं. शस्त्रचिकित्सेनें काढून टाकलेल्या भागांतून ' मी गेलों ' असें मानत नाहीं. डुकली येऊन देहाचें विस्मरण झालें, देह धाडकन् पडला म्हणून भानावर आल्यावर समजतें. या सर्व कारणामुळें, देहाहून ' मी ' हें आत्मीय स्फुरण वेगळें आहे. देह हा अन्नापासून झाल्यामुळें, अन्नाला कोणी 'मी' म्हणत नसल्यामुळें ' मी अन्न घेतों ', ' मी अन्न सोडतों ', असा अनुभव असल्यामुळें, या अनुभवानेंच ओघानें अन्नापासून झालेला देह मी घेतों आणि मी सोडतों असा अनुभव त्याला असणें स्वाभाविक असल्यामुळेंहि देह ' मी ' होत नाहीं. या दोन्हींत जमीनअस्मानाचा फरक आहे.

( १ ) देह दृश्य, मी जाणीव अदृश्य; ( २ ) देह अनेक धातूंनीं युक्त, 'मी' ही जाणीव आपली एक; ( ३ ) स्वप्नांत आपल्याला या देहाचें भान नसतें आणि दुसराच देह त्या ठिकाणीं दिसतो, पण आपण 'मी' म्हणून स्वप्नांत असतोंच; ( ४ ) देहच मी झाल्यानंतर 'मी' असून त्या देहाचें भान नष्ट होणार नाहीं; ( ५ ) स्वप्नांत या देहाचा व जागृतींत स्वप्नदेहाचा भास नाहींसा झाला तरी त्याबरोबर "मी' हें आपलें भान नष्ट होत नाहीं; ( ६ ) सुषुप्तींत तर कोणताच देह आहे असें वाटत नसून आपण तिथें विश्रांति घेत असतों. असें झालें कीं आपल्याप्रमाणेंच आपलें 'मी' हें भान देहाहून अगदींच निराळें आहे, हें या सर्व कारणांमुळें सहज सिद्ध होतें. भान आपलें असल्या-मुळें तें देहाचें होत नाहीं हें स्पष्ट आहे. आपल्या भानासकट आपण देहाहून भिन्न आहों, हें अगदीं या विवेचनानें सूर्यप्रकाशाइतकें विवेक्याला स्पष्ट दिसेल. मी दृश्य बघतों, दुसऱ्याचे देह जसे मला दृश्य आहेत त्या-प्रमाणें स्वदेह सुद्धां मला दृश्य आहे. ज्ञानरूप द्रष्टा मी ज्ञेयरूप देहाहून निराळा. वस्त्र पाहणारा वस्त्राहून निराळा. एका कापसाच्या सुतानें झालेल्या बंडी आणि कोटाप्रमाणें ती बंडी, तो कोट म्हटल्याप्रमाणें एका अन्नाच्या रजरेतांच्या न्यूनाधिक्यानें झालेल्या देहांतून ती स्त्री, तो पुरुष असा व्यवहार केवळ नाममात्र होत असतो. या अशा भ्रामक सर्व स्त्रीपुरुष देहांहून 'मी' अगदीं निराळा आहे हेंच खरें. देहाचें पांघरूण वस्त्र व माझें पांघरूण देह, त्यामुळें माझ्या भानासह 'मी' देहाहून अगदींच भिन्न असणारा आहें, असें वाटणें म्हणजे विवेक.

माझ्यासारखेच सर्व, देहाहून भिन्न, एक ज्ञानानंदरूप आहेत. 'वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि। तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही॥' ( भ. गी. २—२२ ) 'एकोऽहं बहु स्याम्' — बहु व्हावें अशा स्वसंकल्पानें तो 'एकलाचि

झाला बहुरूपी।' असें असल्यामुळें माझ्यासकट सर्वांचें स्वरूप एक परमात्माच आहे. 'अहमयमिदं च वासुदेवः' असा विवेक्यांचा अनुभव असतो. 'जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत।' असें यामुळेंच म्हटलें आहे. 'सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते। अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम्॥' (भ. गी. १८–२०) ज्या ज्ञानानें पृथक् पृथक् असणाऱ्या अनेक प्राणिमात्रांच्या ठिकाणीं मनुष्य अविच्छिन्न अशा एका अविनाशी परमात्म्यालाच सर्वसमभावानें बघूं लागतो, त्या ज्ञानालाच एक सात्त्विक ज्ञान म्हणतात. 'समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्। विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति॥' (भ. गी. १३–२७) विनश्वर अखिल भूतांच्या ठिकाणीं सर्वसमभावानें असणाऱ्या परब्रह्म परमेश्वराला जो सदैव एकरूपानेंच बघतो, त्यानेंच एक ईश्वरानें दिलेल्या डोळ्यांचें सार्थक केलें, तोच एक खरा डोळस, त्यालाच एक दृष्टि आहे म्हणून म्हणतां येईल. बाकी आंधळेच आंधळे. 'अन्धेन नीयमाना यथान्धाः।' 'आंधळ्याचे पाठीं लागले आंधळे।' 'समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्। न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम्॥' (भ. गी. १३–२८) सर्वसम, सर्वरूप परमेश्वराच्या यथार्थ दृष्टीनें आपलेंच रूप परमेश्वराला मानून जो सर्वत्र तें आत्मदर्शन घेतो, त्याला आत्मविस्मृतीनें उत्पन्न होणारे मृत्युरूप कामादि कोणतेहि विकार होत नाहींत. अविनाशी आत्मरूपाची जाणीव त्याला सतत असल्यामुळें नश्वर देहादिकांच्या भानानें आत्मविस्मृति करून घेऊन तो आपला नाश करून घेत नाहीं उलट आनंदघन परमात्मैक्यरूपी परमगति म्हणवून घेणाऱ्या मोक्षास प्राप्त होऊन सांसारिक सुखदुःखांच्या आघातापासून तो आपली कायमची सुटका करून घेतो.

'दुर्लभ शरीरीं दुर्लभ आयुष्य। याचा करूं नये नास। दास म्हणे सावकास। विवेक पाहावा॥ (दा. १८–३–१) आत्मानात्मविवेक

करावा । करून चरा विवरावा । विवरोन सुदृढ धरावा । जीवामध्यें ॥ ( दा. १३–१–१ ) देह अनित्य आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य । अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ॥ २३ ॥ ' देह म्हणजे हा एक अन्नमय कोशाचा स्थूळ देहच नव्हे, तर ' च्यारी पिंडीं च्यारी ब्रह्मांडीं । ऐसी अष्टदेहाची प्रौढी । ' ( दा. ८–७–४१ ) हें ज्ञानी जाणतात. फार सूक्ष्मबुद्धीचें हें कृत्य आहे असा २३ व्या ओवीच्या उत्तरार्धाचा अर्थ आहे; आणि ' स्थूल सूक्ष्म कारण तुर्या पिंडीं । विराट महतत्त्व अव्याकृत मूळमाया ब्रह्मांडीं । ' असे हे अष्टदेहहि अनित्य आणि यांचा द्रष्टा साक्षी नित्य, असें जाणणें याला नित्यानित्यविवेक म्हणतात, हा या ओवीच्या पूर्वार्धाचा अर्थ आहे.

## जेथें मुरालें मीपण

मी पाहणारा म्हणजे द्रष्टा आहें आणि उत्पन्न झालेलें सर्व पाहिलें जाणारें दृश्य माझ्याहून वेगळें आहे, असें ठरलें म्हणजे पिंडाचा तसाच ब्रह्मांडाचा – त्यांचा अभिमान घेऊन असलेल्या जागृतींतल्या विश्ववैश्वानरांचा, सूक्ष्म देहाचा तसाच महत्तत्त्वाचा – त्यांचा अभिमान घेऊन असलेल्या स्वप्नांतल्या तैजस हिरण्यगर्भांचा, कारणदेहाचा तसाच अव्यक्ताचा – त्यांचा अभिमान घेऊन असलेल्या सुषुप्तींतल्या प्राज्ञ ईश्वरांचा महाकारणदेहाचा ' अहं ब्रह्मास्मि 'रूप मूळमायेचा – त्यांच्या या तुर्यावस्थेंतल्या साक्षित्वाचाहि मी द्रष्टा आहें, हें ओघानेंच प्राप्त होऊन, द्रष्टा याचा अर्थ पुढें पाहणारा असा न उरतां आनंदघन चिद्रूपानें या पिंडब्रह्मांडाच्या अवस्था, देह, अभिमान्यांचा प्रकाशिता असा होऊं लागतो. आत्मानात्मविवेकाची मजल ' अहं ब्रह्मास्मि 'रूप मूळमायेपर्यंतची आहे. यापैकीं मी कोणीहि नव्हे, या विवेकाच्या वणव्यांत क्षुद्र देहाभिमान, हिडीस विषयवासना, भ्रामक स्त्रीपुरुषभावना, गलिच्छ कामादि विकार, या

रूपाचा हा सर्व पाचोळा कुठें जळून बेपत्ता झाला, याचा सुगावाहि लागणार नाहीं.

'च्यारी देह निरसावे। साधकें देहातीत व्हावें। देहातीत होतां जाणावें। अनन्य भक्त॥' (दा. १०–१०–४७) 'च्यारी पिंडीं च्यारी ब्रह्मांडीं।' (दा. ८–७–४१) अशा रीतीनें, 'जें जें कांहीं देखिलें। तें तें जाणोन सांडिलें। मूळमायेपरतें देखिलें। आपणासी॥ मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे॥ धन्य तो साधु॥ (दा. १७–३–२०) आपुलिया स्वानुभवें। आपणास निवेदावें। आत्मनिवेदन जाणावें। ऐसें असे॥ (दा. ८–८–८) आठवा देह मूळमाया। निर्शोन गेल्या अष्टकाया॥ (दा. १३–२–१९). चौदेहाचा अंत। आणि जन्म मुळाचा प्रांत। अंताप्रांतासी अलिप्त। तो तूं आत्मा॥' (दा. ८–८–४९) 'अहं ब्रह्मास्मि'रूप मूळमाया ही जन्म पावलेल्या कार्याचा–ब्रह्मस्वरूपाकडे निघालें असतां–शेवटचा प्रांत आहे. मूळ प्रांत आहे. 'मूळमाया जाणीवेची। मुळीं सूक्ष्म कल्पनेची॥' (दा. २०–२–१९) ब्रह्मस्वरूपाकडून निघालें असतां आणि 'अहं ब्रह्मास्मि' हें सूक्ष्म स्फुरण नष्ट झाल्यानंतर या अंताप्रांताशीं नित्य असंग असणारें स्वतःसिद्ध आनंदघन असें जें तुझें चिद्रूप प्रकटतें तें आत्मरूपच तुझें सत्य रूप आहे, असा श्रीसमर्थ आम्हांला उपदेश करीत आहेत.

'स्थूळ सूक्ष्म वोलांडिलें। कारण माहाकारण सांडिलें। विराट हिरण्यगर्भ खंडिलें। विवेकानें॥ (दा. १३–१–२९) अव्याकृत मूळप्रकृती। तेथें जाऊन बैसली वृत्ती। ते वृत्ति व्हावया निवृत्ति। निरूपण ऐका॥ ३०॥' वस्तुतंत्र साक्षात्कार आहे. साक्षात्कार म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान अथवा दर्शन होणें; हें वस्तुतंत्र असतें म्हणजे त्या वस्तूवरच अवलंबून असतें. मेघाचें आवरण गेलें कीं सूर्य आपोआप जसा दिवसा प्रकटतो, त्याप्रमाणें स्फूर्तीचें आवरण गेलें म्हणजे आनंदघन ब्रह्मस्वरूप आपोआप

प्रकटतें. त्याकरितां कोणत्याहि प्रयत्नाची आवश्यकता नाहीं. ' वस्तु येक आपण येक । ऐसी अस्ती वेगळिक । तरी अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ॥ ( दा. ६–१०–३४ ) हें न बोलतांच विवरिजे । विवरोन विरोन राहिजे । मग अबोलणेंचि साजे । माहापुरुषीं ॥ ( दा. ५–२–३४ ) सिद्धांतवस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षी ते अवस्था । आत्मा नीहून पर्ता । अवस्थातीत ॥ ( दा. ६–१०–१५ ) पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे । ते समईं उतरे । फुंज मीपणाचा ॥ १६ ॥ जेथें मुरालें मीपण । तेंचि अनुभवाची खूण । अनुर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ॥ १७ ॥ '

## सा काष्ठा सा परागतिः ।

दासबोध दशक १२–६, १३–३, १७–८. ९ समास हे वाचले म्हणजे पंचीकरण ध्यानांत येऊन पिंडब्रह्मांडांच्या त्या त्या चौदेहांची ओळख पटेल, वरील विवेचन समजेल. श्रीसमर्थांनीं ब्रह्मांडीं चौथा देह मूळमाया, पिंडीं तुर्यावस्था असें वर्गीकरण केलें आहे. ( अहं ब्रह्मास्मि अनुसंधानरूपाची ) तुर्या प्रत्यक्ष द्वैत असें म्हटलें आहे. अहं आणि ब्रह्म हीं अनुसंधानाचीं दोन रूपें इथें दिसून येतात. आणि प्राप्यप्रापकतेची कल्पना इथें दडून असलेली स्पष्ट होते. पुन्हा चंचळ स्फुरणात्मक असा येथील अनुभव असल्यामुळें निश्चळ ब्रह्मरूप आनंदांत हा नद्भिन्नच वाटतो. ' तदाकारीं ठाव वृत्तीस नाहीं ' म्हणून अहं ब्रह्मास्मि स्मरण वृत्त्यात्मक अथवा स्फुरणात्मक असें चंचळ असल्यामुळें निश्चल ब्रह्मस्वरूप नव्हे हें सिद्ध होतें. अनुभव द्वैतांत आणि कार्यांत मोडतो, हें विचाराअंतीं कळून येतें. यामुळें 'अहं ब्रह्मास्मि' या स्फुरणापासून द्वैताला अथवा कार्याला प्रारंभ झाला. ' आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य । अनन्य म्हणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ॥ ( दा ४–९–१७ ) आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान ।

संग जडला ॥ ( दा. ७–२–२० ) सोडितां तया संगासी। ऐक्य होये निःसंगासी। कल्पनेविण प्राप्तीसी। अधिकार ऐसा॥ ( दा. ७–२–२० ) आत्मा म्हणिजे तो अद्वैत। जेथें नाहीं द्वैताद्वैत। तेथें मीपणाचा हेत। उरेल कैंचा॥' ( दा. ४–९–१८ ) दुसरें कांहीं जेव्हां दिसतें तेव्हां त्याहून वेगळा मी असें मीपणाचें भान होतें. स्फूर्तिशून्य स्वप्रकाश आनंदघन आपणच एक शिल्लक राहिल्यानंतर भिन्न भानानें उत्पन्न होणारें मीपण तिथें अर्थात् उत्पन्नच होत नाहीं हें स्पष्ट आहे.

'ब्रह्म वा इदमग्र आसीत्तदात्मानमेवावेदहं ब्रह्मास्मीति ततः सर्वमभवत्।' ( बृ. उ. अ १–४–१० ) यापूर्वीं एकच एक निर्विकल्प आनंदघन परब्रह्म होतें. त्यानेंच स्वतःला 'अहं ब्रह्मास्मि – मी ब्रह्म आहें' असें जाणलें आणि तेथूनच मग हें सर्व कांहीं झालें, असें श्रुतीचें सांगणें आहे. 'निर्विकल्पीं जें स्फुरण। तेंचि मायेचें लक्षण॥' असें श्रीसमर्थ म्हणतात. अहं अथवा अहं ब्रह्म स्फुरलें तेचि माया। असें सांगून इथून सृष्टीची उभारणी केली आणि अनात्मरूप हा चौथा देह आहे याचेंहि निराकरण करावें म्हणून उपदेशिलें तें ठीकच आहे. लयाचा अभ्यास सांगतांना, 'विलाप्यविकृतिं कृत्स्नां संभवव्यत्यययक्रमात्। परिशिष्टं च चिन्मात्रं चिदानन्दं विचिन्तय॥' ( मु. उ. २–५० ) असें मुक्तिकोपनिषदांत सांगितलें आहे. 'जें जें जेथून निर्माण जालें। तें तें तेथेंचि निमालें। सर्व निमतां उरलें। तें परब्रह्म॥ ( दा. १२–६–१९ ) निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा। सकळां पर जो परमात्मा। चैतन्य साक्षी ज्ञानात्मा। षड्गुणैश्वरु॥ ( दा. १७–१–१ ) सकळ जगाचा ईश्वरु। म्हणौन नामें जगदेश्वरु। तयापासून विस्तारु। विस्तारला॥' ( दा. १७–१–२ )

'सच्छब्दवाच्यमविद्याशबलं ब्रह्म। ब्रह्मणोऽव्यक्तम्। अव्यक्तान्महत्। महतोऽहंकारः। अहंकारात्पञ्चतन्मात्राणि। पञ्चतन्मात्रेभ्यः पञ्चमहाभूतानि। पञ्चमहाभूतेभ्योऽखिलं जगत्॥' ( त्रिशिखि ब्रा. उ. १ ) सृष्टि-

क्रम पैङ्गलोपनिषदांत चांगला दिला आहे तो पहावा. तैत्तिरीयोपनिषदाच्या ब्रह्मवल्लींत पंचमहाभूतांच्या उत्पत्तीचा क्रम असा आहे ( अनु. १ ): ' आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधिभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः । स वा एष पुरुषोऽन्नरसमयः । ( अन्नाद्रेतः । रेतसः पुरुषः । ) ' अहं ब्रह्मास्मि स्फुरण, अव्यक्त, महत्तत्व, अहंकार, विराट्, पंचतन्मात्रा ( सूक्ष्म पंचमहाभूतें ), पंच स्थूल भूतें, अखिल जगत या जगदुत्पत्तिक्रमाच्या उलट, तें तें कार्य त्याच्या त्याच्या कारणांत लीन करीत ' अहं ब्रह्मास्मि ' स्फुरणापर्यंत जाऊन निःस्फूर्तिक परब्रह्मांत हे विलीन करून, मग स्वप्रकाश, स्वसंवेद्य, नित्य निर्विकल्प, चिन्मात्र आनंदच एक उरव आणि यानंतर कसलाहि विचार करूं नको; तेंच तूं म्हणून उपनिषत सांगतें. पंचीकृत स्थूलदेह स्थूल पंचभूतांत, स्थूल पंचभूतें सूक्ष्म पंचभूतांत, अपंचीकृत सूक्ष्म देह या सूक्ष्म पंचभूतांत, हीं पंचभूतें, ' पृथ्वीचें मूळ जीवन । जीवनाचें मूळ अग्न । अग्नीचें मूळ पवन । ' ( दा. १६–७–१ ) आणि पवनाचें नभ, अशा क्रमानें पृथ्वीतन्मात्र जलतन्मात्रांत, जलतन्मात्र अग्नितन्मात्रांत, अग्नितन्मात्र वायुतन्मात्रांत, वायुतन्मात्र आकाशतन्मात्रांत, आकाशतन्मात्र अहंकार अथवा विराट् यांत, विराट् महत्तत्त्वांत, महत्तत्त्व अव्यक्तांत, अव्यक्त मूळमायेंत, मूळमायारूप ' अहं ब्रह्मास्मि ' हें स्फुरण आवरणशून्य आनंदघन परब्रह्मांत लीन करून, आनंदच एक शिल्लक उरवून स्वस्थ निर्विकल्प रहावें. ' पृथिव्यप्सु प्रलीयत ( ते ) आपो ज्योतिषि प्रलीयते ज्योतिर्वायौ विलीयते वायुराकाश ( शे ) आकाशमिन्द्रियेष्विन्द्रियाणि तन्मात्रेषु तन्मात्राणि भूतादौ विलीयन्ते भूतादिमर्हति विलीयते महानव्यक्ते विलीयतेऽव्यक्तमक्षरे विलीयतेऽक्षरं तमसि विलीयते तमः परे देव ( वे ) एकीभवति परस्तान्न सन्नासन्न सदसत् ॥ ' इथें सांगितलेल्या लयक्रमांत विराट् यालाच भूतादौ म्हटलें आणि पुढें अव्यक्त अक्षररूपी

मूळमायेंत विलीन होतें असें सांगून निःस्फूर्तिक, निश्चल, निर्विकल्प, एक आनंदघन परमात्म्याच्या ठिकाणीं अहं ब्रह्मास्मिरूप मूळमायेचें चंचल स्फुरण झालें कसें? कारण झालें म्हणणें म्हणजे तेंच एक तमोरूप अज्ञान आहे. तेव्हां 'अहं ब्रह्मास्मि' स्फुरणहि पुढें त्या तमांत विलीन होतें व 'अहं ब्रह्मास्मि' स्फुरणाच्या लयानंतर त्याचें कारण असणारें तमोरूप मूलाज्ञानहि त्या स्वयंप्रकाश परब्रह्मांत शेवटीं विलीन होतें, असें सांगितलें आहे.

इतर ठिकाणीं अव्यक्तापर्यंतच अनात्मरूपाची मर्यादा सांगितली आहे. 'अव्यक्तपर्यन्तमिदं ह्यनात्मा' असें श्रीशंकराचार्यांनीं विवेकचूडामणीच्या १२४ व्या श्लोकांत सांगितलें आहे. 'एकात्मप्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः।' (माण्डूक्य उ. ७) माण्डूक्योपनिषदांत तीनच देह सांगून चौथा देह नसून शुद्ध बुद्ध आत्माच आहे, असें सांगितलेलें आढळून येतें. कठोपनिषदांतल्या लयक्रमांत देखील, 'अव्यक्तात्पुरुषः परः। पुरुषान्न परं किञ्चित्सा काष्ठा सा परागतिः।' (कठ. उ. १–३–११) असेंच सांगितलें आहे. अजून इतर ठिकाणच्या लयक्रमांत देखील अव्यक्तापर्यंतचाच लयक्रम दिसून येतो. श्रीसमर्थांनीं आणि वरच्या मंत्रांनीं पुन्हा सूक्ष्म भेद पाडून साधकाच्या अभ्यासाला सुकर व्हावें म्हणून जें सांगितलें, तेंहि योग्यच झालें. शंका कोणालाहि रहाणार नाहीं.

## अज्ञानाची पराकोटि

वर 'अक्षरं तमसि विलीयते तमः परे देवे।' हें वाचलें. या जगाच्या पूर्वी तमच एक होतें हें कळलें. लयप्रकरणांत हें कार्याच्या शेवटीं भेटतें आणि मग ब्रह्मस्वरूपाचें दर्शन होतें. उत्पत्तिप्रकरणांत ब्रह्मस्वरूपांतून बाहेर निघावयाचा अवकाश कीं तमाचें प्रथम दर्शन होतें. एकंदरींत

भ्रामक जगाची उत्पत्ति ब्रह्माधिष्ठित तमापासूनच होणें युक्तियुक्तहि वाटत असल्यामुळें या दिसून येणाऱ्या जगाच्या प्रारंभीं एक तमच होतें हें सिद्ध झालें. ' तम आसीत्तमसा गूळ्हमग्रे । ' ( ऋ. ना. सू. मं. १० अ. ११ सू. १२९-३ ) या वेदवाक्याची इथें आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. ' अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च । ( भ. गी. १४-२३ ) प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥ ' ( गी. १४-१७ ) त्याबरोबरच या भगवद्गीतेच्या श्लोकांचीहि पण स्मृति होते आणि लख्ख प्रकाश पडतो.

आत्मरूपाचा अप्रकाश म्हणजे जाणीव नसणें, अज्ञान, आत्मस्वरूपाच्या निर्विषय सुखाच्या ठिकाणची अप्रवृत्ति, देहाहंकाराचा प्रमाद आणि दृश्य पदार्थांचा मोह असें जें कांहीं पाठीमागें हात धुऊन लागलें आहे हे अज्ञान, प्रमाद, मोह त्या तमापासून झाले आहेत. त्या तमापासून झालेलें अज्ञानच या सर्व विश्वाला, सर्व विश्वांतल्या अखिल कार्याला कारणीभूत आहे हें स्पष्ट होतें. अज्ञानानें आत्मज्ञान आवृत झाल्यामुळें हे सर्व जीव मोह पावले आहेत. ' अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः । ' ( भ. गी. अ. ५-१५ ). अज्ञानच याचें मूलकारण आहे. ' अज्ञानमेवास्य हि मूलकारणम् । ' ( रामगीता ९ ). हीं दोन्ही वाक्यें इथें लागू पडतात. श्रीशंकराचार्यांचाहि स्वात्मप्रकाशिकेंतला अगदीं पहिलाच श्लोक आठवला तोहि येथें देतों — ' अधिकस्याधिकं फलम् । ' — ' जगत्कारणमज्ञानमेकमेव चिदन्वितम् । एक एव मनः साक्षी जानात्येवं जगत्त्रयम् ॥ ' सूर्यप्रकाशामुळेंच, त्याला आच्छादल्यासारखे वाटविणारे ढग प्रकाशतात आणि त्या प्रकाशासमेतच दिवसां जसे असतात, त्याप्रमाणेंच ब्रह्मरूपाच्या चिद्रूपामुळेंच त्याला आच्छादल्यासारखें वाटविणारें तम अथवा अज्ञान प्रकाशतें आणि त्या प्रकाशासमेतच असतें. सूर्यप्रकाशाच्या उष्णतेमुळेंच ढगाची उत्पत्ति झाली असली तरी सूर्यप्रकाशांत अथवा सूर्यनारायणांत

यामुळें कांहीं फरक पडत नाहीं आणि त्याच्यांत ढग म्हणून कांहीं त्रिकालींहि झाल्याचें आढळत नाहीं. याचा संपर्कहि त्याला नाहीं म्हणून हें जसें समजावयाचें, त्याप्रमाणेंच ब्रह्मस्वरूपाच्या ज्ञानरूपामुळेंच याची उत्पत्ति झाली असली तरी त्याच्या त्या चिद्रूपांत अथवा मूळ स्वरूपांत यामुळें कांहीं फरक पडत नाहीं आणि त्यांत अज्ञान अथवा तम म्हणून कांहीं त्रिकालींहि झाल्याचें आढळत नाहीं, याचा संपर्कहि त्याला नाहीं म्हणून येथें जाणावयाचें आहे.

सूर्यप्रकाशच ढगांतून व ढगाच्या अनेक आकारांतून जसा दिसतो, त्याप्रमाणेंच एकच एक परब्रह्मप्रकाश चिद्रूप मनाचा साक्षी अखिल तमांतून व त्याच्या अखिल नामरूपात्मक कार्यांतून जाणीवरूपानें सर्वत्र भरगच्च कोंदाटला आहे. वस्तुतः तमाला आणि तमापासून झालेल्या कोणत्याहि कार्याला प्रकाश अथवा जाणीव असत नसल्यामुळें, यांतून दिसून येणारी जाणीव अथवा प्रकाश परब्रह्माचाच आहे हें उघड आहे. तम आणि तमःकार्याचाहि संबंध याला लागत नसल्यामुळें, तम आणि तमःकार्याच्या उत्पत्तिनाशानेंहि याला कांहींच इजा पोहोंचत नसल्यामुळें, केवळ प्रकाशकच हा असल्यामुळें, या ब्रह्मप्रकाशालाच साक्षी असें दुसरें एक नांव आहे. हाच एक मनःसाक्षी, सर्व मनःकल्पित दृश्याला आणि मनाला जाणतो, हा आचार्यांच्या वर उद्धृत केलेल्या श्लोकाचा अर्थ आहे. 'साक्षी म्हणिजे ज्ञान। ज्ञानें वोळखावें अज्ञान। ज्ञानाज्ञानाचें निर्शन। देहासरिसें ॥ ( दा. १७–९–९ ) ब्रह्मांडीं देह कल्पिले। विराट हिरण्यगर्भ बोलिले। ते हे विवेकें निर्शले। आत्मज्ञानें ॥' ( दा. १७–९–१० ).

'आसीदिदं तमोभूतमप्रज्ञातमलक्षणम्। अप्रतर्क्यमविज्ञेयं प्रसुप्तमिव सर्वतः ॥' ( मनुस्मृति १–५ ) या अखिल दृश्यापूर्वी अमुक असें तसें म्हणून न जाणतां येणारें, कोणत्याहि लक्षणांत न बसणारें, तर्कितांहि न येणारें अज्ञात एक तम होतें. थोडक्यांत विश्व हें त्या वेळीं झोपल्या-

सारखें होतें. झोपेंत अंतर्बाह्य प्रपंच शांत झालेला असतो. त्या वेळच्या तमाला अंधकार म्हणून म्हणतां येत नाहीं, कारण अंधकारांत कांहीं दिसत नसलें तरी मन असतें, 'मी' ही जाणीव असते, मनाचे व्यापार होत असतात, डोळे सोडून इतर इंद्रियांचे व्यापार चालतात. असो. पिंडांतली सुषुप्ति आणि ब्रह्मांडांतलें अव्यक्त अथवा अव्याकृत दोन्हींचा अर्थ एकच. 'तद्धेदं तर्ह्यव्याकृतमासीत्।' (बृ. उ. १–४--७) अशी श्रुति आहे. 'अव्यक्तमक्षरे विलीयतेऽक्षरं तमसि विलीयते तमः परे देव (वे) एकीभवति।' या क्रमाप्रमाणें विचार करून श्रीसमर्थांच्या आणि बृहदारण्यकाच्या सांगण्याप्रमाणें प्रथम 'अहं ब्रह्मास्मि' हें स्फुरण प्रकट झाल्यामुळें हिलाच मूळमाया म्हटलें तरी मागच्या निरूपणाप्रमाणें आधीं विस्मृति मग स्मृति, आधीं आवरण मग स्फुरण, या दृष्टीनें या स्फुरणापूर्वीं एक अनिर्वचनीय तम आवरण होतें तें 'अहं ब्रह्मास्मि' या व्यक्त रूपानें प्रकटलें आणि तें तम मूळमायेचें अव्यक्त स्वरूप 'अहं ब्रह्मास्मि' या स्फुरणांतूनहि आहे असें मानावें लागतें व असें मानलें तर, बीजाङ्कुर-न्यायानें पूर्वस्थिति सहज द्योतित होत असल्यामुळें या दोन प्रमाणांत विरोध येत नाहीं.

'दृश्य अवघें वेगळें केलें। केवळ अदृश्यचि उरलें। तेंचि ब्रह्म अनुभविलें। म्हणती येक ॥ (दा. ८–१०–६३) परी तें ब्रह्म म्हणों नये। उपायासारिखा अपाये। सुन्यत्वास ब्रह्म काये। म्हणों येईल ॥ ६४ ॥ दृश्य अवघें वोलांडिलें। अदृश्य सुन्यत्वीं पडिलें। ब्रह्म म्हणौनि मुरडलें। तेथुनि च मागें ॥ ६५ ॥ इकडे दृश्य तिकडे देव। मध्यें सुन्यत्वाचा ठाव। तयास मंदबुद्धीस्तव। प्राणी ब्रह्म म्हणे ॥ ६६ ॥ रायास नाहीं वोळखिलें। सेवकास रावसें कल्पिलें। परी तें अवघें वेर्थ गेलें। राजा देखतां ॥ ६७ ॥ तैसें सुन्यत्व कल्पिलें ब्रह्म। पुढें देखतां परब्रह्म। सुन्यत्वाचा अवघा भ्रम। तुटोन गेला ॥ ६८ ॥' या ओव्या बघितल्या म्हणजे श्रीसमर्थांनीं तमालाच

शून्य हें नांव दिलें आहे हें स्पष्ट होतें. ' स्थितस्य गतिश्चिन्तनीया ' या न्यायानेंहि या दोन वाक्यांचें समर्थन झालें.

जें आवरण ' अहं ब्रह्मास्मि ' स्फुरणापूर्वी होतें, तेंच या स्फुरणानंतर अधिक घनीभूत होऊन तमोरूप सृष्टीचें बीज अव्यक्त झालें. ' अहं ब्रह्मास्मि ' या आभासरूप ज्ञानांत निराभासाचें अज्ञान आहेच. तेंच पुढपुढच्या कार्यांतून अधिकाधिक घनीभूत होत जाऊन जड देहापर्यंत येऊन ठेपलें आणि ' देहोऽहम् ' असा तदनुगत ज्ञानांत त्याचा आभास होऊं लागला. ब्रह्माच्या ऐवजीं देह मी म्हणण्याइतकें तें तम ( अज्ञान ) घनीभूत झालें. ' अहं ब्रह्म ' म्हणून सुखाकरितां ब्रह्माकडे धांव घेणारें मुळांतलें अहं स्फुरण घसरत घसरत अवनतीच्या अखेरच्या पायरीवर येऊन ' अहं देहः ' म्हणून सुखाकरितां गलिच्छ स्वदेहयोनीकडे धांव घेऊं लागलें. ' अहं ब्रह्म अस्मि — मी ब्रह्म आहें ' या स्फुरणांत, या अनुभवांत, अहं भोक्ता पुरुष झाला. ' मी ब्रह्म ' भानरूप सुख देणारी स्वरूपज्ञानशक्ति, प्रकृति अथवा मूळमाया, भोग्य झाली. पुढें ' ईश्वरोऽहम् ' या स्फुरणांत ' मी ईश्वर ' या अनुभवानें सुख देणारें अव्यक्ताभिमानाच्या ईश्वरत्वाचें भान प्रकृतिरूप भोग्य झालें अथवा येथील जगद्बीजरूप ज्ञानशक्ति प्रकृति भोग्य झाली आणि अहं स्फुरण भोक्ता पुरुष झाला.

याच्यापुढें 'हिरण्यगर्भोऽहम्' यांतहि हिरण्यगर्भत्वाचें भान प्रकृतिरूप भोग्य झालें अथवा येथील जगदंकुररूप इच्छाशक्ति प्रकृति भोग्य झाली आणि अहं भोक्ता पुरुष झाला. ' मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्। संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ' ( भ. गी. १४—३ ) 'विराड्' — अथवा ' वैश्वानरोऽहम् ' यांत विराडत्वाचें भान प्रकृतिरूप भोग्य झालें अथवा येथील जगद्वृक्षरूप अर्थात् जगद्विस्ताररूप क्रियाशक्ति प्रकृति झाली आणि अहं भोक्ता पुरुष झाला. असेच पुढें या तिघांचे अवतार

अथवा प्रतिनिधि असणाऱ्या रुद्र, विष्णु, ब्रह्मा या देवांनाहि क्रमानें मी अमुक म्हणण्यांत त्या त्या उपाधित्वाचें आणि नामाचें भान अथवा तमोरूप गुप्तबीजज्ञानशक्ति, पालनाची सत्त्वरूप इच्छाशक्ति, प्रत्यक्ष सृष्टि उत्पन्न करण्याची रजोरूप क्रियाशक्ति क्रमानें त्यांना त्यांना प्रकृतिरूपानें भोग्य होऊन तदनुभवानें आनंद मानणारा अहंभाव क्रमानें त्यांचा त्यांचा भोक्ता झाला.

शेवटीं अवनतीच्या अगदीं खालच्या पायरीवर आल्यावर झालेल्या 'नरोऽहम्' या भानांत नरत्वाचा म्हणजे नररूप त्या देहाचा अभिमान अथवा प्रजोत्पादनाची असणारी त्याची शक्ति प्रकृति व्यक्त स्त्रीरूपानें भोग्य झाली आणि देहाभिमानाचें अहं स्फुरण भोक्ता झालें. 'देहोऽहं' म्हणून मानणारा स्वदेहकारणरूप योनींत रमूं लागला आणि त्यापासून झालेल्या घाणेरड्या, पाउलापाउलीं वीट आणणाऱ्या, कुश्चिळ देहालाच मी म्हणून आनंद मानूं लागला. आरशांत पाहून मिशांवरून हात फिरवूं लागला. मी ब्रह्म हें विसरून मी देह झाल्यानंतर सुखाकरितां स्वयोनि म्हणजे कारणरूप नित्यशुद्ध आनंदघन ब्रह्मरूपाकडे न जातां, आपल्या देहाला कारणीभूत होणाऱ्या हिडीस इंद्रियांकडे धांव घेऊं लागला. ही येथें पराकाष्ठेची अवनति झाली. अज्ञानाला अथवा तमाला शेवटचें जें कांहीं करावयाचें होतें, तें इथें करून झालें. अज्ञानाची इथें पराकाष्ठा झाली आणि इथेंच वाढीस लागलेलें अज्ञान पूर्ण झालें आणि इथेंच आपल्या पूर्णकलेनें नांदूं लागलें. सूक्ष्म सूक्ष्म असणारें स्थूल स्थूल होतां होतां येथपर्यंत शेवटीं येऊन ठेपलें. बीं आपल्या पूर्वरूपानें नष्ट होऊन वृक्ष झाल्याप्रमाणें मात्र पूर्वपूर्वरूप नष्ट होऊन उत्तर-उत्तररूप झालें असें नाहीं; तीं पूर्वपूर्वकारण-भूतरूपें जशींच्या तशींच आहेत. झालें तें त्यांच्या या कल्पना आहेत नुसत्या! नाटक पूर्ण लिहून होऊन रंगस्थळावर आलें.

## हें सारें देहाभिमानामुळें !

'नाना पुरुषांचे जीव। नाना स्त्रियांचे जीव। येकचि परी देहस्वभाव। वेगळाले ॥ नवरीस नवरी नलगे। ऐसा भेद दिसों लागे। पिंडावरून उमगे। ब्रह्मांडबीज ॥ नवरीचें मन नवऱ्यावरी। नवऱ्याचें मन नवरीवरी। ऐसी वासनेची परी। मुळींहून पाहावी ॥ वासना मुळींची अभेद। ( ब्रह्मप्राप्तीची वासना दोघांनाहि सारखीच आहे, कारण दोघांचेंहि तें मूळरूप आणि खरें आनंदरूप आहे. अज्ञानानें कमाल करून, देह मी ही भावना निर्माण केल्यानंतर स्त्रीपुरुषांचें जन्मस्थानच परस्परांना खरें आनंदरूप वाटूं लागलें. अशी आळीव भ्रामक भावना देहाभिमानामुळें झाली. ) देहसमंधें जाला भेद। तुटतां देहाचा समंध। भेद गेला ॥' ( दा. १७–२–२० ते २३ ) 'मी देह नव्हे' असें झाल्यानंतर स्वतःला कोणी पुरुष अथवा स्त्री म्हणून मानणारच जर नाहीं तर मग स्त्रीपुरुष अभिमानानें स्त्रीपुरुषदेहांच्या ठिकाणीं भोग्यबुद्धि ही उत्पन्न होईलच कशी ? स्त्रीपुरुषत्वाच्या भिन्नत्वाची देहाची जाणीव जाऊन त्या देहांतलें 'मी' भानच एक उरलें व आपल्या अद्वितीय ज्ञानरूपतेनें मुळाचा शोध घेऊन एकदां कां तें आनंदघन ब्रह्म झालें कीं, मग कोण स्त्री, कोण पुरुष, कुठली कामवासना ! यांपैकीं एकाचाहि नुसता मागमूससुद्धां उरत नाहीं. 'नरनारीचें बीजकारण। शिवशक्तीमधें ( प्रकृतिपुरुषांमध्यें ) जाण। देह धरितां प्रमाण। कळों आलें ॥ ( दा. १७–२–२४ ) पुरुषास स्त्रीचा विश्वास। स्त्रीस पुरुषाचा संतोष। परस्परें वासनेस। बांधोन टाकिलें ॥ २९ ॥ ऐसी परस्परें आवडी। स्त्रीपुरुषांची माहागोडी। हें मुळींहून चालली रोकडी। विवेकें पाहावी ॥ ३१ ॥ मुळीं सूक्ष्म निर्माण जालें। पुढें पष्ट दिसोन आलें। उत्पत्तीचें कार्य चाले। उभयतांकरितां ॥ ३२ ॥ मुळीं शिवशक्ती ( प्रकृतिपुरुष ) खरें। पुढें जालीं वधुवरें। चौऱ्यासि लक्ष

विस्तारें। विस्तारली जे ॥ ३३ ॥ येथें शिवशक्तीचें रूप केलें। श्रोतीं मनास पाहिजे आणिलें। विवरलियांविण बोलिलें। ( यांत कांहीं अर्थ नाहीं म्हणून ) तें वेर्थ जाणावें ॥ ३४ ॥' त्या शब्दांचा कांहीं उपयोग होत नाहीं म्हणून एवढें विवरण केलें.

## हा खरा शूर

'नेणपणें जालें तें जालें। जालें तें होऊन गेलें। ( यापुढें तरी ) जाणतेपणें वर्तलें। पाहिजे नेमस्त ॥ ( दा. १८–२–१ ) जाणत्याची संगती धरावी। जाणत्याची सेवा करावी। जाणत्याची सद्बुद्धि घ्यावी। हळूहळू ॥ २ ॥' ( एकदम झालें नाहीं तर. ) कारण, 'सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम्। अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥' ( मुण्डक उ. ३–१–५ ) क्षीणदोष म्हणजे कामक्रोधादि विकारशून्य, भेदशून्य असणारे संन्यासी ज्याला आत्मरूपानें बघतात, त्या स्वप्रकाश, मायाअविद्यारहित, अत्यंत पवित्र असणाऱ्या आत्म्याची प्राप्ति सत्यस्थितीच्या पालनानें, अखंड चिदानंदरूप राहण्याच्या तपानें, यथार्थ आत्मज्ञानानें, नित्य बाळगलेल्या अस्खलित ब्रह्मचर्यानें मात्र होते. या साधनाशिवाय आत्मनिष्ठा बाणणेंच शक्य नाहीं. आतांपर्यंतच्या निरूपणानें हा अर्थवाद नसून कोरीव सत्य आहे, हें कोणालाहि पटल्याशिवाय राहणार नाहीं. याच अर्थाचे भगवद्गीतेंचे कांहीं श्लोक पाहूं. 'लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः। छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ ( भ. गी. ५–२५ ); कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम्। अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥' ( भ. गी. ५–२६ ) कामक्रोधादि कल्मषशून्य म्हणजे पापशून्य, भेदशून्य, मनस्वी म्हणजे ज्यांनीं मन जिंकलें आहे, इंद्रियें कह्यांत ठेवलीं आहेत आणि ज्यांचें चित्त रागद्वेषशून्य झालें आहे व ज्यांची सर्वत्र आत्मदृष्टि

झाली असल्यामुळें जे सर्व भूतांच्याच हिताकरितां झटत असतात, ते परम पवित्र संन्यासी तें निष्प्रपंच ब्रह्म प्राप्त करून घेतात आणि अशा या आत्मज्ञानी संन्याशांना सर्वत्र एक आनंदघन ब्रह्मच ब्रह्म उरलेलें असतें. मागच्या श्रुतीला हे श्लोक पोषक आहेत. ' य आत्मव्यतिरेकेण द्वितीयं नैव पश्यति । ब्रह्मीभूतः स एवं दक्षपक्ष उदाहृतः ॥ ' ( दक्ष स्मृ. ११ ) आपल्याहून वेगळें जो कांहींच बघत नाहीं, तोच खरा एक ब्रह्मरूप, असें दक्षप्रजापतींनीं आपलें मत दिलें आहे.

' पृथ्वी तस्य प्रभावाद्वहति दिननिशं यौवने यो हि शान्तः । ' ऐन तारुण्यांतच, शरीरांत चांगला जोम असतांनाच, जो मन-इंद्रियांना जिंकून आत्मसाक्षात्कारानें शांत झालेला असतो, त्याच्याच पुण्यप्रभावानें पृथ्वी सर्व जीवांना धारण करते. इंद्रियांची शक्ति असतांनाच त्यांना जिंकावयाचें असतें. इंद्रियांची शक्ति खालावल्यानंतर अथवा नष्ट झाल्या-नंतर जिंकावयाला त्यांच्यांत उरतेंच काय ? ' इंद्रियाणां जये शूरो धर्मं चरति पंडितः । हितप्रियोक्तिभिर्वक्ता दाता सम्मानदानतः ॥ ' असें एक सुभाषित आहे. भर तारुण्यांत इंद्रियांना जिंकणाराच खरा शूर; मोक्ष-धर्माचें कांटेकोर आचरण करणाराच पंडित; सत्य आणि हिताचें प्रिय होईल अशा हातोटीनें सांगणाराच वक्ता; आणि गौरवून दान देणाराच खरा दाता; असा या सुभाषिताचा अर्थ आहे. शूर कोण याबद्दल दक्ष-स्मृतींत एक श्लोक आहे. ' बलेन परराष्ट्राणि गृह्णन् शूरस्तु नोच्यते । जितो येनेंद्रियग्रामः स शूरः कथ्यते बुधैः ॥ १८ ॥ ' स्वसैन्य व देहबलानें परराष्ट्रें पादाक्रांत केलीं म्हणून त्याला ज्ञाते शूर असें म्हणत नाहींत. अगदीं तारुण्यांत ज्यानें इंद्रियांना आणि मनाला जिंकलें, त्यालाच एक शूर म्हणून ज्ञाते म्हणतात, हें लक्षांत ठेवावें. श्रीशंकराचार्यांनींहि प्रश्नोत्तर-मालिकेंत कोण शूर म्हणून प्रारंभीं केलेल्या प्रश्नाला, ' कः शूरो यो ललना-लोचनबाणैर्न व्यथितः ' ॥ ७ ॥ जो ( वस्तुतः घाणेरड्या )

ललनांच्या लोचनबाणांनीं व्यथित होत नाहीं, तोच शूर असें उत्तर दिलें आहे.

'प्रापणात् सर्वभोगानां परित्यागो विशिष्यते ॥' (म. स्मृ. २–९५) सर्व भोगांच्या प्राप्तीपेक्षांहि त्यांचा त्यागच श्रेष्ठ आहे. 'यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् । तृष्णाक्षयसुखस्यैते कलां नार्हन्ति षोडशीम् ॥' या जगांतलें जें कामसुख आहे आणि जें स्वर्गांत मिळतें, तें सर्व एकवटलें तरीहि कामाच्या त्यागानें अथवा कामवासनेच्या त्यागानें जें सुख मिळतें त्याच्या षोडश कलांपैकीं केवळ एक कलाभर, एक-षोडशांश सुद्धां तें होणार नाहीं. महानारायणोपनिषदांत हारुणि नांवाच्या एका मुलानें प्रजापतीकडे जाऊन श्रेष्ठ साधन कोणतें, असा प्रश्न केला असतां, प्रथम प्रथम अकरा साधनें सांगून, या संतति आदिकांपेक्षां या सर्वांचा 'न्यास इत्याहुः' – त्यागच श्रेष्ठ, असें सांगितलें आहे. सर्वांपेक्षां 'शमवानेव राजते' – त्यागीच जगांत शोभतो, असें उपनिषदांनीं आपलें मत प्रकटपणें सांगितलें आहे; आणि तें सत्य आहे म्हणूनच राजे-महाराजे विरक्तांच्या चरणीं लोटांगण घेत येतात. अष्टावक्र मुनींनीं जनकास उपदेश करतांना, 'न सुखं देवराजस्य न सुखं चक्रवर्तिनः । यत्सुखं वीतरागस्य मुनेरेकान्तशीलिनः ॥' विरक्तांना एकान्तांत जें सुख मिळतें, तें भूलोकाच्या चक्रवर्तीलाहि मिळत नाहीं आणि देवलोकाच्या चक्रवर्तीला म्हणजे इंद्रालाहि मिळत नाहीं, असें सांगितलें आहे.

संन्यासाला चतुर्थाश्रम हें नांव आहे. याज्ञवल्क्य ऋषींनीं ब्रह्मनिष्ठ असतांना देखील गृहस्थाश्रमाचा त्याग करून संन्यास घेतला. 'गृहाद्वनी भूत्वा प्रव्रजेत्' असें एक विधिवाक्यच आहे. यावरून संन्यासाचें महत्त्व स्पष्ट होतें. त्यांच्याबरोबर त्यांची ज्येष्ठ पत्नी मैत्रेयी संन्यासिनी झाल्याचा उल्लेख आहे. उत्तर हिंदुस्थानांत या आधारावरून विवाहित आणि कुमारिकाहि संन्यास घेतात. गार्गी नांवाची एक बालसंन्या-

सिनी याज्ञवल्क्यांच्या वेळीं होती. 'शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् । कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥' (भ. गी. ५–२३) आयुष्याच्या अंत्यक्षणापर्यंत म्हणजे आमरणान्त कामक्रोधांचे दुःसह दुर्निवार्य वेग जो, आपल्यावर त्याचा थोडाहि परिणाम न होऊं देतां, धैर्यानें सहन करतो, ज्यानें घातलेली विवेकाची सीमारेषा कामक्रोधांच्या पुरालाहि ओलांडवत नाहीं, जो आत्मबोधानें नित्यनिर्विकार आणि शांत असतो, तोच एक या जगांत योग्य आणि खरा सुखी म्हणून समजावें, असें जें भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें, तें निःस्पृहांनीं कधीं न विसरतां अखंड हृदयाशीं बाळगूनच असावें. 'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ (भ. गी. १६–२१) एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः । आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥' (गी. १६–२२) काम, क्रोध आणि लोभ हीं नरकाला नेणारीं तीन द्वारें आहेत. यांनीं आत्मप्राप्ति होत नसल्यामुळें दुसऱ्या शब्दांत आत्मनाशाचींच हीं द्वारें अथवा साधनें आहेत. सर्व दृष्टीनेंहि यांचा समूळ त्यागच इष्ट आहे. या तीन आत्मनाशक तमोद्वारांपासून जो आपली कायमची सुटका करून घेतो, तोच आपलें हित साधण्याविषयीं उद्युक्त झाला असें समजावें. याच्याच हातून खरा परमार्थ घडतो, आणि हाच केवळ परमगतिरूप मोक्षास प्राप्त होतो, बरें अर्जुना ! म्हणून श्रीकृष्णांनीं सांगितलेलें निःस्पृहांनीं तर कधींच विसरूं नये.

## हीं तीन द्वारें बंद ठेवा

या संदर्भाला अनुसरून 'सर्ववेदान्तसारसंग्रह' या आपल्या एका प्रकरणग्रंथांत श्रीशंकराचार्यांनीं लिहून ठेवलेला एक श्लोक आठवला तोहि येथें देतों – 'संसारमृत्योर्बलिनः प्रवेष्टुं द्वाराणि तु त्रीणि महान्ति लोके । कांता च जिह्वा कनकं च तानि रुणद्धि यस्तस्य भयं न मृत्योः ॥ ८८ ॥'

बलिष्ठ अशा कामादि विकारांनीं प्रेरित होणाऱ्या संसारमोहरूपी मृत्युप्रवेशाचीं स्त्री, जिह्वा आणि संपत्ति हीं तीन मोठमोठालीं द्वारें आहेत. हीं तिन्हीं द्वारें ज्यानें अजिबात बंद केलीं आहेत, त्याला मृत्यूचें भयच नाहीं. तेव्हां नुसती एक केवळ दृष्टि पडली तरी बाधणाऱ्या कांता, कनक आणि सुग्रास अन्न यांच्या नुसत्या कल्पनेलाहि निःस्पृहानें कधीं बळी पडूं नये. जिंकून घेतलेला प्रांत म्हणूनहि हीं तीन द्वारें उगीच थोडींशींहि उघडीं ठेवून म्हणजे स्त्रीपुरुष एवढाच थोडा भेद राखून यांच्या नुसतें आसपास गेलें तरी कसल्याहि साधकाला हा मोहरूपी मृत्यु झपाटल्याशिवाय रहात नाहीं. याचें कारण असें आहे कीं, सर्व देह कामविकाराला बळी पडून झालेल्या रतिक्रीडेचे द्योतक असल्यामुळें यांच्यांतून काम आपलें ठाण देऊन बसलेला असणें स्वाभाविक आहे. आत्मतत्त्वाचें अथवा विवेकाचें अंजन न लावलेल्या साध्या दृष्टीनें, तें अंजन विसरून याच्याकडे बघितलें म्हणजे याच्या ताब्यांत असणाऱ्या तरुणतरुणींच्या ठिकाणीं साहजिकपणें काम उसळणें अगदीं स्वाभाविक आहे. निसर्गच हा म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं.

हीं तीन द्वारें ज्यानें अजिबात थोडींसुद्धां मोकळीं न ठेवतां संपूर्णच बंद करून टाकलीं आहेत म्हणजे केवल एक आत्मदृष्टीनेंच जो सर्वांना बघतो, स्त्रीपुरुषात्मक नुसती देहदृष्टिहि ज्यानें अजिबात नष्ट करून टाकली आहे अथवा विवेकदृष्टि बाळगून सर्व स्त्रियांना मातृदृष्टीनें पाहण्याची शपथ-प्रतिज्ञा ज्यानें केली आहे; ( त्यांतूनहि नुसती शपथ घेऊन अथवा प्रतिज्ञा करूनहि भागत नाहीं. पुराला वाळूच्या बांधाचा जसा उपयोग होत नाहीं, त्याप्रमाणेंच बलिष्ठ कामविकाराच्या असह्य आघातापुढें त्या प्रतिज्ञा पार नष्ट होऊन अशीं स्त्रीपुरुषें भ्रष्ट झाल्याचीं बरींच उदाहरणें आमच्यापुढें आहेत. तेव्हां – ) केलेली प्रतिज्ञा अथवा शपथ शेवटपर्यंत तडीस नेण्याचें भीष्मसामर्थ्य ज्याच्या ठिकाणीं आहे, तत्त्वज्ञानाच्या

अभ्यासानंतर आत्मसाक्षात्कार होऊन त्या आत्मलाभानें अविनाशी आनंदरूपच जो झाला, त्याला मात्र या मृत्यूचें भय मुळींच उरत नाहीं त्याला कामविकार कधीं होतच नसल्यामुळें कामविकारानें कधीं भ्रष्ट होण्याची भीतीहि त्याच्या बाबतींत असत नाहीं. 'शाश्वतास शोधीत गेला। तेणें ज्ञानी साच जाला। विकार सांडून मिळाला। निर्विकारीं ॥ (दा. १५–१०–२५). बीज अग्नीनें भाजलें। त्याचें वाढणें खुंटलें। ज्ञात्यास तैसें जालें। वासनाबीज ॥ २८ ॥' ज्यानें आत्मानात्मविवेक करून अशा रीतीनें तात्त्विक आत्मदृष्टि आंगवळणीं पाडून घेतली आहे, त्याला मात्र दग्धबीजन्यायानें स्त्रीसहवास बाधूं शकत नाहीं, हें उघड आहे. एरवीं इतरांच्या बाबतींत निश्चयानें सांगणें कठीण. विकार जागृत होण्यासारखें स्त्रियांचें बोलणें व सर्व हावभाव स्वाभाविकपणेंच असतात. पुरुषांच्या ठिकाणचा गुप्त कामविकार जागृत करण्याचें स्त्री म्हणजे कामाच्या हातीं असलेलें जणूं एक ईश-निर्मित शस्त्रच आहे म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. इतर विषाचा परिणाम तत्स्पर्शानें व तत्पानानें होत असल्यास, या विषाचा परिणाम नुसत्या दृष्टिपातानें होतो; अन्य मद्याच्या पानानें मद चढत असल्यास या मद्याची दृष्टादृष्ट झाली तरी मद चढतो; इत्यादि प्रकारचीं पुष्कळ वर्णनें आहेत. म्हणून सापाशीं खेळावयाचें असेल तर गरुडच व्हावयाला पाहिजे अथवा तशी बीजशुद्धीची गरुडरेषा तरी हातावर असली पाहिजे किंवा तशाच सिद्धाकडून गरुडमंत्राचा उपदेश तरी असला पाहिजे; नाहीं तर पूर्वपुण्याच्या प्रतापानें दंश न होण्याचा तसाच बलिष्ठ योग तरी एक पाहिजे. एरवीं सापाशीं खेळत रहाणें शक्य नाहीं हें उघड आहे.

श्रीसीतामाता लक्ष्मणाच्या मांडीवर झोपल्या असतांना श्रीराम पोपटाच्या वेषानें तत्त्वनिदर्शनार्थ विचारतात – लक्ष्मणा! 'मनो धावति सर्वत्र मदोन्मत्तगजेन्द्रवत्। अङ्कस्थिता परस्त्री चेत्कस्य नोच्चलते मनः ॥' पुढें

दिसावयालाहि नको, मन सारखें उन्मत्त गजाप्रमाणें इकडे तिकडे स्वतः आपणहून धांव घेत फिरत असतें. परस्त्री प्रत्यक्ष मांडीवर झोपली असतां मनांत काय नाहीं येणार, कोणाचें मन विकारी होणार नाहीं ? 'पुष्पं दृष्ट्वा फलं दृष्ट्वा दृष्ट्वा स्त्रीणां च यौवनम् । त्रीणि रत्नानि दृष्ट्वैव कस्य नोच्चलते मनः ॥' लक्ष्मणा ! सुंदर सुवासिक गोड पुष्प, फळ आणि स्त्रियांचें यौवन अशीं हीं तीन रत्नें पाहून कोणाचें मन पाघळणार नाहीं, सांग. यावर लक्ष्मणानें दिलेलें उत्तर तत्त्वद्योतक असें मोठ्या बहारीचें आहे. 'मनो धावति सर्वत्र मदोन्मत्तगजेन्द्रवत् । ज्ञानाङ्कुशे समुत्पन्ने तस्य नोच्चलते मनः ॥' उन्मत्त गजाप्रमाणें इकडे तिकडे भटकण्याचा जरी या मनाचा स्वाभाविक अभ्यास असला तरी ज्याच्याजवळ ज्ञानांकुश असेल त्याला भिण्याचें कारण नाहीं. परस्त्री मांडीवर झोपली असली तरी त्याचें मन यत्किंचितहि विचलित होणार नाहीं. 'पिता यस्य शुचिर्भूतो माता यस्य पतिव्रता । द्वाभ्यां च यस्य संभूतिस्तस्य नोच्चलते मनः ॥' ज्याचा पिता शुचिर्भूत असतो आणि जननी ( आई ) पतिव्रता असते, अशा शुचिर्भूत जननी-जनकापासून निर्माण झालेल्याचें ( श्लोकांतल्या चकारानें ) व लहानपणापासून चांगले संस्कार झालेल्याचें, पुढेंहि सत्संगांत राहिलेल्याचें मन मात्र या तिन्ही रत्नांना बघून निर्विकार असतें, असा या श्लोकाचा अर्थ आहे. मीं कीर्तनांत ऐकलेली ही गोष्ट आहे. इथलें तत्त्व घेण्यासारखें आहे यांत शंका नाहीं.

'कान्ताकटाक्षविशिखा न खनन्ति ( लुनन्ति ) यस्य । चित्तं न निर्दहति कोपकृशानुतापः ॥ कर्षन्ति भूरिविषयाश्च न लोभपाशैः । लोकत्रयं जयति कृत्स्नमिदं स धीरः ॥' ( भर्तृ. नी. श. १०७) यावर वामन पंडितांची समश्लोकी आहे ती देतों – 'कांताकटाक्षशर हे रुतती न ज्याला । जाळी न कोपज हुताशनही जयाला । ज्याच्या मनीं न जडती विषयादि पाश । तो धीर जिंकिल जगत्त्रय सावकाश ॥' – स्त्रियांचे

कटाक्षबाण ज्याच्या हृदयास भेदीत नाहींत; क्रोधाग्नि ज्यास जाळीत नाहीं; ज्याला विषयांचे पाश स्पर्शूच शकत नाहींत; तो निर्भय त्रैलोक्यास जिंकतो. त्रैलोक्य त्याच्या चरणीं लागतें. हा भर्तृहरीचा नीतिशतकांतला श्लोक निःस्पृहाचें यथार्थ वर्णन नाहीं का करीत ? विरक्त असे धीर, वीर पाहिजेत. वैराग्याची स्थिति अशी बळावल्याशिवाय, वैराग्य काय, त्याची आवश्यकता किती आहे, याची जाणीवहि नसतांना, ज्ञानाचा गंधहि नसतांना ' समत्व समत्व ' म्हणून स्त्रीपुरुषांचा, तरुण मुलामुलींचा सर्रास चालू असलेला एकत्र वास ... ईश्वर करो आणि शीलवर्धक आणि आत्मोन्नतिकारक आणि तसाच सर्वतोपरी राष्ट्रास लाभकारी होवो.

' नाना पुरुषांचे जीव। नाना स्त्रियांचे जीव येकचि परी देहस्वभाव। वेगळाले ॥ ( दा. १७—२—२० ) सगट विचार तो अविचार। कित्येक म्हणती येकंकार। येकंकार भ्रष्टाकार। करूं नये ॥ ( दा. २०—७—३० ) सकळ अवगुणांमधें अवगुण। आपले अवगुण वाटती गुण। मोठें पाप करंटपण। चुकेना कीं ॥ ( दा. १९—८—८ ) ईश्वरें नाना भेद केले। भेदें सकळ सृष्टी चाले। आंधळे परीक्षवंत मिळाले। तेथें परीक्षा कैंची ॥ ( दा. १७—१०—२० ) अमृत विष येक म्हणती। परी विष घेतां प्राण जाती। कुकर्में होते फजिती। सत्कर्में कीर्ति वाढे ॥ ( दा. १७—१०—२८ ) जोंपर्यंत अग्निस्तंभनविद्या माहीत नसते तोंपर्यंत अग्नि काय करतो म्हणून जळत्या आगींत उडी घेण्याचें साहस दैवी सामर्थ्याशिवाय इतरांना मृत्युरूप आहे, हें जाणून मर्यादेनें दूर राहिलेलें बरें !

श्रीतुकाराम महाराजांकडे वाईट हेतूनें आलेल्या एका स्त्रीला त्यांनीं दिलेलें उत्तर पहा : पराविया नारी रखुमाईसमान। हें गेलें नेमून ठायींचेंचि ॥ १ ॥ जाई वो तूं माते न करीं सायास। आम्ही विष्णुदास नव्हों तैसे ॥ २ ॥ न सहावे मज तुझें हें पतन। नको हें वचन दुष्ट वदों ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार। तरी कां इतर लोक थोडे ॥ ४ ॥ ( तुका-

राम-गाथा – ४०५२ ) त्यांनीं या बाबतींत साधकांना स्वतःचें निमित्त करून स्पष्ट इशाराच देऊन ठेवला आहे : स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या ॥ १ ॥ नाठवे हा देव न घडे भजन। लांचावलें मन आवरे ना ॥ २ ॥ दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें। लावण्य तें खरें दुःखमूळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जगीं अग्नि झाला साधु। परी पावे बाधु संघटणें ॥ ४ ॥ ( तुकाराम-गाथा – ४०५३ ).

## कामजयासाठीं उपाय

अलीकडच्या काळांत चांगला आदर्श नाहीं, तसें शिक्षण नाहीं आणि आईबापांचें लहानपणापासून तसें तीव्र वळण नाहीं. हें सर्व कांहीं कांहीं ठिकाणीं असूनहि वेळीं मन आवरून धरण्याचें धैर्य नि सामर्थ्य नाहीं. एकदां काळ्या यादीमध्यें नांव गेलें म्हणजे पुढें सुधारला तरी तो ठपका त्याच्या जीवनभर असतोच. ही जीवनाचीच बाजी आहे. एकदां हरलें म्हणजे गेलें. जरी एखादे वेळीं काळेंबेरें गुप्त राहिलें तरी त्याचें मन त्याला खाल्ल्याशिवाय राहणार नाहीं. ' गुणवदगुणवद्वा कुर्वता कार्यमादौ। परिणतिरवधार्या यत्नतः पण्डितेन ॥ अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्तेः। भवति हृदयदाही शल्यतुल्यो विपाकः ॥ ( भर्तृहरि नी. श. ९९ ) शहाण्या मनुष्यानें कांहींहि करावयाचें झाल्यास, तें प्रारंभीं चांगलें अथवा वाईट कसेंहि दिसो, त्याच्या परिणामाचा चांगला विचार करून मग त्यांत पडावें. विकारवश होऊन अथवा विचार न करतां एकदम केल्या गेलेल्या कर्मांचा परिणाम अस्तनींतल्या निखाऱ्याप्रमाणें आंतल्या आंतच दाहक, चंद्राप्रमाणें जीवनालाच कलंक आणणारा आणि मरेपर्यंत हृदयांत रुतलेल्या बाणासारखा सलणारा होतो. सर्वच मानवजात भाऊबहिणीप्रमाणें स्वेतर स्त्रियांशीं शील सांभाळून राहिलेली बघण्याचें भाग्य मला लौकरच येवो, म्हणून मी ईशचरणीं प्रार्थना करीत आहें.

'कामाचें वळलें शरीर।' तें असेंपर्यंत म्हणजे देहाभिमान असेपर्यंत अगदीं सामान्यांना काम असणारच. यासंबंधीं 'भोज-प्रबंधां'त एक मोठी मार्मिक गोष्ट आलेली आहे: भोजराजानें एका रात्रीं एक अति वृद्ध सतिपतीचें जोडपें पाहिलें. राजानें दुसऱ्या दिवशीं त्या वृद्ध जोडप्याला बोलावणें पाठविलें. राजाचें बोलावणें कशासाठीं आलें आहे, हें त्या जोडप्याच्या लक्षांत आलें. त्या वृद्ध जोडप्यानें राजासमोर जातांच त्याच्यापुढें दोन पुड्या ठेवल्या. राजानें पुड्या सोडून पाहिल्या तों एकींत तांदुळाचा एक दाणा आणि दुसरींत चिमूटभर राख असलेली आढळून आली. राजानें साहजिकच विचारलें कीं, "हें तुम्हीं काय आणलें आहे?" त्या जोडप्यानें उत्तर दिलें, "राजा, पुरुषाच्या पोटांत अन्नाचा एक दाणा जाईपर्यंत आणि स्त्रीच्या देहाची जळून राख होईपर्यंत दोघांनाहि काम सुटत नाहीं, एवढाच या दोन पुड्यांतल्या वस्तूंचा अर्थ आहे."

कोणत्याहि प्रश्नाला दोन बाजू असतातच; तेव्हां प्रत्येक गोष्ट साधकबाधक प्रमाणांनिशीं आपल्याला समजून घेतली पाहिजे. निसर्ग काय आहे, आम्हांला त्यांतून आपल्या उद्धाराकरितां कसें वागलें पाहिजे, साधावयाचें काय आहे, जग आपल्या सत्यरूपानें कसें आहे, औपाधिक-रूपानें कसें आहे, कोणत्या जातीच्या प्राण्याबरोबर, त्याचे गुणधर्म ओळखून आपल्याला त्याच्यापासून इजा न होऊं देतां, कसें वागलें पाहिजे, त्याचे गुणधर्म काय, या सर्वांचा विचार करावयास पाहिजे. कांहीं ग्रंथांच्या साहाय्यानें, कांहीं दुसऱ्यास विचारून, कांहीं पाहून, तितकें अपायाचें नसलेलें स्थालीपुलाकन्यायानें 'शितावरून भाताची परीक्षा' या म्हणी-प्रमाणें कांहीं अनुभवून शहाणें व्हावयाचें असतें. 'येक शीत चांचपावें। म्हणिजे वर्म पडे ठावें। तैसें थोड्या अनुभवें। बहुत जाणावें॥' (दा. १३–६–७) देहाभिमान असेपर्यंत कामाचा प्रवेश होतो, हें

ओळखून रजरेताच्या देहाला मी म्हणून मानण्याचें टाकून दिलें कीं कामाचा त्याग आपोआप होतोच. देहाला मी म्हणण्याचें एकदां नाहींसें झालें कीं, कोणी आपल्याला स्त्री म्हणूनहि मानणार नाहीं आणि पुरुष म्हणूनहि मानणार नाहीं. स्त्री-पुरुषांची भावनाच नष्ट झाल्यानंतर स्त्री-पुरुष अशा भावनांतून दडत असलेला कामहि त्याच्याबरोबरच नष्ट होतो. मी पुरुष देह नव्हे, मी स्त्री देह नव्हे, असें अनुभवास आल्यानंतर कोणालाहि कोणाची इच्छा काय म्हणून होईल ? तेव्हां देहाभिमानाचा त्याग हा कामजयाचा मुख्य उपाय आहे. त्याचा समूळ सबीज त्याग म्हणजेच मोक्षमार्गाची प्राप्ति हें प्रत्येकानेंच जाणावयाला पाहिजे. मोक्षाकरितांच सर्वस्वाचा त्याग केलेल्या निःस्पृहांतून तर याचा निश्चय असावयालाच पाहिजे. आपलाच उद्धार आपल्याला करावयाचा आहे. आपल्या हिताकरितां म्हणून शत्रुतुल्य असणाऱ्या देहाभिमानाला, इंद्रियमनाला आणि कामाला जिंकावयास पाहिजेच.

' एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना । जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ( भ. गी. ३–४३ ) ' मी ' या स्फुरणाच्या पूर्वीचेंच निर्विकल्प, कोणतेंहि स्फुरणरहित तुझें एक आनंदघनरूप आहे असें जाणून तुला अखंड स्वरूपांत राहून कसलीहि स्फूर्ति उठूं न देतां या कामरूप शत्रूला, जो देहाभिमान्यांना अजिंक्य वाटतो त्याला, तूं जिंक. भगवंतानें सर्व मोक्षसाधकांनाच हें सांगितलें आहे. त्यांतूनहि जिंकण्याच्या उद्देशानेंच घरांतून कूच करून निघालेल्या निःस्पृह वीराला तर मुद्दाम सांगावें म्हणून कामजयाची ही युक्ति भगवंतांनीं सांगितली.

## कांहीं साधकांचीं उदाहरणें

कोणाचें वस्त्र मळलेलें असूं नये. जर का मळलेंच तर मळलेल्या वस्त्रावरचा डाग आणि स्वच्छ वस्त्रावरचा डाग यांत अंतर आहे म्हणून निःस्पृहांनीं फार जागरुकीनें अलीकडच्या काळांत वागावें.

मला एका साधकानें आपली एक हकीगत सांगितली होती. प्रस्तुत साधक प्रवासांत असतांना एका घरीं उतरला होता. त्या घरांतील अविवाहित तरुण मुलीनें या साधकाशीं कामचेष्टेला सुरुवात केली. तेव्हां त्या साधकानें फार शौचाला लागल्याचें निमित्त करून केवळ आपल्या कमंडलूसह तेथून पाय काढला. प्रवासांतील भाड्याचे पैसे, अंथरूण-पांघरूण याची पर्वा न करतां तो तेथून त्या अमावास्येच्या अंधारांतून ऐन मध्यरात्रीं खूप दूरवर पळत गेला आणि त्यानें त्या संकटांतून आपली सुखरूप सुटका करून घेतली.

'धर्मेण निधनं श्रेयः ।' धर्माचें कांटेकोर रीतीनें पालन करीत असतां चुकून मृत्यु आला तरी तो मृत्यु मुक्ति देतो. 'धर्मो रक्षति रक्षितः ।' धर्माचें रक्षण करणाऱ्याचें धर्महि रक्षण करतोच. 'यतो धर्मस्ततो जयः ।' धर्माबरोबरच जय वागत असतो. 'न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेर्ज्जीवितस्यापि हेतोः ।' कामानें, भयानें, लोभानें किंबहुना जगण्याच्या हेतूनेंहि क्वचित् देखील धर्माचा त्याग करूं नये. ऐहिक सुख क्षणभंगुर असून नरकाचें साधन आहे. धर्म हा आपला कायमचा साथीदार असून मोक्षाचें साधन आहे. मला विचारलें तर, 'धर्माकरितां प्राण द्या, पण अधर्माकडे वळून देखील बघूं नका' म्हणूनच मी सांगेन आणि तसेंच स्वतः वागेनहि. धर्माकरितां प्राण दिल्यास पुढें तरी सुख आहे. अधर्मानें कुठेंच आणि कधींच सुख म्हणून मिळत नाहीं. 'बुडत्याचा पाय खोलांत.' पुन्हा अधिकाधिक पातकें करून मोठमोठ्या नरकांचाच तो भागीदार होत असतो. 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ।'

वरच्या एका गोष्टीप्रमाणें अनेक गोष्टी माझ्या कानांवर आल्या आहेत. कांहींना तशा प्रसंगीं थोडा सुद्धां विकार न उत्पन्न होतां ती बया ओशाळून परत गेलेल्याचीं, कांहींनीं अनेक प्रयत्नांनीं चुकविल्याचीं उदाहरणें आहेत. 'मन गया तो जाने दो। मत जाने दे शरीर ।'—

मन गेलें तर जाऊं दे, पण शरीर मात्र जाऊं देऊं नको. मनांत केवळ एखाद्याचा खून करावा म्हणून आलें तर त्याला कांहीं फांशीची शिक्षा होत नाहीं; प्रत्यक्ष कृति घडल्यासच शिक्षा. या तत्त्वाप्रमाणें विचार करून देह तिकडे जाऊं न देतां प्रसंग निभावून नेल्याचीं उदाहरणेंहि माझ्या कानांवर बरींच आलीं आहेत. तेव्हां साधकांनीं या बाबतींत जागें रहावें. 'आंधळें पाउलीं ओळखावें।' धोरणानें सर्व ओळखून आपली उज्ज्वल तेजस्विता बाणेदार वृत्तीनें कायम ठेवावी. 'तुझ्या देहाची घाण तुला अजूनपर्यंत वाटली नाहीं काय? तुझ्या देहाची तुलाच घाण वाटल्यानंतर तुझ्या देहाचें सौंदर्य बघून मला भोगेच्छा कशी बरें होईल?' म्हणून एका साधकानें विचारलेलेंहि मीं ऐकलें आहे. दुसऱ्या एका साधकानें 'नख, केश, चर्म, मांस, रक्त, स्नायु, अस्थि, मल, मूत्र, कफादिकांपैकीं स्त्री म्हणून तूं कोण आहेस तें प्रथम सांग आणि मग तुला काय बोलावयाचें तें बोल!' म्हणून आपली सुटका करून घेतली, असेंहि समजलें.

बंगालमध्यें, कालीमातेची आराधना करीत ब्रह्मचर्यानें राहणारीला भरवी असें म्हणतात. अशी एक भैरवी यात्रेला म्हणून निघाली असतां एका दाट अरण्यांतल्या रस्त्यांतून जाण्याचा तिला प्रसंग आला. एकटीला बघून यवनांनीं तिला घेरली. तेव्हां खालीं बसून तिनें श्रीकालीमातेचें ध्यान केलें मात्र, इतक्यांत त्या यवनांना कालीचें अत्यंत भीषण रूप दिसून पळून जातां जातां भुई थोडी झाली, म्हणून एकानें मला सांगितलें. अशा या भैरवी दुसरे सर्व उपाय हरल्यानंतर पोटांत खुपसून घेऊन प्राण देण्याकरितां आपल्याजवळ सतत एक सुरा बाळगून असतात, असेंहि तो म्हणाला.

## सद्यःकालीन दुःस्थिति

रोगाची सांथ म्हणून जशी येते त्याप्रमाणें अलीकडे कामाची सांथ आली आहे असें वाटतें. सांथीप्रमाणचें तिच उच्चाटण करण्याचीं

औषधेंहि प्रचारांत आणलीं पाहिजेत. याचें मुख्य कारण म्हणजे मुलींचा हद्दीच्या बाहेरचा प्रौढ विवाह. ऋतुमती झाल्यानंतर मुलींना अविवाहित ठेवणें बरें नव्हे; तें धोक्याचेंच आहे. 'वृषली' हें नांव देऊन पुढच्या धोक्याची सूचना पालकांना धर्मशास्त्रानें देऊन ठेवली आहे. समाजाचा कांहीं ठिकाणीं जो अगदीं विचका झाला आहे, तो या शारदा बिलानें. जर लौकर मुलींचें लग्न केलें नाहीं तर कांहीं अपवाद सोडून काम त्यांना न आवरतां त्या 'पुमानित्येव भुञ्जते।' जात, गोत, तरुण, म्हातारा, सुंदर, कुरूप कसलाहि विचार न करतां नुसत्या पुरुषत्वाचाच विचार करून कोणाशींहि रत होतात, असें सांगितलें आहे. ( मनु. ९–१४ ) मीं सांगावें असें नाहीं. डोळसांना समाजांत काय चाललें आहे तें दिसतेंच आहे. समाजाची फार शोचनीय स्थिति आहे. माझ्या कानांवर आतांपर्यंत आलेलें आहे. इतःपर अशा गोष्टी घडूंहि नयेत आणि माझ्या कानांवर येऊंहि नयेत म्हणून त्या दयामय धर्मप्रभु श्रीरामचरणीं माझी प्रार्थना आहे. बिल १४ वर्षांच्या वयाचा प्रतिबंध घालीत असलें, तर पालकांकडून २५-३० वर्षांपर्यंतहि लग्न केलें जात नाहीं. मुलगी बी. ए., एम्. ए. व्हावी म्हणून काल घालवितात. कांहींना द्रव्याचें अनानुकूल्य असतें. द्रव्याचें अनानुकूल्य आहे अशांना, माझ्याकडे आल्यानंतर थोडाहि वेळ न घालवितां, पैसे नसले तरी कर्जाऊ घेऊन तत्काळ दिले आहेत. या बाबतींत माझें अंतःकरण अगदीं होरपळून निघालें आहे. मुलांनाहि मुलगी बी. ए., एम्. ए.च असावी लागते. हुंड्याचीहि एक घातुक चाल आहेच.

थोडी सूट दिली कीं, शेवटल्या थराला जाऊन पोहोंचणें हा समाजाचा एक स्वभाव आहे. परस्परावलंबी ऐहिक पारलौकिक हित समाजाला कायदे करून साधून देण्याची जबाबदारी राज्यधुरा वाहणाऱ्यांवर प्रजेच्या पित्याच्या नात्यानें येऊन पडते, हें सरकारनें खरोखरी ओळखलें आहे काय? ओळखीत असेल तर अजून तिकडे त्यांनं

आपलें लक्ष विशेष पुरवावें. 'आधींच उल्हास, त्यांतून फाल्गुनमास' म्हटल्याप्रमाणें एकत्र शिक्षण, एकत्र नोकरी, त्यांतूनहि आगींत तेल ओतल्याप्रमाणें विवाहाचे इतर कायदे – कसलाहि निर्बंध नाहीं. 'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला' हा श्लोक येथें सबंध आठवतो. सध्यां 'यद्वा तद्वा भविष्यति' असें झालें आहे. 'कंदर्पदर्पदमने विरला मनुष्याः।' कामाच्या उद्दाम दर्पाचें दमन करणारीं माणसें विरळा, असें राजा भर्तृहरीचें वचन आहे. आढळून आलेल्या कांहीं उदाहरणांवरून सांगावयाचें झालें तर भाऊ-बहीण यासारख्या शुद्ध भावनेंतूनच प्रथम प्रथम या युवक-युवतींच्या प्रेमाचा उगम झाला असला, तरी पुढें पुढें कालमानाप्रमाणें व निसर्गानें दुष्ट कल्पनांचे नाले त्या प्रवाहाला मिळून त्याचें विकृत रूप भ्रष्ट करण्यांत आणि भ्रष्ट होण्यांत परिणाम पावलेलें आढळून आलें आहे. 'अग्निकुंडसमा नारी घृतकुंभसमो नरः। संसर्गेण विलीयेत तस्मात्तां परिवर्जयेत्'॥ असें अवधूतगीतेंत श्रीदत्तांनींच सांगितलें आहे. स्त्री ही अग्निकुंडासारखी आणि पुरुष हा घृतकुंभासारखा असल्यामुळें केवळ सान्निध्यानेंच पाघळणें संभवनीय आहे. त्यामुळें सान्निध्य टाळावें.

सर्वांचेच अधिकार सारखे नसतात. नियम हे सर्वसाधारण माणसांच्या धोरणानें आंखलेले असतात; एकच नियम सर्वांना लागू पडत नाहीं. पूर्वार्जिताप्रमाणें स्वभाववैचित्र्य असतें. उत्तम जरी असला तरी एक आचार सर्वांच्या पथ्यीं पडत नाहीं. 'न हि सर्वहितः कश्चित् आचारः संप्रवर्तते।' सर्वांच्याच भूमिका एकसारख्या नसल्यामुळें त्या त्या भूमिकेच्या माणसांनाहि मार्गदर्शन होण्याकरितां निरनिराळा उपाय सांगून ठेवावा लागतो, निरनिराळे पण शास्त्रीयच आचार सांगावे लागतात.

तत्त्वज्ञान अखंड, एक, आनंदस्वरूप बघण्यास सांगत असतां याच्याशीं करावयाचेंच काय, असें जर कोणी म्हणेल, तर तें अगदीं बरोबर आहे आणि त्याची नेष्ठा आम्हांला अपेक्षी आहे. विमानानें

जाणाऱ्याला जमिनीवरच्या रस्त्याची माहिती घेऊन करावयाचें काय आणि त्याला ती माहिती देतो तरी कोण ? तितकी साधनसंपत्ति नसतांना त्यांना अशीं हीं विघ्नें आड येऊं नयेत आणि त्यांत ते बेसावध राहून फसूं नयेत, या दृष्टीनें सांगून ठेवावयाचें. विघ्नें यावींत अशी अपेक्षा नाहीं आणि प्रत्येकाला तशीं येतात असेंहि नाहीं. समाज रोगी व्हावा म्हणून औषधें करावयाचीं नसतात. रोग झालेल्यांच्या उपयोगार्थ म्हणून तीं असतात. खडकाळ प्रांतांतून जाणाऱ्याला ठेच लागली तर वाणेरीच्या अथवा एकदांडीच्या पाल्याचा रस पीळ म्हणजे रक्त थांबतें म्हणून सांगून ठेवावयाचें. वेळीं उपयोग झाला तर झाला; तशी वेळ आली नाहीं तर कोण तो पाला पाहावयाला जातो ? 'प्रयोजनमनुद्दिश्य न मन्दोऽपि प्रवर्तते ।' प्रयोजन आहे असें वाटल्यास प्रवृत्ति, नाहीं तर निवृत्ति. स्वेतर पदार्थांतून असणारी प्रयोजनदृष्टि घालवून स्वमात्र आनंदरूपानें असणें ही आत्मनिष्ठा. यानें अनंत आनंदरूप स्वतःच होतो. 'काम एष क्रोध एष ज्ञानिनो नित्यवैरिणः ।' कामक्रोध ज्ञान्यांचेहि वैरी, असें भगवंताच्याच मुखांतून आल्यानंतर इतरांचे तर ते आहेतच आहेत, हें कैमुक्तिकन्यायानें सहज सिद्ध होतें. या प्रतिपक्षाचें सामर्थ्य ओळखून याला जिंकण्याकरितां याच्या दसपट अशी जय्यत तयारी आपली पाहिजे कीं, आपल्याला पाहिल्याबरोबर याची गाळण उडून जावी; मग पुढें यावयाला कशाला धजेल तो बिचारा काम !

## गृहस्थाचा धर्म

ज्यांना गृहस्थाश्रमाची इच्छा असते, त्यांचें लग्न लौकर करून टाकावें; आणि कुलाची, राष्ट्राची, धर्माची आणि आपल्या नीतिमान् पूर्वजांची अब्रू राखावी. वैराग्याभावीं अथवा संयमाभावीं अधिक काळ त्यांना अविवाहित ठेवणें म्हणजे डोळसानें मुद्दाम डोळे झांकून वागल्यासारखें

आहे. सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः ॥' भ्रष्ट होऊन इहपर दोन्ही घालविण्यापेक्षां विध्युक्त लग्न करून ऐहिक प्रथम साधून त्यांतून क्रमाक्रमानें परमार्थ साधणें कोटिपट बरें. 'किती प्रपंची जन। अखंड वृत्ति उदासीन। सुखदुःखें समाधान। डंडळेना॥' (दा. १९–८–२) 'काम्ये मतिस्त्यज्यताम्। पापौघः परिधूयताम्। भवसुखे दोषोऽनुसंधीयताम्। आत्मेच्छा व्यवसीयताम्॥' काम्य कर्म टाकावें, निष्काम कर्म करावें, सदनुष्ठानानें व सदाचरणानें पापांचें क्षालन करावें, देहसुखाच्या ठिकाणीं असलेल्या दोषांची कल्पना मनाला वारंवार आणून देत असावें, आत्मप्राप्तीची इच्छा वाढवीत जावें, असा श्रीशंकराचार्यांनीं गृहस्थाश्रमांत राहून परमार्थ साधण्याचा मार्ग 'साधनपंचकां'त सांगितला आहे. 'द्वाविमावथ पन्थानौ यत्र वेदाः प्रतिष्ठिताः। प्रवृत्तिलक्षणो धर्मो निवृत्तिश्च विभावितः॥' गृहस्थाश्रमालाहि वेदांची संमति आहे. वेदोक्त असे प्रवृत्ति आणि निवृत्ति असे दोनच मार्ग आहेत. 'परदारेष्वसंसर्गो धर्मस्त्रीपरिरक्षणम्। अहिंसा सत्यवचनं सर्वभूतानुकम्पनम्। शमो दानं यथाशक्तिर्गार्हस्थो धर्म उच्यते॥' परस्त्रियांच्या ठिकाणीं मातृबुद्धि, परधनाच्या ठिकाणीं विषबुद्धि, निषिद्ध कर्माच्या ठिकाणीं मृत्युबुद्धि ठेवून वागणें; आपल्या बायकामुलांचें आणि परिवाराचें रक्षण करणें; अहिंसा, सत्य, भूतदया पाळणें; क्रमानें मनाचा आणि इंद्रियांचा जय संपादणें; यथाशक्ति दान करणें; कृतज्ञता व नम्रता बाळगणें; कुलधर्म-कुलाचार पाळणें; वर्णाश्रमाचे नियम आचरणांत ठेवणें; देव-पितृकार्य करणें; ब्राह्मण असल्यास शिखा, यज्ञोपवीत बाळगणें; स्नान-संध्या, जप-पूजा, ब्रह्मयज्ञ, नैवेद्य-वैश्वदेव करणें व अतिथि-अभ्यागताला अन्न देणें; कांहीं स्वाध्याय राखणें; वैदिक संस्कार, आर्यसंस्कृति टिकविणें; सर्वांशीं गोड असणें; मृदु मधुर बोलणें; घरीं आलेल्यांचें आदरातिथ्य करणें; सार्वजनिक कार्यांत यथाशक्ति भाग घेणें; गुरु आणि देव यांच्या

ठिकाणीं सदैव पूज्यभाव राखणें आणि विश्वास बाळगून अनन्यभावानें यांची सेवा सदैव करीत रहाणें; आपण गृहस्थाश्रमांत पडलों, परमार्थ साधल्याशिवाय जन्म व्यर्थ, म्हणून परमार्थाकरितांहि कसोशीनें प्रयत्न करणें; समुद्राप्रमाणें गांभीर्य बाळगणें; आपत्कालीं धैर्य ठेवणें; हानिलाभाच्या ठिकाणीं समत्व बाळगणें; त्या त्या वेळीं त्या त्याप्रमाणें ध्येयाच्या पूर्ती-करितां अचूक यत्न करणें; उपाय योजणें; न्यायनीतिनें धन संपादणें; सद्वस्तूंचा संग्रह करणें; हा थोडक्यांत गृहस्थाचा धर्म आहे.

'सत्य बचन अरु लींनता परस्त्री मात समान। इन तीनोंसे हरि ना मिले (तो) तुलसीदास जमान॥' खरें बोलणें, लीनता बाळगणें आणि परस्त्रियांना आईप्रमाणें लेखणें या तीन साधनांनीं जर श्रीहरीची प्राप्ति झाली नाहीं, तर याला श्रीतुलसीदासजी जामीन रहावयाला सिद्ध आहेत.

रात्रंदिस मन राघवीं असावें। चिंतन नसावें कांचनाचें॥ कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन। जन्मासी कारण हेंचि दोन्ही॥ दोन्ही नको धरूं नको निंदा करूं। तेणें हा संसारू तरशील॥ तरशील भवसागरीं बुडतां। सत्य या अनंताचेनि नामें॥ नामरूपातीत जाणावा अनंत। दास म्हणे संतसंग धरा॥ (समर्थगाथा : ५६२) 'प्राणाघाता-न्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्यम्। काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभावः परेषाम्॥ तृष्णास्रोतो विभङ्गो गुरुषु च विनयः सर्वभूतानुकम्पा। सामान्यः सर्वशास्त्रेष्वनुपहतविधिः श्रेयसामेष पंथाः॥' (भर्तृ. नी. श. २६) अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा॥ (भ. गी. १५–३), ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः।' (भ. गी. १५–४).

खोल रुजलेला हा अशाश्वत संसारवृक्ष आपण नित्य असंग आहों या ज्ञानशस्त्रानें, संसारांतल्या कोणत्याहि कर्मांचा लेप लावून न

३०३३४

घेतां, तोडावयाचा असतो. हा क्रमाक्रमानें आणि सांसारिक व्यामोह नाहींसा करून, जिथें जाऊन पोहोंचल्यानंतर पुनः जन्माची प्राप्ति होत नाहीं त्या परमात्मपदाच्याच केवळ शोधाकरितां आणि तत्प्राप्तीकरितां आपल्याला वाहून घेऊन मग संसार सोडून बाहेर पडावें. तोंपर्यंत संसारांत राहून होईल तो आत्माभ्यास करावा. 'असङ्ग-व्यवहारत्वाद्भवभावन-वर्जनात् । शरीरनाशदर्शित्वाद्वासना न प्रवर्तते ।' असंग व्यवहारानें जन्म-मरणाची भावनाच स्वरूपबोधानें एकदम नष्ट केल्यानें, शरीराला नाश आहे म्हणून सतत मनांत बाळगल्यानें वासना रहात नाहीं, असली तरी कार्यप्रवृत्त होत नाहीं, असें मुक्तिकोपनिषदांत सांगितलें आहे. (मु. उ. २–२८)

'सन्मार्ग तो जीवीं धरणें । अनमार्गाचा त्याग करणें । संसारिकां त्याग येणें । प्रकारें ऐसा ॥' (दा. ५–१०–२) प्रवृत्ति अथवा निवृत्ति यांपैकीं त्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें एक मार्ग निवडून त्यांतून ज्ञानवैराग्याचा अभ्यास करीत आत्मनिष्ठेचा अथवा मोक्षाचा रोख धरून जात असावें. क्रमानें संसारी निःस्पृह होणें ही त्याची उन्नति आणि क्रमानें निःस्पृह संसारी होणें ही त्याची अवनति, हें मात्र लक्षांत ठेवावें. भेदांतून अभेदाकडे, अनेकत्वांतून एकत्वाकडे क्रमानें जाण्याचा मार्ग प्रवृत्ति आणि अभेदरूप एकत्वांत, अद्वितीय आत्मस्थितींत सदाच रहाण्याचा मार्ग निवृत्ति, याची खूणगांठ बांधून असावें. 'सत्यचिद्घनमखण्डमद्वयं सर्वदृश्यरहितं निरामयम् । यत्पदं विमलमद्वयं शिवं तत्सदाऽहमिति मौनमाश्रय ॥' (वराह उ. ३–६) जगाचें सोलीव सत्यस्वरूप मी म्हणून, चिद्घन मी म्हणून, अखंड एकरस असणारा मी म्हणून, अद्वय मी म्हणून, दृश्यरहित सदाचाच दुःखशून्य मी म्हणून, जें विमल अद्वय आनंदरूप तेंच मी म्हणून मौन धारण कर. 'संत्यक्तवासनान्मौनादृते नास्त्युत्तमं पदम् ।' अखंड निर्वासन मनानें आनंदरूपांत समरसून जाऊन सदोदित

नितान्त तृप्तीनें मौन धारण करण्याहून श्रेष्ठपद दुसरें नाहीं, असें निःस्पृहांना श्रुति सांगते. तदनुषंगानें सर्वांनाच तो बोध क्रमानें लागू पडतो.

## मनोजयाचा मार्ग

'पञ्चविंशतिपर्यन्तं ब्रह्मचर्यं समभ्यसेत्। बलवान् शक्तिसंपन्नः शतायुस्तु भविष्यति ॥' पंचवीस वर्षांपर्यंत भावी सुखमय जीवनाच्या दृष्टीनें प्रत्येकानेंच अस्खलित ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे. जर या वयाच्या पूर्वीं वीर्यनाश झाला तर त्याचें शरीर, मन आणि इंद्रिय दुर्बल होतें. कशाचीहि धारणा टिकत नाहीं आणि मनाचा संयम साधतां येत नाहीं, तें ध्यानधारणेंत स्थिर करतांहि येत नाहीं. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हींलाहि तो अधिक प्रमाणांत मुकतो. मिळावयाच्या प्रमाणांत तें विषयसुखहि त्याला मिळेनासें होतें. पंचवीस वर्षांपर्यंत देह, इंद्रिय, धातु आदिकांची वाढ होत असते, तोंपर्यंत वीर्याचा सांठा झाला म्हणजे शरीर बलवान् होतें, दिव्य मानसिक शक्तिहि येते आणि तो शंभर वर्षांचा पूर्णायुषी होऊन पुढच्या जीवनांत सुखशांतीनें नांदतो पंचविस वर्षांनंतर प्रवृत्ति का निवृत्ति तें ठरवून प्रवृत्ति अथवा निवृत्तिमार्गाचा आश्रय करावा. 'पञ्चविंशे ततो वर्षे पुमान्नारी तु षोडशे।' सोळा वर्षेपर्यंत स्त्रीदेहाची आणि तद्वत् धातूची वाढ होत असते तोंपर्यंत ब्रह्मचर्यानेंच असावें. 'पूर्णषोडशवर्षा स्त्री पञ्चविंशेन संगता।' पंचवीस वर्षांपर्यंत अस्खलित ब्रह्मचर्यानें वागलेल्या पुरुषानें विध्युक्त लग्न करून स्वजातीय, सोळा वर्षांपर्यंत ब्रह्मचर्यानें वागलेल्या भार्येसह गृहस्थधर्म चालविला तर 'वीर्यवन्तं सुतं सूते।' — वीर्यवान् तेजस्वी संतति होते आणि संसारांतल्या सुखाच्या दृष्टानें संसारहि सुखाचा होतो.

'दर्शनं स्पर्शनं केलिः कीर्तनं गुह्यभाषणम्। संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेव च ॥ एतन्मैथुनमष्टाङ्गं प्रवदन्ति मनीषिणः ॥' ( कठरुद्र.

उ ५-८ ) हे श्लोक बऱ्याच ठिकाणीं आले आहेत. ( १ ) आकृष्ट होऊन स्त्रियांना पहातच उभें राहणें, पहातच बसणें, त्यांची आकृति मनापुढें आणणें; ( २ ) स्पर्श करणें; ( ३ ) त्यांच्याशीं थट्टामस्करी, विनोद करणें, त्यांच्याबरोबर पोहणें, खेळणें; ( ४ ) त्यांच्या रूपाचें, गुणांचें वर्णन करणें; त्यांच्या चालण्याची, बोलण्याची, हावभावाची नक्कल करणें; ( ५ ) एकांतांत बोलत बसणें; ( ६ ) त्यांच्याबरोबर अमुक करीन, तमुक करीन म्हणून मनांत संकल्प करणें; ( ७ ) विवाहादिकाचा निश्चय करणें; ( ८ ) आणि प्रत्यक्ष क्रियानिष्पत्ति – असें कमी-अधिक प्रमाणाचें आठ प्रकारचें मैथुनच मानलें आहे. अनुक्रमें सात-पर्यंतचीं हीं आठव्या क्रियानिष्पत्तीचीं सौम्य आणि तीव्र अशीं पूर्वपूर्व रूपेंच आहेत. यांपैकीं एक एक असलें तरी तें थोड्याफार काळांत शेवटच्या पायरीवर आणून सोडल्याशिवाय रहाणार नाहीं. तेव्हां भावी गृहस्थ होऊं पाहणाऱ्या तरुणानें कोणत्याहि विवाहित अथवा अविवाहित स्त्रीशीं, गृहस्थानें स्वेतर स्त्रीशीं अशा रीतीनें आचरण ठेवूं नये. यांत भ्रष्ट होण्याची अधिक शक्यता आहे.

निःस्पृह साधकानें यापासून चांगलाच बोध घ्यावा. त्याच्या ठिकाणीं हें मुळींच कांहीं असूं नये. स्त्री-चित्र पहाणें, स्पर्शणेंसुद्धां निःस्पृहानें करूं नये, अशा अर्थाचीं पुष्कळ वचनें आहेत. पुढच्यास ठेच, मागचा शहाणा, ही म्हण प्रत्येकानेंच लक्षांत ठेवावी.

एकपत्नीव्रत, पातिव्रत्य हें गृहस्थाश्रमाचें तप आहे. तें मोक्षार्थ्यानेंच काय, सर्वांनींहि पाळलेंच पाहिजे. स्त्रीपुरुषांतून असणारें अद्वितीय 'मी' हें परमात्म्याचें भान स्त्रीपुरुषांच्या भिन्नरूपानें सृष्ट्योन्मुख अशा या जगदात्म्याचाच बहुविध होण्याचा तो संकल्प संततिरूपानें पूर्ण करीत असतें. ' स एकाकी नैव रेमे......स द्वितीयमैच्छत् आत्मानमेव द्वेधाऽपातयत्। ' ( बृ. उ. अ. १ ब्रा. ४ ), ' सोऽकामयत द्वितीयो म आत्मा

जायेतेति।' (बृ. उ. अ. १ ब्रा. २–४) सृष्ट्युद्देशानें परमात्म्याचें एक मी भान द्विधा होऊन ज्या आपल्या दुसऱ्या एका आत्मरूपाची पिंड-ब्रह्मांडोपाधीनें इच्छा करतें, तेंच त्याचें दुसरें रूप म्हणजे स्त्री अथवा प्रकृति. विराट् पुरुषानें आपल्या एका देहाच्या डाव्या-उजव्या भागांपासून सतीपतींचीं जोडपीं निर्माण केलीं व त्यामुळेंच सतीपति हे एका देहाचे वाम-दक्षिण असे दोन भाग आहेत. म्हणून परस्परांच्या देहाच्या डाव्या-उजव्या भागाप्रमाणें दोघांनींहि एकदेहन्यायानें रहावें, असें अद्वितीय आत्मरूपाच्या प्राप्तीकरितां, एकत्वाचा निश्चय होण्याकरितां व भेदाच्या लयाकरितां धर्मशास्त्र गृहस्थांना सांगतें. ऐहिक आणि पारमार्थिक दोन्ही दृष्टीनें यांत कल्याण आहे. वामभागापासून स्त्री झाली असल्यामुळें सतीला वामा असें म्हणतात. गृहस्थाश्रमांतहि केवळ देहाकारानें परस्परांकडे न बघतां दोघांतल्या 'मी'पणाच्या यथार्थ अद्वितीय आनंदघन स्वरूपाची, आपल्या यथार्थ आत्मरूपाची, दृष्टि ठेवून त्याचेंच दर्शन परस्परांत घेत असलें म्हणजे वैषयिक दृष्टि क्रमाक्रमानें कमी होत होत दोघेंहि पुढें विरक्त होतात अद्वितीय 'मी' सती, पति आणि संतति यांतून गोचर होत असलेलें मनांत वागविलें म्हणजे क्रमेण गृहस्थाश्रमहि मोक्षाचें कारण होऊं शकतो. मीं लिहिलेल्या 'आर्य संस्कृति' या ग्रंथांत पान ३४४ ते ३७० पर्यंत याचेंच विस्तारानें वर्णन आहे. निःस्पृहाबरोबर ओघानें गृहस्थांनाहि थोडें मार्गदर्शन व्हावें, अविवाहित तरुणतरुणींना मनोजयाचा मार्ग मिळावा, या उद्देशानें इथें थोडा ओझरता उल्लेख केला एवढेंच. या संदेशांत आलेला ज्ञानवैराग्याचा भाग वाचल्यानें सर्वांनाच मार्गदर्शक होईल; गृहस्थाश्रम साधून थोडा थोडा अभ्यास करण्यास अनुकूल होईल.

## साधकाची अशी धारणा व्हावी

'न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः। न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता॥ एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन। माया-

मात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थता ॥ न स्त्री न पुमानेष न तु तदद्वितीयमस्ति ।' निरोधहि कसला नाहीं, कशाची उत्पत्तिहि झाली नाहीं, कोणीहि बद्ध नाहीं, कोणी साधकहि नाहीं, कोणी मुमुक्षुहि नाहीं आणि कोणी मुक्तहि पण नाहीं. सजातीय-विजातीय स्वगतभेदशून्य आपणच एक असें अद्वय ब्रह्म आहे. या ठिकाणीं अनेक असें कांहीं नाहीं. द्वितीयरूप आणि द्वैत हें केवळ खोटें भासतें. इथें एकरूप अद्वैतच खरें सुख देणारें म्हणून सत्य तत्त्व आहे. तो आनंदरूप आत्मा न स्त्री झाला आहे, न पुरुष. 'मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ।' दुसरें म्हणूनच कांहीं नसतां जो भेद आणि नानात्व मानतो, त्याला त्याच्या त्या कल्पनेनेंच अनेकदां जन्मून अनेकदां मृत्युमुखांत पडावें लागतें. या श्रुतिवाक्यांच्या आधारें जगांत सत्य म्हणून पहावयाचें झाल्यास, इथें अनेक गाडग्यांतून असणाऱ्या एका मातीप्रमाणें, अनेक तरंगांतून असणाऱ्या एका समुद्राप्रमाणें, धोतर, रुमाल, साडी इत्यादि विभिन्नलिंगात्मक अनेक वस्त्रांतून असलेल्या एका कापसाच्या धाग्याप्रमाणें, मृगजलाच्या भासांतून असणाऱ्या एका सूर्य-प्रकाशाप्रमाणें अथवा मुळीं, जमिनींत पडलेली भेग, पाण्याची धार पडून आलेला आकार अथवा सर्प या अनेक कल्पनांतून असणाऱ्या एका दोरीप्रमाणें, एकाच्याच अनेक वेषांतल्या त्या सर्व नामरूपांतून असलेल्या त्याच्या अद्वितीय व्यक्तित्वाप्रमाणें जगाच्या विभिन्न अनेकानेक आकारां-तून तत्त्वतः निर्गुण निराकार असणारा मीच एक आहें; माझ्या ज्ञानमात्रतेनें, आनंदघनतेनें व अद्वितीय आनंदरूपतेनें मीच परब्रह्म परमात्मा अथवा आत्मा म्हणवून घेतों, असें निश्चयानें समजणें म्हणजे ज्ञान. याचाच निःसंशय अनुभव, निर्वात दीपाप्रमाणें सदैव निश्चल असा, अखंड तेवत राहिला म्हणजे तोच आत्मसाक्षात्कार. जगांत कुठेंहि कोणत्याहि अवस्थेंत कसल्याहि नामरूपाच्या दर्शनानें भिन्न अशी कोणतीच वृत्ति न उमटतां कांहींहि पाहिलें तरी आपल्या अद्वितीय आनंदरूपाचा नितांत शांतिकर व

अनंत समाधानकर अनुभवच एक हृदयांत आपोआप कोणत्याहि प्रयत्नाविरहित सहज उमटूं लागला आणि दुःखशोक मुळांतूनच अजीबात नष्ट झाले म्हणजे आम्ही कृतकृत्य झालों.

मागच्या क्षणांत आनंदांत हंसत असणारी आई मुलाचा खोडसाळपणा बघून जातां जातां 'गऽप' म्हणते आणि नेणत्या मुलावर वरवर उगीच क्षणभर डोळे वटारून आपल्या गृहकृत्याला लागते. त्याप्रमाणें वरवर नेणत्या जगांत त्यांना त्यांना मार्गाला लावण्याच्या उद्देशानें अंतःस्थितीचा अनुभव घेत क्षणभर ते ते उपाय नाइलाजानें योजीत स्वरूपाकार असलें म्हणून बिघडत नाहीं. पण 'येथें कारण अंतरस्थिति। अंतरींच पाहिजे निवृत्ति।' तें खरोखर पाहिजे. दिखाऊ टिकत नाहीं आणि त्याचा उपयोग आपल्याला आणि दुसऱ्यालाहि होत नाहीं. तसा तेवढा अभ्यास झाला पाहिजे. सर्व जगाच्या निखिल आनंदाचें अत्युन्नत असें अनंत अपार रूप, तें निरतिशय पवित्र रूप, तें अमित मंगलरूप, तें ब्रह्म, तो परमात्मा म्हणजे केवळ आपणच. विश्व म्हणजे आपल्याच निरवधि आनंदाचा सुंदर आविष्कार आहे, अशा अनुभवानें नित्य निर्विकार असणें म्हणजेच आत्मनिष्ठा. 'विश्वं यदेतत्परमात्मदर्शनम्।' असा आत्मनिष्ठाचा अनुभव असतो. निर्विकार आनंदाचा निष्कलंक पूर्णचंद्रच तो. त्याचें दर्शनहि तसाच आनंद निर्माण करतें. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हें त्यालाच एक अक्षरशः पटलें. 'स तत्र पर्येति जक्षत्क्रीडनरममाणः स्त्रीभिर्वा यानैर्वा ज्ञातिभिर्वा वयस्यैर्वा नोपजनं स्मरन्निदं शरीरम्। (छां. उ. अ. ८ खं. १२—३), स वा एष एवं पश्यन्नेवं मन्वान एवं विजानन् आत्मरतिरात्मक्रीड आत्ममिथुन आत्मानन्दः स स्वराड् भवति।' (छां. उ. अ. ७ खं २५—२) त्याच्या विनोदांत, त्याच्या क्रीडेंत स्वपरदेहभावना नसते. सर्वत्र आत्मदर्शनच त्याला होतें. आनंदहि आत्मरूपाचाच असतो. मी अन्यशून्य एक निर्विकार निराकार आनंदघन आहें, माझ्याहून व्यतिरिक्त कांहीं नाहीं

असें पाहणारा, आपल्यांतच सदैव रमणारा, सकल स्त्रीपुरुषांतून आपणच एक अद्वितीय आहोंत असा निश्चय राखणारा, निरवधि आत्मानंदानेंच निरतिशय संतृप्त असणारा, विशाल विश्वांत वावरत असला तरी तो स्वराट् ( स्वस्मिन् राजत इति स्वराट् ) आपल्यांत आपणच अद्वितीय असा शोभत असतो; आपल्याच आनंदरूप प्रकाशांत प्रकाशत असतो; आणि स्वरूपाच्या निरतिशय सिंहासनावरच अखंड विराजमान असतो.

'यत्तदद्रेश्यमग्राह्यमगोत्रमवर्णमचक्षुःश्रोत्रं तदपाणिपादं नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं तदव्ययं नदभूतयोनिं परिपश्यन्ति धीराः।' (मुंडक उ. १–६) बाह्य दृष्टीचा जो विषय होत नाहीं; ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय, मन आदिकांस ज्याचें ग्रहण होत नाहीं; ज्याला वंशपरंपरेचा अन्वय नाहीं; ज्याला रूपरंग नाहीं; ज्याला चक्षुश्रोत्रादि इंद्रियें नाहींत; जें करचरणादि अवयवशून्य आहे; जें निर्विकार, जन्मशून्य, सर्वव्यापी, अविनाशी आहे; त्या अतिसूक्ष्म आत्मप्रत्ययसार अशाच चराचर जगताच्या कारणरूपाला विवेकी, बुद्धिमान्, ज्ञानी सर्वत्र सर्वतः पहातात. या वाक्यावरून व अनुभवावरूनहि ज्ञान्याची कारणदृष्टि असते आणि अज्ञान्याची कार्यदृष्टि असते हें स्पष्ट होतें. 'कस्मिन्नु विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति।' कोणत्या एकाच्या ज्ञानानें या सर्वाचें ज्ञान होतें? ( मुंडक. उ. १–१–३ ) 'येनाश्रुतꣳ श्रुतं भवत्यमतं मतमविज्ञातं विज्ञातमिति कथं नु भगवः स आदेशो भवतीति।' ( छां. उ. अ. ६ खं. १--३. ) ज्याच्यानें ऐकलें नसेल तें सर्वहि ऐकल्यासारखें होतें, असंमत संमत होतें आणि जें कळून आलेलें नसतें तेंहि पण कळून येतें, असा तो उपदेश कोणता? या प्रश्नांना उत्तर म्हणून 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः। आत्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेनेदꣳ सर्वं विदितम्।' ( ब्र. उ. अ. २ ब्रा. ४–५ ) सर्वांहून अधिक प्रिय असणाऱ्या आत्म्याला, ( 'आत्मा म्हणजे तो

आपण । ' या श्रीसमर्थांच्या उंक्तीप्रमाणें आपल्यालाच ) पहावें, आपल्याच स्वरूपाचें वर्णन ऐकावें. त्या वर्णनांत आलेल्या अविनाशी, निर्गुण, निराकार, चिन्मात्र, आनंदघन, जगत्कारण, सर्वाधार, सर्वगत, सर्वरूप. सर्वशून्य, अद्वय, इत्यादि लक्षणांचा मी म्हणून मनन करावें. मननानंतर निश्चयानें त्याचाच ध्यास घेऊन त्याच्याच चिंतनांत अहर्निश असावें. आत्मदर्शनानें, श्रवणानें, मननानें, त्याच्या निश्चयात्मक निदिध्यासानें हें सर्व जाणलें; आतां जें ऐकलें नव्हतें तें ऐकल्यासारखें, असंमत तें संमत झाल्यासारखें व जें कळून आलें नव्हतें तें कळून आल्यासारखें झालें, असें याज्ञवल्क्यांनीं सांगितलें आहे.

नाहीं तरी आत्म्याव्यतिरिक्त या जगांत काय आहे ? असेल तर 'मी' या आपल्या भानाविरहित बघून तें सांगतां येत नाहीं, असें प्रत्ययाला आल्यास हें सर्वहि आत्मभानांत प्रतिबिंबिलेलें आत्ममात्र आहे, हें कोण नाकबूल करील ? तें आत्मरूप सर्व जाणणाऱ्या 'मी' या आत्मभानाचें लक्ष्य असल्यामुळें स्वप्रकाश अद्वितीय ज्ञानमात्र आनंदघन आहे, हें 'मी' या अनुभवांत असणाऱ्या आपल्या अद्वितीयत्वाच्या अनुभवानेंहि पटतें. मी म्हणजे मीच, दुसरा नाहीं, असा याचा अर्थ नाहीं का होत ? ' कोण आहे रे तिकडे ? ' म्हणून विचारलें असतां ' मीच एकटा आहें ' हा स्वरूपाचा अनुभव बाहेर पडतो. 'मी' या अनुभवांत अन्याचा अभाव प्रत्येक वेळीं उघडकीस येत असतो. देहपरत्वें भेद वाटला तरी तो मानीव आहे. प्रत्येक देहांत 'मी' हें आहेच. अनेक गाडग्यांतलें एका नदीचें स्वच्छ पाणी एकत्र ओतलें म्हणजे त्या पाण्यांत जसा भेद रहात नाहीं, त्याप्रमाणें अनेक देहांतलें 'मी' एकवटलें म्हणजे एक 'मीच' भान उरतें आणि त्या भानाचें लक्ष्य आपण केवळ भानरहित ज्ञानानंदरूप आहों, हें विचार करून बघितलें म्हणजे नाहीं का प्रत्ययाला येणार ?

## मोक्षाचा किंवा मुक्त स्वरूपाचा अभ्यास

'निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः। द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥' (भ. गी. १५–५) मानापमानाचा प्रश्न ज्यांचा नाहींसा झाला आहे; विषय-व्यामोह ज्यांच्या वाऱ्याला देखील उभा रहात नाहीं; संगदोष पूर्ण जिंकल्या-मुळें ज्यांच्यावर थोडा सुद्धां परिणाम करूं शकत नाहीं; जे सदैव आत्म-निष्ठ असतात; जे अखंड निर्विकार अथवा निष्काम झाले आहेत; जे सुखदुःखादि द्वंद्वापासून पार मोकळे झाले आहेत; असे ज्ञानी मात्र त्या ब्रह्मपदास पोहोंचतात. असें हें पद गांठणें अभ्यासाशिवाय शक्य नाहीं. 'अभ्यासावीण एक क्षण। राहूंच नये ॥' अशी निःस्पृहांना श्रीसमर्थांची शिकवण आहे. भगवद्गीतेंत सहाव्या अध्यायाच्या चौतिसाव्या श्लोकांत योग, योगानंद, योगी यांचीं लक्षणें सांगून झाल्यानंतर भगवन्तांना अर्जुनानें प्रश्न केला : 'चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम्। तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥' (भ. गी. ६–३४). 'तूं सांगितलेंस तें सर्व ऐकून घेतलें. पण कृष्णा, हें मन मोठें चञ्चल, प्रमादशील, मोठें हट्टी, सहजासहजीं वांकवितां न येण्यासारखें, मोठें बलवान् आहे. याचा निग्रह करावयाचा कसा?'

त्यावर भगवन्तांनीं उत्तर दिलें : 'असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्। अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ (भ. गी. ६–३५), असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः। वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥' (भ. गी. ६–३६) 'अर्जुना! तूं म्हणतोस तें अगदीं खरें असलें तरी सतताभ्यासानें आणि वैराग्यानें चञ्चल आणि दुर्निग्रह मनावर जय मिळविणें शक्य आहे. आणि तो मिळवावाच; कारण मनाच्या ढिल्या माणसाला योगाची प्राप्ति होऊंच शकत नाहीं. पिच्छा पुरविणाऱ्या

प्रयत्नशील, निग्रही माणसाला मात्र याची प्राप्ति उपायांनीं कालान्तरानें होते. ' येथें ' अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः । ' हें समाधिपादांतलें बारावें पातञ्जलसूत्र आठवतें. अभ्यास आणि वैराग्य यांच्या बळावर मन जिंकतां येतें. परमार्थाचा अभ्यास म्हणून जो करावयाचा तो म्हणजे एक वृत्ति उठून दुसरी वृत्ति उठण्याच्या मध्यस्थितींत, उठणाऱ्या पुढच्या वृत्तीस प्रकाशविणारें निर्विकल्प ज्ञानानन्द रूप जें आपण असतों, तेंच आपलें स्वरूप म्हणून ओळखून त्या निष्प्रपञ्च निर्विकल्प ज्ञानमात्रतेंत, त्या आनंदघनतेंत अधिकाधिक वेळ वृत्तीचा निरोध करून, पुढची वृत्ति न उठूं देतां राहण्याचा अभ्यास. यालाच मोक्षाचा अभ्यास हें नांव आहे. अथवा याला मुक्त स्वरूपाचा अभ्यास म्हणतां येईल.

या अभ्यासाला दृश्य पदार्थांचा मोह म्हणजे त्याची भोग-वासना आडवी येते. यापूर्वीं सांगितल्याप्रमाणें अभ्यास करीत दृश्य शून्य करावें. ' द्रष्टा दृश्यवशाद्बद्धः दृश्याभावे विमुच्यते । ' द्रष्टा दृश्यामुळें बद्ध झाल्यासारखा वाटतो. आंतल्या कल्पनात्मक दृश्याचा अभाव झाला कीं तो सर्व वासनांपासून मुक्त होऊन निर्विकल्प होतो. ' दृश्यं ह्यदृश्यतां नीत्वा ब्रह्माकारेण चिंतयेत् । ' वर उसळणाऱ्या सूक्ष्म स्फूर्तींपासूनचें सर्वहि दृश्य अदृश्य करून, विलीन करून निश्चळ निर्विकल्प चिदानंदमात्र असावें म्हणजे आपल्या ब्रह्मरूपानें असावें. मीच तो अथवा मी हा आनंद अशी अनंत अशी निर्विकल्प आनंदरूपी नुसती वृत्ति उठली तरी पुरे आपली. निर्विकल्प चिदानंदरूप विसरून आपल्या स्वरूपांत आपल्या स्वरूपाचा आभास उत्पन्न झाला, हें आपलें मिथ्या ज्ञान झालें, हें लक्षांत आणून निर्विकल्प राहण्याचा सतत अभ्यास चालविला पाहिजे. निर्विकल्प स्वरूपांत सर्वप्रथम मी हा असा केवळ आनंदरूप आहें, असें स्फुरतें. सर्व वृत्तींचा आणि स्फुरणाचा हाच एक मूळचा खरा अर्थ आहे. स्फुरणांत या वेगळ्या भासणाऱ्या देहाकाराला, वैषयिक कल्पनांना तात्त्विक

असा कांहीं अर्थच नाहीं. इथें मी आणि माझ्या आनंदरूपाची स्मृति याहून दुसरें कांहीं नाहींच, असा निश्चय बाळगावा. 'मी' असें स्फुरल्याबरोबर 'स्वरूपावस्थितिर्मोक्षः तद्भ्रंशोऽहंत्ववेदनम्।' निर्विकल्प आनंदमात्र होऊन राहणें म्हणजे आपली स्वरूपस्थिति आणि मी म्हणून स्फुरलें कीं, ती स्वरूपच्युति, तें आभासज्ञान झालें, अशा दृष्टीनें वृत्तिनिरोधाचा अभ्यास सतत करावा. या अभ्यासानें वैराग्यहि लाभतें आणि मोक्षहि लाभतो. अभ्यास आणि वैराग्य हे केवळ अन्योन्याश्रित आहेत; म्हणून दोन्हीला श्रीपतंजलि मुनींनीं एकाच सूत्रांत गोविलें. स्वरूपाच्या अनुभवानें उमलणारी अनंत स्वरूपानंदाची वृत्तिहि जर आपल्यांत आभासज्ञान निर्माण करून ती भ्रमात्मक ठरते, तर देह, विषय, जगत्, कामादि विकार यांना अर्थच काय उरतो, असें वाटून मन इकडे तिकडे जात नाहीं.

'एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना। जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम्॥' (भ. गी. ३—४३) 'अहं ब्रह्मास्मि म्हणजे मी आनंदरूप आहें, या वृत्तिज्ञानाच्या पूर्वींच निर्विकल्प आनंदमात्र आपलें स्वतःसिद्ध स्वरूप निश्चळ आहे. वृत्ति उठली कीं ती स्थिति हरपली म्हणून वृत्तिनिरोध कर. सर्व वासना, कामना, कल्पना, भावनांना जिंक. कामाचा नाश कर.' असा कृष्ण भगवानांचा थोडक्यांत उपदेश आहे. दृश्यांत, देहांत, देहसुखांत आहे काय? — 'स्वदेहाशुचिगन्धेन न विरज्येत यः पुमान्। विरागकारणं तस्य किमन्यदुपदिश्यते॥' (मुक्तिकोपनिषत् २—६६) आपल्यालाच वीट आणणाऱ्या देहाच्या प्रत्यक्ष किळसवाण्या दुर्गंधानें ज्याला वैराग्य उत्पन्न होत नाहीं, त्याला अजून कोणत्या उपदेशानें वैराग्य उत्पन्न होईल? 'देहे चेत्प्रीतिमान्मूढो भविता नरकेऽपि सः।' स्वपरदेहावर प्रीति करावयाची झाल्यास ती नरकावरहि कां करूं नये? हें प्रिय देहाचें खरें स्वरूप म्हणून शौचकूप

न सोडतां व पाटी नेणाऱ्यालाहि न नेऊं देतां कोणी राहिलेलें तसें आढळून येत नसल्यामुळें तत्त्वतः देह कोणाला प्रिय नाहीं, कोणी कोणाच्या देहावर प्रेम करीत नाहीं आणि देहालाहि पण कोणी 'मी' म्हणून मानीत नाहीं, मानणेंहि अस्वाभाविक आहे. मोक्षसाधनाच्या दृष्टीनें देहाची मातब्बरी; एरवीं देहाला कोण विचारतो ? शवाला पुरलें, जाळलें तरीहि कोणी विचारीत नाहीं. मोक्षाच्या साधनाच्या दृष्टीनें 'धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो। जो जो कीजे परमार्थलाहो (साधन)। तो तो पावे सिद्धीतें ॥ (दा. १–१०–१) या नरदेहाचेनि संमंधें। बहुत पावले उत्तम पदें। अहंता सांडून स्वानंदें। सुखी जाले ॥' (दा. १–१०–१९).

'पुरमेकादशद्वारमजस्यावक्रचेतसः। अनुष्ठाय न शोचति विमुक्तश्च विमुच्यते, एतद्वै तत् ॥' (कठ. २–२–१) अकरा द्वारांनीं (रंध्रांनीं) युक्त असणारा हा देह जन्मनाशशून्य ज्ञानरूप आत्म्याची नगरी आहे. त्या आत्म्याचें देहांत दर्शन घेतलें म्हणजे अज्ञानात्मक काम-कर्म-अविद्येपासून सुटून जीव मुक्त होतो. भोग्य दृष्टीनें अथवा त्याला 'मी' म्हणून मानावयाला देहांत काय आहे ? 'पाहातां शरीराचें मूळ। या ऐसें नाहीं अमंगळ। रज-स्वलेचा जो विटाळ। त्यामधें जन्म यासी ॥' (दा. ३–१–११). त्याचच बनलेलें. 'अत्यंत दोष ज्या विटाळा। त्या विटाळाचा चि पुतळा। तेथें निर्मळपणाचा सोहळा। केवी घडे ॥ (दा. ३–१–१२). इथें सौंदर्याचा अर्थ काय करावयाचा ? कातडी, रक्त, मांस आणि केश हे साडेतीन धातु स्त्रीदेहगत रजाचे व स्नायु, अस्थि, मेद आणि नख हे साडेतीन धातु पुरुषदेहगत रेताचे मिळून सप्त धातूंचा हा देह आहे. नख आणि केश यांना अर्धधातु मानलें आहे. देह म्हणजे रज-रेत आणि त्यापासून झालेल्या घाणेरड्या धातूंचा किळस आणणारा हिडीस संग्रह. 'देह परमार्थी लाविलें। तरीच याचें सार्थक झालें।' – आणि भोगांत वेचलें तर ? – 'नाहीं तरी हें वेर्थ चि

गेलें । नाना आघातें ( दुःखें ) मृत्युपंथें ॥' ( दा. १–१०–६१ ). येकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा । येथून तेथवरी गोवा । कांहींच नाहीं ॥ ( दा. १९–६–३० ). उपासना सकळां ठाईं । आत्माराम कोठें नाहीं । याकारणें ठाइं ठाइं । रामें आटोपिलें ॥ ( दा. १५–९–२८ ) देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण । हाचि अर्थ पाहतां संपूर्ण । समाधान बाणे ॥ ( दा. )

Everything that glitters is not gold. Things are not what they seem. Appearances are dellusions. – आंग्लविद्याकोविदांना हीं वाक्यें माहीतच आहेत. सृष्टींत कांहीं नाहीं ना ? मग सृष्टि ही मिथ्या हें पटलें का ? पटलें नसल्यास श्रीसमर्थ कसें पटवितात तें पाहूं. श्रीसमर्थ पुढें काय म्हणतात तें ऐकूं – ' येकी कल्पनेची सृष्टी । दुजी शाब्दिक सृष्टी । तिजी प्रत्यक्ष सृष्टी । जाणती सर्व ॥ ( दा. ६–६–५१ ). चौथी चित्रलेपसृष्टी । पांचवी स्वप्नसृष्टी । साहावी गंधर्वसृष्टी । ज्वरसृष्टी सातवी ॥ ( दा. ६–६–५२ ). आठवी दृष्टिबंधन । ऐशा अष्ट सृष्टी जाण । यामधें श्रेष्ठ कोण । ( कोणतीहि नाहीं. कोणती – ) सत्य मानावी ॥ ' ( दा. ६–६–५३ ) कोणतीहि नाहीं. ' निर्गुणासी नाहीं जन्ममरण । निर्गुणासी नाहीं पापपुण्य । निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाला ॥ ( दा. ६–३–३३ ). जालियां तत्वाचें निर्शन । निर्गुण आत्मा तो चि आपण । कां दाखवावें भीपण । तत्वनिर्शनाउपरी ? ॥ ( दा ६–३–३० ). जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान । विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ' ( दा. ५–६–५ ).

## श्रीसमर्थांचें सांगणें

साधकांनीं सतत अभ्यास करावा. ' स्वयं तीर्त्वा परान् तारयेत् । ' आपणासी बरें पोहतां न ये । लोक बुडवावयाचें कोण कार्य ॥ ( दा. १९–

७–१६ ). आपण आधीं चांगलें पोहावयाला शिकून मग दुसऱ्याला शिकवावयाचें असतें. ' तरतेन बुडों नेदावें। बुडतयासी ॥ ' का बुडतेन बुडों नेदावें बुडतयासी ? श्रीसमर्थ अभ्यासावर किती भर देतात पहा ! ' अखंड येकांत सेवावा। अभ्यास चि करीत जावा। ' अभ्यास करून आपली दृढ भूमिका झाली म्हणजे मग – ' काळ सार्थक चि करावा। जनासहित ॥ ' ( दा. ११–१०–१७ ). ज्ञानी आणी उदास। समुदायाचा हव्यास। तेणें अखंड सावकाश। येकांत सेवावा ॥ ( दा. १९–९–१ ). येकान्तेंविण प्राणीयांतें। बुद्धी कैंची ॥ ( दा. १९–६–२९ ). जयास येकांत मानला। अवघ्या आधीं कळे त्याला। (दा. १८–१०–५०). एकान्त, मौन, दुग्धाहार, तत्त्वाभ्यास, वासनापरित्याग, स्वरूपानंदांत वृत्तीचा विलय करून होईल तितका अधिक वेळ निर्विकल्प स्थितींत रहाणें असा अभ्यास करावा. आत्मशांतीनें, समाधानानें असावें.

सुंदरकांडांतल्या श्रीमारुतिरायांची भूमिकाच आत्मशांतिशोधार्थ निघालेल्या निःस्पृहाची असते. अभ्यासें प्रकट व्हावें। नाहीं तरी झांकोन असावें। प्रकट होऊन नासावें। हें बरें नव्हे ॥ ( दा. १९–७–१७ ) असें श्रीसमर्थांनीं सांगितलेलें कधींहि विसरू नये. ' संविन्मात्रस्थितश्चाहमजोऽस्मि किमतःपरम्। ' मी या माझ्या जाणिवेनें मला सकळ कळून येतें. सुषुप्तींत 'मी' ही जाणीव माझ्यांत लीन झाली असतां कांहींच कळून येत नाहीं. माझ्यांत सर्वप्रथम 'मी' हें भान निर्माण होऊन या आपल्या भानानेंच सर्व कांहीं समजतें. सर्वांचें ज्ञान करून देणारें माझें भान जर इतकें ज्ञानरूप आहे, तर हें माझें भान सुषुप्तींत कोणतेंच दृश्य नसतां ज्या माझ्यांत विरतें तो मी ज्ञेयशून्य केवळ ज्ञानमात्रच आहें. माझ्या या अखंड ज्ञानमात्र स्वरूपांत उत्पन्न होऊन नाश पावणारें कोणतेंहि दृश्य अथवा ज्ञेय नाहीं. उत्पत्तिनाशविरहित असा मी ज्ञेयशून्य, अन्यशून्य, ज्ञानमात्र आनदघन आहें; दुसरें नाहींच. मग कशाचा विचार

करावयाचा ? कशाची इच्छा करावयाची ? कशाची अपेक्षा बाळगावयाची ? कुणाला आठवावयाचें ? प्रेम कुणावर आणि द्वेष कोणाचा ? अशा विचारानें, निर्विकल्प आनंदमात्र रहात जावें.

निर्माण झालेलें 'मी' हें भान उत्पत्तिनाशयुक्त, निर्माण झालेली स्फूर्ति उत्पत्तिनाशयुक्त म्हणून दोन्ही चंचल आहेत. यांत प्रतिबिंबणारें दृश्यहि उत्पत्तिनाशयुक्त आणि चंचल आहे. या सर्वांच्या उत्पत्तीच्या पूर्वी असणाऱ्या ज्या प्रकाशानें हीं सर्व प्रकाशतात तो मी स्वप्रकाश याचा साक्षी नित्य उत्पत्तिनाशशून्य निश्चल ज्ञानानंदरूप आहें. म्हणून त्या निर्विकल्प स्थितींत रहाणें म्हणजेच स्वरूपस्थितींत रहाणें. अशा सतत: विचारानें निर्विकल्पाचा अभ्यास अखंड चालवावा.

निर्विकल्प समाधीपर्यंत अभ्यासाची मर्यादा आहे. वाटेल तेव्हां वाटेल तितका वेळ, कसल्याहि परिस्थितींत, तत्क्षणीं निर्विकल्प समाधींत, मनांत आलें कीं ज्याला सहज रहातां येतें; आनंदस्वरूपाचें भान ज्याचें अखंड तेवत असतें; कशामुळेंहि ज्याच्या मनाला विक्षेप होत नाहीं, ज्याची शांति ढळत नाहीं त्यानें असें झाल्यानंतर मग यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या लोकसंग्रहाकडे वळावें. 'जालें साधनाचें फळ। संसार झाला सफळ। निर्गुणब्रह्म तें निश्चळ। अंतरीं बिंबलें ॥' ( दा. २०–१०–२६ ) असा अनुभव यावयाला पाहिजे. 'परमार्थी आणि विवेकी। त्यांचें करणें माने लोकीं। कां जे विवरविवरों चुकी। पडों चि नेदी ॥' ( दा. १९–६–१ ) हे धकाधकीचीं कामें। तिक्षण बुद्धीचीं वर्मे। भोळया भावार्थें संभ्रमें। कैसें घडे ॥ ( दा. १९–७–१९ ). उत्कट भव्य तें चि घ्यावें। मळमळीत अवघें चि टाकावें। निःस्पृहपणें विख्यात व्हावें। भूमंडळीं॥ ( दा. १९–६–१५ ). दीक्षा बरी मीत्री बरी। तीक्षण बुद्धी राजकारणीं बरी। आपणास राखे नानापरी। अलिप्तपणें ॥ ( १९–६–१७ ). दुर्जनासी राखों जाणें ( चांगले करून )। सज्जनासी निवऊ जाणें। सकळांचे मनींचें जाणें। ज्याचें

त्यांपरी ( दा. १९–६–१९ ). संगतीचें मनुष्य पालटे। उत्तम गुण तत्काळ उठे। अखंड अभ्यासीं लगटे। समुदाव ॥ ( दा. १९–६–२० ). जेथें तेथें नित्य नवा। जनासी वाटे हा असावा। परंतु लालचीचा गोवा। पडों चि नेदी ॥ ( दा. १९–६–२१ ). उत्कट भक्ति उत्कट ज्ञान। उत्कट च्यातुर्य उत्कट भजन। उत्कट योग अनुष्ठान। ठाईं ठाईं ॥' ( दा १९–६–२२ ). साधन करून एकदां का सिद्ध बनलें म्हणजे आपोआप हें साधतें, लाभतें आणि घडतें; म्हणून निःस्पृह साधकांनीं अभ्यासाशिवाय प्रकट होऊं नये, असें माझें श्रीसमर्थांच्या शिकवणीप्रमाणें मत झालें आहे. ' आतां हें आपणाचिपासीं। बरें विचारावें आपणासी। अनकूळ पडेल तैसी। वर्तणूक करावी ॥ ( दा.१९–७–३० ). शुद्ध विश्रांतीचें स्थळ। तें एक निर्मळ निश्चळ। तेथें विकार चि सकळ। निर्विकार होती ॥ ( दा १९–८–२५ ). उद्वेग अवघे तुटोनी जाती। मनासी वाटे विश्रांती। ऐसी दुल्लभ परब्रह्म स्थिति। विवेकें सांभाळावी ॥ ( दा. १९–८–२६ ). दृश्य पदार्थ जाणिजे। त्यास पदार्थज्ञान बोलिजे। शुद्ध स्वरूप जाणिजे। या नांव स्वरूपज्ञान ॥ ( दा. ५-६-७ ). ऐक ज्ञानाचें लक्षण। ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान। पाहावें आपणासि आपण। या नांव ज्ञान ॥ ( दा. ५–६–१ ). आपला आपणासि लाभ। हें ज्ञान परम दुल्लभ ( दुर्लभ )। जें आदिअंतीं स्वयंभ। स्वरूप चि स्वयें ॥' ( दा. ५–६–१५ ) कां, ही ओवी वाचली म्हणजे किती आनंद होतो ! किती समाधान वाटतें ! आपल्या निश्चल ज्ञानरूपतेचा आनंद लुटावा. ' जें या चराचराचें मूळ। शुद्ध स्वरूप निर्मळ। या नांव ज्ञान केवळ। वेदांतमतें ॥ ( दा. ५–६–१८ ) शोधितां आपलें मूळ स्थान। सहज चि उडे अज्ञान। या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान। मोक्षदायेक ॥ ( दा.५–६–१९ ). मी कोण ऐसा हेत। धरून पाहातां देहातीत। आवलोकितां नेमस्त। स्वरूप चि होये ॥' ( दा. ५–६–२१ ). श्रीसमर्थांनीं आपल्याला किती

कळकळीनें उपदेश केला आहे पहा ! 'जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन (स्वामीचें – म्हणजे श्रीरामरायाचें)। जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ॥ (दा. ५–६–४१). तें हें माझें जीवींचें गुज । मी सांगैन म्हणतों तुज । जरी अवधान देसी मज । तरी आतां ये च क्षणीं ॥ (दा. ५–६–४२). अहं ब्रह्मास्मि माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य । तो ही सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथें ॥ (दा. ५–६–४४). ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूं चि आहेसि ब्रह्म । ये विषईं संदेह भ्रम । धरूंचि नको ॥ (दा. ५–६–४५). सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता । पिंड ब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ॥ (दा. ५–६–४९). मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तों दृश्य असतांच वोसरे । सहज चि येणें प्रकारें । आलें आत्मनिवेदन ॥ (दा. ५–६–५१). या नाव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥ (दा. ५–६–५४). कोणासी च नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन । दृढ घेतला देहाभिमान । म्हणौनियां ॥ (दा. ५–६–५७). शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें । तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ (दा. ५–६–५८). निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदईं धरावें । सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥' (दा. १३–१०–२०). 'ध्यानं शौचं तथा भिक्षा नित्यमेकान्तशीलता ।' निःस्पृहांनीं असें रहावें. मन ध्यानविलीन असावें. देहाची बाह्यशुद्धि जलमृत्तिकेनें संपादावी. अंतरशुद्धि आत्मविचारानें राखावी. एकान्तशीलता असावी. भिक्षावृत्ति ठेवावी.

## विरक्ताचा आदर्श दिनक्रम

'एकान्ते सुखमास्यतां परतरे चेतः समाधीयताम् । पूर्णात्मा सुसमीक्षतां जगदिदं तद्बाधितं दृश्यताम् ॥' – 'सुखानें एकान्तांत रहा. लौकिक,

ऐहिक सुखाहून विलक्षण असणाऱ्या पवित्र शांतिकारक आत्मीय अनंत आनंदांत चित्त एकाग्र करा. आपल्याच पूर्णतेनें रहा. तुमच्याच या पूर्ण स्वरूपानें जग उजळतें म्हणून माना,' असें श्रीशंकराचार्यांनींहि सांगितलें आहे. सदा ध्यानस्थ असावें आणि देहनिर्वाहाकरितां भिक्षा ठेवावी; याहून इतर कांहींच करूं नये. वाटल्यास ज्ञानग्रंथ अवलोकावेत. निःस्पृहांनीं भिक्षा सोडूं नये. 'भिक्षाहारी निराहारी।' भिक्षा हें भवरोगाचें औषध आहे. 'भिक्षौषधं भुज्यताम्' म्हणून आचार्यांचेंहि सांगणें आहे. भिक्षेंत येईल तें अमृत. 'स्वाद्वन्नं न तु याच्यतां विधिवशात्प्राप्तेन संतुष्यताम्।' 'गोडग्रासीं आळकेपण' ठेऊं नका. मागायला जाऊं नका. यदृच्छेनें भिक्षेंत मिळालेल्या पक्वान्नांनीं संतुष्ट रहा. ब्रह्मस्वरूपाचा आनंद हेंच खरें तृप्तीचें अन्न आहे. 'अन्नमय ँहि सोम्य मनः।' ( छां. उ. अ. ६. खं. ५–४ ). अन्नासारखें मन होतें म्हणून सात्त्विक पवित्र अन्न सेवन करावें. 'आहारशुद्ध्या चित्तशुद्धिः।' ( छां. उ. खं. २६–२ ). जसें अन्न शुद्ध असेल तसें मन अथवा चित्त शुद्ध होतें. एखाद्या दिवसाची गोष्ट निराळी पण होतां होईल तों तळलेले, मसालेदार पदार्थ खाण्यांत नसावेत. ते कामोत्तेजक आणि उष्ण असतात. त्यांनीं शोष पडतो, अभ्यासांत विघ्न येतें. म्हणून ते खाऊं नयेत. उडीदहि, तसेंच बाकी मुळा, वांगीं वगैरे कांहीं भाज्याहि निषिद्ध आहेत; मधुकरींत आल्यास चालतील. पण कांदा, लसूण मात्र फारच उत्तेजक असल्यामुळें अगदींच त्याज्य. जिव्हेवर ज्याचा ताबा आहे तो इतर सर्वहि इंद्रियें जिंकतो. 'सर्वं जितं जिते रसे।' जिव्हा ज्याच्या ताब्यांत नसते त्याचें ब्रह्मचर्य अस्खलित राहीलच, असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. बरींच अशीं उदाहरणें डोळ्याखालून गेलीं आहेत. तिखट, आंबट, खारट, तेल, तूप, दहीं यांचें सेवन प्रमाणांत असावें. ताक वाटेल तितकें घ्यावयास हरकत नाहीं. 'विरक्तें धारिष्ट धरावें। दमन विषयीं।' थोडक्यांत मधुकरींत आलेलें उपासनेला अर्पण करून ( नैवेद्य दाखवून ) पवित्र प्रसाद

हणून मधुकरीचें अन्न सेवीत जावें. कांहीं न मागतां मधुकरीवर राहिलें तरी तो एक सौम्य संयमच होतो.

विरक्त चढला तर ब्रह्म होईल, पडला तर नरकाला जाईल, असें याचें भवितव्य असतें. म्हणून 'विरक्तें उत्तम गुण घ्यावे। विरक्तें अवगुण त्यागावे। नाना अपाय भंगावे। विवेकबळें॥' (दा. २-९-२९). कशालाहि न हरतां, स्वरूपाच्या निश्चयानें सर्वांना मागें टाकून पुढें जाण्याचा तेजस्वी मोक्षमार्ग हा. प्रवृत्तीच्या देव-मनुष्यादिकांकडून विरक्ताला खालीं आणण्याचा प्रयत्न सतत होतच असतो. पण त्या कशाला दाद न देतां मोठ्या धैर्यानें, गांभीर्यानें, कोणत्याहि विकाराला थोडें सुद्धां बळी न पडतां शांततेनें अखिल विश्वाचा खरा आनंद होऊन परमोच्चपदीं विराजमान होण्याचा परम मंगलरूप दिव्य निवृत्तिमार्ग हा. 'विरक्तें असावें जगमित्र। विरक्तें असावें स्वतंत्र।' कोणाच्या कच्छपीं लागलेलें असूं नये. 'सर्वांमधें उत्तम गुण। त्याचा भोक्ता।' असावें. कोणाचेहि वाईट गुण विरक्तानें आपल्या अंगीं जडवून घेऊं नयेत. बोलणें चालणें मृदुमधुर, पवित्र असावें. विरक्तांनीं विरक्तांच्या समाजांतच असावें. विरक्तानें विरक्त गुरु करावा. नियमाला अपवाद असतोच, पण बहुतेक विरक्तांनीं गृहस्थ गुरु केला म्हणजे गृहस्थाचा आदर्श पुढें असल्यामुळें त्याचा परिणाम होऊन, गृहस्थाश्रमाची इच्छा होणें बहुंशीं संभवनीय आहे. विरक्तांनीं गृहस्थांच्या घरींहि राहूं नये, त्यांच्याशीं फार सलगी ठेवूं नये. त्यामुळें वैराग्य ढिलें पडतें. कोणाच्याहि आहारीं न जातां आपला मार्ग आक्रमीत असावें.

या वैराग्यधनाचें गाठोडें आपल्याला नाहीं मिळालें तरी याच्यापासून सोडवावें म्हणून कांहीं देव-देवता, मनुष्यें अगदीं टपलेलीं असतात. शत्रुपक्षाच्या सैन्याची फळी फोडून दोन्ही हातांनीं तलवारी फिरवीत छातीठोकपणें आपल्याला कसलीहि इजा न होऊं देतां जाण्याचा शूरवीरांचा हा मार्ग आहे. प्रतिपक्षाचेहि कांहीं सामान्य नसतात.

सत्त्वबळानेंच केवळ त्यांना जिंकावयाचें असतें. स्वरूपाच्या जाणिवेची एक ढाल शत्रुपक्षाचे सर्व वार चुकविण्याकरितां मात्र फार मोठी याच्याजवळ असते. चांगला चोखाळून गुरु करावा. तसा दुसऱ्याच्या सांगण्यावरून गुरु करूं नये. कोणावर विश्वास नच बसला, तर आपल्या 'शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें।' अशा श्रीसमर्थांवर विश्वास ठेवावा आणि तसा दृष्टान्त झाल्यावर त्या गुरूला शरण जावें. श्रीसमर्थांसारखे इतर कोणीहि गुरु करावयास हरकत नाहीं. श्रीदासबोधासारखे ज्ञानप्रधान ग्रंथ वाचावेत उपनिषदें, गीता, ब्रह्मसूत्र इत्यादिकांचें श्रवण शक्य झाल्यास अवश्य करावें. श्रीशंकराचार्यांचे प्रकरणग्रंथ अमोलिक आहेत, ते पहावेत. हें नामरूपात्मक जग प्रकाश्य आणि याचे प्रकाशक आपण स्वयंप्रकाश स्वतःसिद्ध अद्वितीय चिदानंदरूप आहों, हें कधींहि विसरूं नये. प्रकाश्य आणि प्रकाशक यांचें पृथकरण करीत असावें; हे कधींहि एक करूं नयेत. स्वरूपाव्यतिरिक्त कोणत्याहि प्राणि-पदार्थांच्या ठिकाणीं सुखाची भावना न करणें आणि त्या दृष्टीनें कशावरहि प्रेम न ठेवणें हा सुखाचा मूलमंत्र आहे. हें निवृत्तिमार्गाचें असिधाराव्रत आहे.

भवसागरांत कामाचे तुफान वारे डोळ्यापुढें अंधारी आणून कोणत्या तरी एका स्त्रीरूपी सुसरी-मगरीच्या आहारीं पाडण्याचा संभव फार असतो. या वादळांत सांपडूं नये. केव्हांहि वृत्तिक्षोभ होऊं देऊं नये. साधनमार्गांत असूनहि मार्ग आपण चुकलों का काय म्हणून संशय येणें, एकदम मनाचें अस्वास्थ्य होणें, भीति वाटूं लागणें, विषयांच्या कल्पना येणें, निषिद्ध प्रवृत्तीचे वारे वाहूं लागणें, कामज्वाला भडकणें इत्यादि झालें तरी या कशालाहि दाद न देतां कोणत्याहि आणि कुणाच्याहि जाळ्यांत न सांपडतां, 'मी ज्ञेयशून्य ज्ञानरूप असा केवळ आनंदघन परमात्मस्वरूपच आहें' हा निश्चय सदैव प्रकाशत ठेवावा. कसलाहि ढग येऊं देऊं नये. कोणीकडून आलाच तर सूर्याचें उदाहरण पुढें ठेवून 'मी कधींच

यामुळें आच्छादला जात नाहीं,' हा निश्चय निश्चळ ठेवावा. एकतत्त्व-दृढाभ्यासात्प्राणस्पंदो निरुध्यते । मनोऽपि विलीयते ।' एकतत्त्वाच्या अखंड धारणेनें, अनुसंधानानें प्राणजय व मनोजय होतो. 'तत्प्रतिषेधार्थमेक-तत्त्वाभ्यासः ।' सर्व विघ्नांच्या नाशाकरितां एकतत्त्वाचा अभ्यासच उप-योगी पडतो, असें पातंजलयोगसूत्र आहे. ( स. पा. सू. ३२ ). 'ताव-न्निशीव वेताला वल्गन्ति हृदि वासनाः । एकतत्त्वदृढाभ्यासाद्यावन्न विजितं मनः ॥' ( मुक्ति. उप. २–४० ). मुक्तिकोपनिषदांत आलेला ( दुसऱ्या अध्यायांतील ) हा ४० वा श्लोक आहे. जोंपर्यंत एकतत्त्वाच्या दृढाभ्यासानें मन जिंकलें जात नाहीं, तोंपर्यंतच आत्मविस्मृतिरूप रात्रीचा अज्ञानांधकार माजलेल्या हृदयरूपी स्मशानांत वासनांची भुताटकी त्रास देते, पुढें नाहीं, असा याचा अर्थ.

## 'जगीं धन्य तो –'

'अनुकूलवेदनं सुखं प्रतिकूलवेदनं दुःखम् । सुखानुशायी रागः । दुःखानुशायी द्वेषः ॥' अनुकूल बुद्धि सुखाची आणि प्रतिकूल बुद्धि दुःखाची भावना निर्माण करते. ही सुखकारक वस्तु आहे, असें वाटल्यानंतरच त्या वस्तूची प्रीति जडते. ही दुःखकारक वस्तु आहे असें वाटल्यानंतरच त्या वस्तूचा द्वेष उत्पन्न होतो. समीचीन म्हणजे ही वस्तु चांगली आहे असें वाटलें कीं, त्या वस्तूचें ध्यान जडतें, तिची अभिलाषा होते. असमी-चीन म्हणजे ही वस्तु वाईट आहे, असें वाटल्यानंतर त्या वस्तूचा द्वेष जडतो व त्याग घडतो. निःस्पृह साधकानें दृश्य पदार्थांकडे लक्षच मुळीं घालूं नये. कोणाची निंदा, कोणाची स्तुति, आपला-परावा मानणें, अभिमान घेणें हें कांहीं न करतां, एक आनंदघनस्वरूपाचें ध्यान, एकान्तवास, निर्वाहा-करितां मधुकरी, आच्छादनाकरितां वस्त्र, मन रमविण्याकरितां ज्ञान-वैराग्यप्रधान सद्ग्रंथांचें वाचन, यापलीकडे निःस्पृहापाशीं कांहींच असूं

नये. याहून अधिक कांहीं करूं गेल्यास तोच एक मनाचा विषय होऊन बसतो आणि आत्मचिंतन सुटतें.

'सदा सेवि आरण्य तारुण्य काळीं। मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं। चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥' (मनोबोध ५४) असें श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे. समाजांत जरी असलें तरी अरण्याचें वातावरण आपल्याभोंवतीं ठेवावें. शरीर म्हणजे एक गड; बुद्धि – पत्नी; मन – मंत्री; इंद्रियें – सैन्य; वासना – परिचारिका अशीं सर्व कामादि – शत्रुपक्षाला मिळालीं असतां तेथील तरुण तेजस्वी राजाप्रमाणें केवळ आपल्या हिताकडे लक्ष देऊन तत्त्वाच्या बळानें इथें विवेकरूपी खड्गाच्या आणि वैराग्यरूपी ढालीच्या जोरावर शत्रूला जिंकावयाचें आहे. 'शीतोष्णाहारनिद्राविजयः। सर्वदा शान्तिः। निश्चलत्वम्। विषयेंद्रियनिग्रहः। एते यमाः। गुरुभक्तिः। सत्यमार्गानुरक्तिः। निर्दुष्टसुखागतवस्त्वनुभवः। तद्वस्त्वनुभवेन तुष्टिः। निःसंगता। एकान्तवासः। मनोनिवृत्तिः। फलानभिलाषः। वैराग्यभावः। नियमाः।' मण्डल ब्राह्मणोपनिषदांत प्रारंभींच दिलेले हे यम-नियम निःस्पृह साधकाच्या नित्य आचरणांत असावेत.

'देहस्य पञ्चदोषा भवन्ति।' देहांत पांच दोष आहेत. 'कामक्रोधनिःश्वासभयनिद्राः।' कोणते ते सांगतात : १ काम, २ क्रोध, ३ निःश्वास, ४ भय आणि ५ निद्रा. याच्या निवृत्तीचा उपायहि अशा रीतीनें दाखवितात : 'तन्निरासस्तु निःसंकल्पक्षमालघ्वाहाराप्रमादिता-तत्त्वसेवनम्।' कामाच्या निवृत्तीकरितां तो संकल्प म्हणजे ती वृत्ति मनांत न येऊं देणें, ती भावनाच न करणें; स्त्रियांचा आकार मनांत येऊं न देणें; कोणत्याहि स्त्रीचा आकार मनांत नसेल असें प्रेमाचें अथवा द्वेषाचें आचरण कोठें न ठेवणें. कल्पना आणि आकार मनांत आल्यास निराकार आनंदमात्र स्थितींत त्याचा तत्क्षणीं लय करणें आणि वृत्तीचा

उद्गम न होऊं देतां निर्विकल्प आनंदांत समरसून जाणें. क्षमा करणें हा क्रोधावर मात्रा आहे. एकंदरींत आपल्याला त्रास न होईल अशा दृष्टीनें सभोंवार विवेकाचें कुंपण घालून चित्ताचा क्षोभ न होऊं देणें, न बोलणें, स्थलत्याग करणें हे क्रोधावरचे उपाय आहेत. हलका आहार घेतला म्हणजे श्वास मंद चालतो. जितका श्वास मंद होईल तितकें मन एकाग्र होतें आणि शांत असतें. श्वास म्हणजे एक भाता आहे; त्याचें कमीअधिक प्रमाण करणें आपल्या हातांत आहे. जास्त श्रम न करणें, प्रकृति अशक्तहि न होऊं देणें व शांत वृत्ति राहील आणि सहज पचेल असा हलका आहार घेणें. दोन भाग अन्नानें, तिसरा भाग पाण्यानें भरणें आणि चौथा भाग मोकळा ठेवणें हें योग्यांच्या आरोग्यकारक भोजनाचें लक्षण आहे. श्वासाचा भाता मंद चालू करण्याचे हे उपाय आहेत. ' हितं मितं सदाऽश्नीयाद्यत्सुखेनैव जीर्यते। धातुः प्रकुप्यते येन तदन्नं वर्ज्ययेत् सदा॥ आहारस्य तु द्वौ भागौ तृतीयमुदकस्य तु। वायोः संचरणार्थाय चतुर्थमवशेषयेत्॥ ' कुठें न चुकणें, कोणाचा द्वेष न करणें, कोणाची निंदास्तुति अपरोक्षहि न करणें, निष्पाप आचरण ठेवणें, मनानेंहि कोणाच्या अहिताचें चिंतन न करणें हें एवढें असलें म्हणजे भयाचें कारणच उरत नाहीं. भयावरचे हे उपाय आहेत. निंदेनें तर द्वेष वाढतोच, तसा स्तुतीनेंहि तद्विरुद्ध माणसाचा द्वेष पत्करावा लागतो. म्हणून निःस्पृह साधकानें दोन्हींचा त्याग करावा. निद्रा कमी करण्यास अधिक श्रम न करणें व वर सांगितला तसा लघु आहार घेणें उपयोगी पडतात. दुसरा उपाय म्हणजे तत्त्वचिंतन. राहूमुळें जसें ग्रहण त्याप्रमाणेंच निद्रेमुळेंहि आत्मप्रकाशाला आणि जाणिवेला एक ग्रहणच लागतें. नाभीकडच्या भागाहून कांहीं तरी काळोखासारखें वर येऊन मुखस्थानांत असलेल्या जाणीवरूप आपल्याला झांकून अथवा गिळून टाकल्यासारखें वाटतें; आणि मग डुकली येते, देह कोलमडून पडतो. हें

एक आवरक तम आहे. साक्षित्वाच्या स्वयंप्रकाशआनंदघनरूपत्वाच्या अभ्यासानें, चिंतनानें त्या आवरणाचें आच्छादन न होऊं देतां रहाणें हा निद्राजयाचा उपाय आहे.

## आत्मानुसंधान

'अनित्याशुचिदुःखानात्मसु-नित्यशुचिसुखात्मख्यातिरविद्या ॥' ( पां. यो. सू. सा. पा. ५ ). अनित्य, अशुचि, दुःख, अनात्मरूप स्वपर-देहाच्या ठिकाणीं नित्य, शुचि, सुख, आत्मरूप केवळ अविद्येमुळें वाटतें. म्हणून कामादि विकार, देहसौख्याची कल्पना, परदेहाचा मोह व स्वदेहाचा अभिमान निःस्पृहानें जिंकावा. 'निर्वेदमायात् ।' वैराग्य धारण करावें. 'नास्त्यकृतः कृतेन ।' नित्य आत्मसुख केव्हांहि अनित्य पदार्थांपासून मिळत नाहीं, असें कठोपनिषदांत आलें आहे तें लक्षांत ठेवावें ( मुं. उं. १–२–१२ ). 'सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् । अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥' (मुं. उ. ३–१–५ ). हा आत्मा नित्यसत्यानें आपलें 'मी' हें भान आनंदरूपांत विलीन करून निर्विकल्प रहाण्याच्या नित्य तपानें अथवा तत्साधनरूप श्रवणमनन निदिध्यासानें यथार्थ म्हणजे 'मी निर्गुण, निराकार, अद्वय, चिदानंदरूप आहें' अशा रीतीनें स्वतःला नित्य पहाण्यानें व नित्य ब्रह्मचर्य राखण्यानें, ज्याचा अनुभव संन्यासी घेतात आणि जो देहांत शुभ्र ज्योतिरूप आहे त्या आत्म्याची प्राप्ति होते, असें मुंडकांत आलें आहे. यांत आलेल्या आत्मसाक्षात्काराला कारणीभूत होणाऱ्या साधनाकडे निःस्पृहानें लक्ष द्यावें. 'ब्रह्मचर्येण ह्येव सत आत्मनस्त्राणं विंदते ।' ब्रह्मचर्यपालनानें परमात्म्याचें रक्षण लाभतें; त्याचा लाभ होतो. 'तद्ब्रह्मचर्येण ह्येवात्मानमनुविद्य मनुते ॥' ब्रह्मचर्याच्या बळानें आत्मस्वरूप जाणून त्याची धारणा साधक साधतो, असें छांदोग्यांतहि

आलें आहे. ( छां. उ. ८–२–५ ). ' आनंदमयोऽभ्यासात् । ' ( ब्र. सू. अ. १. पा. १ अ. ६ सू. १२ ). आनंदात्मा प्रियो ह्यात्मा । ' मी मला सर्वाधिक प्रिय असणारा आनंदरूप आत्मा आहें, असा सतत अभ्यास करण्याविषयीं ब्रह्मसूत्र आणि श्रुति यांचें सांगणें आहे. ' आनंदाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते आनंदेन जातानि जीवन्ति । आनंदं प्रयन्त्यभिसंविशन्ति ॥ ' ( तै. भृगु. व. अ. ६ ). एका आनंदापासूनच सर्वहि भूतजात निर्माण होतें. उत्पन्न झालेलें सर्वहि त्या आनंदानेंच एक जगतें; त्या आपल्या मूळ स्वरूपांत एकरूप होण्याकरितां त्या आनंदाकडेच धांव घेतें आणि त्यांतच तें अन्तीं समरसून जातें. अशी श्रुति असल्यामुळें आनंदस्वरूपाची धारणा सर्वश्रेष्ठ आहे; आणि तोच आनंद आपल्याला पाहिजे आहे. ' सत्ता स्फुरत्ता परमात्मनो या नाच्छादनीया ह्युपजन्यिभावात् । आनंद आच्छादयमीव माया तन्नाशने तत्त्वमसीति वाक्यम् ॥ ' अस्तित्व आणि जाणीव यांचा तिला आधार असल्यामुळें माया त्यांना झांकूं शकतहि नाहीं आणि झांकीतहि नाहीं; परमात्म्याचा आनंद मात्र झांकते. तें आवरण गेलें आणि आनंदाचा साक्षात्कार झाला म्हणजे 'तत्त्वमसि' हें महावाक्य कळलें म्हणून समजावें.

शुभ्र शुक्ल हे वर्ण आत्मरूपाच्या अथवा ब्रह्मरूपाच्या वर्णनांत फार येतात. 'शुक्लध्यानपरायणाः' असें संन्याशाचें वर्णन आहे. ' शुक्लतेजोमयं ब्रह्म ' असें अद्वयतारकोपनिषदांत आलें आहे. ' सा हि सोमकला सूक्ष्मा तद्विष्णोः परमं पदम् । ' अशीं बरींच वाक्यें आहेत. शुभ्र शुक्ल याचा अर्थ मायासंगशून्य, अत्यंत पवित्र, परिशुद्ध असा केला असला तरी, परब्रह्म हें ' नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं ' या वर्णनाचें असलें तरी, 'अहं' स्फूर्तीचा लय करूनच निर्विकल्प ब्रह्मध्यानाचा अभ्यास असला तरी, प्रथम प्रथम तेवढें नच साधलें तर चंद्रप्रकाशासारखें आनंदरूप आहें म्हणून ध्यावें. आत्मसाक्षात्कारानंतरचा अनुभव

आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर येतोच आहे. 'तच्चिंतनं तत्कथनमन्योन्यं तद्प्रबोधनम् । एतदेकपरत्वं च ब्रह्माभ्यासो विदुर्बुधः'। त्याचेंच चिंतन करणें, परस्परांत युक्तिप्रयुक्तीनें त्याचाच विचार करणें. तात्पर्य, तदेकपरता ब्रह्माभ्यास म्हणवून घेतो. सदैव 'मी ज्ञेयशून्य ज्ञानमात्र आहें' या मद्व्यतिरिक्त कुठें कशांतहि खरें आणि श्रेष्ठ सुख नाहीं या समाधानानें व निश्चयानें असावें. 'अभेददर्शनं ज्ञानं ध्यानं निर्विषयं मनः। स्नानं मनोमलत्यागः शौचमिंद्रियनिग्रहः। ब्रह्मामृतं पिबेद्भैक्षमाचरेद्देहरक्षणे। वसेदेकान्तिको भूत्वा चैकान्ते द्वैतवर्जिते ॥ इत्येवामाचरेद्धीमान् स एवं मुक्तिमाप्नुयात् ॥' (स्कंद. उ. ११-१२). त्या आनंदघन परब्रह्माशीं सदैव अभिन्न असणें आणि आपल्या अद्वितीय स्वरूपाचें भानच सर्वत्र पसरलें आहे अशा निश्चयानें सर्वांनाहि अभिन्न पहाणें हें ज्ञान. आनंदस्वरूपाच्या धारणेनें मन निर्विषय करणें, विषयासक्तिशून्य करणें अथवा आनंदस्वरूपाहून अन्य कोणतेंहि मनाचा विषय होऊं न देणें, कशाचीहि कल्पना मनांत न स्फुरूं देणें हें ध्यान. मनाच्या कलुषित वैषयिक भावना धुऊन काढणें, देह-इंद्रियांच्या भावना अजिबात नष्ट करणें हें स्नान. मन-इंद्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयापासून परावृत्त करून त्या सर्वांना आपल्या आनंदघनरूपांतच विलीन करणें ही शुद्धता, शौच. स्वरूप म्हणून एक आनंदाचीच तद्भिन्न असणारी निर्विकल्प जाणीव उरविणें, निर्विषय आनंद आपणच होणें हेंच भोजन. सदैव द्वैतविवर्जित असणें हा अखंड एकान्तवास. हें जाणून जो असा अभ्यास करतो त्याला हटकून मोक्षाची प्राप्ति होते. सदोदित अशा निर्गुण आत्मनिष्ठेंत रहाणें नाहीं झालें तर उपासनेची अथवा सद्गुरूची मूर्ति चंद्रप्रकाशासारख्या आनंदाच्या प्रकाशांत आठवून, त्यानें ती घडली आहे असें मानून घ्यावें. मुखावर प्रकटलेल्या हास्यांतल्या आनंदांत मन विलीन करून दुसरें कांहीं न आठवितां रहावें आणि तेंच आपलें आणि उपासनेचें शुद्ध सच्चिदानंद

ब्रह्मरूप मानावें. ' यथाभिमतध्यानाद्वा । ' असें आहे ( पातञ्जल यो. सू. स. पा. ३९ ). कांहीं वेळ आत्मस्वरूपाचीं लक्षणें आठवून त्या लक्षणांच्या अनुसंधानानें आत्मध्यानपरायण व्हावें. कांहीं वेळ ग्रंथावलोकन अथवा निरूपण अथवा श्रवण अथवा मनन करावें. ' उपासना मूर्ति ध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं । नाहीं तरी श्रवण मननीं । निरंतर ॥ ' ( दा. १४–७–१६ ).

## ' विरंग जाऊं नेदी क्षण '

एकंदरींत समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें ' विरंग जाऊं नदी क्षण । ' एक क्षण सुद्धां फुकट जाऊं नये, जाऊं देऊं नये. ' Idle mind is Satan's workshop ' हें लक्षांत ठेवावें. मन असें धारकीं न धरतां सोडलें कीं, तें विषयांकडे गेलेंच म्हणून समजावें. हें तत्त्वज्ञान आणि त्याची धारणा कठीण काम वाटलें तर देव अथवा गुरु यांच्या सेवेंत अहर्निश राबावें. मुखानें अखंड नामस्मरण चालू ठेवावें. ' सदा देव-काजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा । स्वधर्मे चि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ( मनोबोध ४८ ) एकंदरींत मनाला घाणेरड्या कल्पना करावयाला वेळच मिळूं नये असें करावें. सर्व साधनें मन निर्विषय करून आत्मलाभ करून घेण्याकरितां आहेत हें ध्यानांत ठेवावें. ' सविषयं मनो बन्धाय निर्विषयं मुक्तये भवति । ' ( मंडल उ. ब्राह्मण ). विषयभावनेनें युक्त मन बंधकारक आणि निर्विषय मन मोक्षकारक जाणावें. ' निरस्तविषयासङ्गं संनिरुद्धं मनो हृदि । यदा यात्युन्मनीभावं तदा तत्परमं पदम् ॥ ( ब्रह्म बिंदु उ. ४ ). विषयाची भावना नाहींशी होऊन असङ्ग भावनेनें आनंद-रूपाच्या ज्ञानमात्रतेंत मनाला विलीन करून कसलाहि विचार करावयाला तें त्या स्थितींत उरलें नाहीं आणि वृत्तिशून्य स्थिति बाणली म्हणजे

परमपद गांठलें समजावें. एक आत्मा, दोन माया, अनेक अविद्या हें ओळखून असावें. बहुकालाचा झालेला अभ्यास वालवावयाचा झाला तर अशा रीतीनें सतत अभ्यास दीर्घकालपर्यंतच चालू ठेवला पाहिजे. पुढें पुढें मन ताब्यांत येतें.

चोहींकडे पसरलेल्या कांटेरी झाडांतून एक निमुळती पायवाट असल्याप्रमाणें विषयप्रधान लौकिक, ऐहिक जीवनांतला परमार्थमार्ग आहे. इथें फार दूरदृष्टीनें, इकडे तिकडे तोल जाऊं न देतां मोठ्या दक्षतेनें वागावें लागतें.

रात्रीं दहा वाजतां झोपून सकाळीं तीन वाजतां उठावें. उठल्या-बरोबर आपल्यासगट विश्व सर्व, निर्गुण, निराकार, निश्चल, निर्विकल्प, एक आनंदघनरूप आहे असें ध्यावें. ऋषिमुनि तीन वाजतां स्नानाला जातात; आपण झोंपूं नये. नाहीं झालें तर चार वाजतां उठून स्वरूपाचें ध्यान करून निर्गुण अथवा सगुण (अधिकाराप्रमाणें) प्रातःस्मरण करून शौचविधि आटोपून स्नान करावें. सर्वांनाच स्नानासाठीं थंड पाणी सांगितलें आहे. त्यांतल्या त्यांत निःस्पृहाकरितां तें अत्यंत आवश्यक आहे. थंड पाण्याचें स्नान आरोग्यकर, बलवर्धक, शांतिदायक, पावित्र्य निर्माण करणारें, वीर्यस्थापक असतें. ब्रह्मचारी आणि यति यांनीं ओल्या पंचानेंच अंग पुसावें. 'प्रातरुत्थाय यो विप्रः प्रातःस्नायी भवेत्सदा। समस्तजन्मजं पापं त्रिभिर्वर्षैर्व्यपोहति।' प्रातःस्नानानें तीन वर्षांत जन्मजन्मांतराचें समस्त पातक जातें असें दक्षस्मृतींत आहे. संध्या, जप, अभ्यास पडल्याप्रमाणें बाह्यपूजा अथवा मानसिक पूजा करावी. सूर्यनमस्कार तरुण साधकानें १०८ तरी घालावेत. प्रकृतिमानाप्रमाणें कमीजास्त करावेत. तारुण्यांत व्यायाम पाहिजे. त्यानेंच शरीर कसदार, जोमदार होतें; नाहीं तर ढिलें पडतें आणि साधनाचा उत्साह उरत नाहीं. आसनें करावींत. सूर्य-नमस्कार त्रिचाकल्पयुक्त ब्राह्मणानें घालण्यांत फार फायदा आहे. ब्राह्मणेतर

साधकाला संध्या, वेदोक्त मंत्र नाहींत; त्यानें नामस्मरण, ध्यान, पूजा, नामयुक्त नमस्कार घालावेत. नमस्कारांत सर्व साधनें.

मग ध्यानाला बसावें. मध्यें कांहीं उपनिषदादिकांचें श्रवण असल्यास जावें; नाहीं तर १२ वाजेपर्यंत ध्यानांत काळ घालवावा. निर्गुण अथवा सगुण ध्यान, तेवढें नाहींच टिकलें तर 'सोऽहं' असा त्याचा अर्थ ध्यानांत घेऊन जप करावा. गुरुसेवेचें साधन असल्यास थोडक्यांत थोडें ध्यान करून देवसेवेचें अथवा गुरुसेवेचें काम करावें. बारा वाजतां माध्यान्हस्नान, माध्यान्ह संध्या, ब्रह्मयज्ञ, मधुकरी, नैवेद्य, भोजन. दुपारीं ग्रंथावलोकन अथवा स्वाध्याय म्हणून थोडें उपनिषत् आदि कांहीं सांगवून घ्यावें. सायंकाळीं पुन्हां स्नान, सायंआन्हिक, उपाहार, ध्यानपूर्वक विश्रांति. ध्यान जसें जसें अधिकाधिक वेळ टिकेल, त्याप्रमाणें इतर कमी करीत जावें आणि होईल तों अधिक वेळ निर्विकल्प स्थितींत घालवावा. 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा॥' (भ. गी. ६–१७). आंखीव नियमित आचरण असावें. ठराविक वेळीं अमुक म्हणजे अमुक व्हावेंच. नेमका ठरल्या वेळीं आहार घ्यावा. देहाच्या क्रिया व्यायामादि नियमित वेळीं ठराविक असाव्यात. नियमित वेळीं झोंपावें. ठरल्या वेळीं उठावें. जागरण करूं नये, त्यानें उष्णता वाढते. ठराविक वेळीं ध्यानाला बसावें. उष्ण आहार (चहा, कॉफी इत्यादि), मादक उष्ण पेयें घेऊं नयेत. सकाळीं व रात्रीं शक्य झाल्यास दूध प्यावें; नाहीं तर उषःपान करीत जावें. केवळ गाईच्या दुधावर राहिल्यास त्य [illegible]चारी योग्यास एक वर्षानंतर योगसिद्धि लाभते, असें योगोपनिषदाचें सांगणें आहे. दुर्जनदर्शन, दुर्जनसहवास, दुष्टशब्दश्रवण इत्यादि होऊं नयेत. आपल्या भूमिकेविरुद्ध, अभ्यासाविरुद्ध चित्तविक्षेपकारक असणाऱ्या सर्वांचाच त्याग करावा. मन दिवसेंदिवस शुद्ध शुद्ध होत चाललें आहे किंवा नाहीं, याचा आढावा

काढीत असावें. तें आत्मस्थितींत अधिकाधिक वेळ राहूं लागलें आहे किंवा नाहीं, सुधारणा किती होत चालली आहे इकडे लक्ष पुरवावें सबंध जन्मभर ऋतस्थ रहाण्याचा हा निवृत्तिमार्ग आहे.

## मनोनाशाचें साधन

'धकाधकीचा मामला। कैसा घडे अशक्ताला।' (दा. १९–१०–२२). म्हणून दिवसेंदिवस आपल्याला सर्वतोपरी शक्त करीत असावें. 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः।' (कठ. उ.) दुर्बळाला आत्मप्राप्ति होत नाहीं, असें कठोपनिषदांत आलें आहे. 'प्रपंच दुस्तर घोर हा संसार मन अनिवार विषयलोभी। नावडे भजन पूजन परमार्थ रात्रंदिवस स्वार्थ विषयाचा॥' मनाचा हा साहजिकच असणारा सांचा आहे. मन जरी असें असलें तरी आपल्याला आपलें हित साधावयाला धैर्यानें प्रयत्न हा केला पाहिजेच. या अभंगांत श्रीसमर्थांनीं आपल्याला कसा धीर दिला आहे पहा – 'काय करितें हें मन। साक्ष आपुला आपण॥ १॥ हित आपुलें करावें। ना तरी यमलोकां जावें॥ २॥ काय वासना म्हणते। आपणांस साक्ष येते॥ ३॥' मनाला जाणणारे आपण त्याचे ज्ञानरूप साक्षी आहों. त्याच्या आदिमध्यान्तींहि आपलें जें ज्ञानरूपाचें अस्तित्व आहे, त्याला या मनाचा आणि मनाच्या नानाविध वैषयिक कल्पनांचा अजीबात संग नाहीं हें जाणून असावें. असा विवेक बाळगला नाहीं आणि मनाप्रमाणें वागलों तर मन निषिद्धाकडेच ओढीत असल्यामुळें नरक चुकणारच नाहीं, याची जाणीव बाळगून असावें असें आतांपर्यंत सांगितलें. 'मन आहे बारगळ। केल्या होतसे निवळ॥ ४॥ सोडीना हें संसारिक। कांहीं पहावा विवेक॥ ५॥' या विवेकाचें लक्षण वर सांगितलें. विवेक न बाळगतां मनाच्याच पाठीमागें लागलें तर हें कांहीं विषय सोडावयाला कधींच तयार होणार नाहीं

विवेकानें मात्र मन निवळतें. मनाच्या मगरमिठींतून लौकर सुटावयास पाहिजे. मनाचेच चोजले पुरवीत बसलों तर याच्या पायीं निश्चित मरण आहे असें समजावें. 'मन हें ओढाळ गुरूं परधन परकामिनीकडे धांवे। यास्तव विवेकपाशें कंठीं वैराग्यकाष्ठ बांधावें ॥ १ ॥' ही मोरोपंतांची आर्या सुप्रसिद्धच आहे. 'आपण वस्तु सिद्ध चि आहे। मन मी ऐसें कल्पूं नये। साधु सांगती उपाये। तूंचि आत्मा ॥ (दा. ८–१०–७५) मन मी ऐसें नाथिलें। संतीं नाहीं निरोपिलें। मानावें कोणाच्या बोलें। मन मी ऐसें ॥ ७६ ॥ संतवचनीं ठेवितां भाव। तोचि शुद्ध स्वानुभव। मनाचा तैसाच स्वभाव। आपण वस्तु ॥ ७७ ॥ जयाचा घ्यावा अनुभव। तोचि आपण निरावेव। आपुला घेती अनुभव। विश्वजन ॥ ७८ ॥ लोभी धन साधूं गेले। तंव ते लोभी धनचि जाले। मग तें भाग्यपुरुषीं भोगिलें। सावकास ॥ ७९ ॥' 'प्रमादो मृत्युरित्याहुः।' आत्मध्यान व विरक्ति चुकणें आणि मनाप्रमाणें विषय अनुभवणें हा प्रमाद आहे विषयानुभवांत अत्यंत आत्म-विस्मृति होते. 'मृत्युरत्यन्तविस्मृतिः।' आत्मरूपाची अत्यंत विस्मृति होणें हाच मृत्यु आहे. देहाभिमानानें जगण्यांत, विषयसुख भोगण्यांत 'अकायो निर्गुणो ह्यात्मा।' आत्मा देहशून्य (निराकार) निर्गुण आहे ही आत्मस्मृति रहात नाहीं. आपली ही स्मृति नष्ट झाली कीं झालें. आपल्या अस्तित्वाचें भान न होणें म्हणजेच मरण, दुसरें काय? तेव्हां देहाभिमान धरूं नका. विषयाकडे ढुंकूनहि पाहूं नका. मनाची कांस धरल्यानें नरक आहे. मनाला तुमच्या कच्छपीं लागूं द्या. एरवीं 'दास म्हणे सावधान। पदरीं बांधिलें मरण ॥' हा इशारा दिला आहे हें एक आणि दुसरें – येच क्षणीं मरो नि जासी। तरी रघुनाथीं अंतरलासी। (दा. ३–१०–५०).' देहाला केव्हां मरण येईल हें काय सांगतां येतें, म्हणून लौकरांत लौकर आत्मनिष्ठा बळकट करायला 'कांहीं धांवाधांव

करी। जंव तो काळ आहे दुरी।' असा कळकळीचा उपदेश आहे. 'देह-बुद्धीचा संशयो। करी समाधानाचा क्षयो। चुके समाधान समयो। देह-बुद्धियोगें ॥' ( दा. बो. ७–२–३३ ).

'देह पावे जंवरी मरण। तंवरी धरी देहाभिमान। पुन्हां दाखवी पुनरागमन। देहबुद्धि मागुती ॥ ( दा. ७–२–३५ ) हित आहे देहातीत। म्हणौनि निरोपिती संत। देहबुद्धीनें अन्हित ( अनहित )। होंचि लागे ॥ ३७ ॥ म्हणौनि देहबुद्धि हे झडे। तरीच परमार्थ घडे। देहबुद्धीनें विघडे। ऐक्यता ब्रह्मींची ॥ ३९ ॥ विवेक वस्तूकडे ओढी। देहबुद्धि तथूनि पाडी। अहंता लावून निवडी। वेगळेपणें ॥ ४० ॥ विचक्षणें या कारणें। देहबुद्धि त्यजावी श्रवणें। सत्यब्रह्मीं साचारपणें। मिळोन जावें ॥ ४१ ॥' मन मोठें चिवट. श्रीसमर्थ म्हणतात, 'नाना उपायीं मरतां मरेना।' मग कांहीं उपाय म्हणून विचारलें असतां, 'तें निर्गुणीं पांगुळतां मरावें।' एक निर्गुण स्वरूपाच्या धारणेनें हें पांगळें होऊन मरावें नाहीं तर कठीण. म्हणून 'निरूपणें मानस आवरावें।' असें श्रीसमर्थांनीं साधन सांगितलें आहे. 'ज्ञेयवस्तुपरित्यागाद्विलयं याति मानसम्।' ज्ञेयवस्तूच्या परित्यागानें मनोलय होतो, असें श्रीरामांचें सांगणें मुक्तिकोपनिषदांत आढळून येतें.

'मनसोऽभ्युदयो नाशो मनोनाश इति स्मृतः।' ( मुक्तिकोपनि. अ. २–३९ ). मन म्हणजे ठोकळ मानानें स्पंद, वृत्ति अथवा स्फुरण. तें न होऊं देणें मनोनाशाचें साधन आहे. वृत्ति, स्फूर्ति, स्पंद निर्माण होऊं दिला नाहीं तर कल्पनाच कसली न उमटतां आपली स्थिति ज्ञेयशून्य ज्ञानाकारच सदोदित असते. 'अध्यात्मविद्याधिगमः साधुसंगतिरेव च। वासनासंपरित्याग प्राणस्पन्दनिरोधनम्। एतास्ता युक्तयः पुष्टाः।' ( मु. उ. अ. २–४४–४५ ) १. अध्यात्मज्ञानाची संप्राप्ति; २. श्रीगुरु अथवा साधु-समागम. मात्र तो गुरु अथवा साधु निवृत्तिमार्गानें जाऊन पूर्ण ब्रह्मनिष्ठ झालेला असला पाहिजे; ३. विषयांच्या ठिकाणचा दोष

आणि अपाय ध्यानांत आणून देहाचें मिथ्यात्व व निःसारत्व, अशुचित्व, दौर्गंध्य, मलरूपत्व ओळखून वीट आणणाऱ्या घाणेरड्या विषयवासनांचा त्याग; ४. आणि प्राणायाम. अशीं हीं मनोजयाचीं साधनें मुक्तिकोप-निषदांत सांगितलीं आहेत. ‘प्राणस्पंदनिरोधात् सत्संगाद्वासनात्यागात्। हरिचरणभक्तियोगात् मनः स्ववेगं जहाति इति।’ हा श्लोक श्रीशंकरा-चार्यांचा आहे ( प्रबोधसुधाकर ७७ ). हरिचरणाच्या ठिकाणीं निःसीम भक्ति अथवा प्रेम बाळगण्याचें एक पूर्वीच्या श्लोकाहून अधिक साधन यांत सांगितलें आहे. ‘सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा च। अमृतस्वरूपा च।’ ( नादरभक्तिसूत्र १ ) ‘सा परानुरक्तिरीश्वरे।’ ( शांडिल्य भ. सू. १ ) निरवधि प्रेमानें मन भृंगासारखें भगवच्चरणकमलीं देहभान विसरून रंगणें ही भक्ति होय. ‘ईश्वरप्रणिधानाद्वा।’ ( पातं. यो. सू. स. पा. २३ ) ‘समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।’ ( सा. पा. ४५ ) ( १ ) भक्तीनेंहि मनाचा लय होतो. विषाप्रमाणें विषयसुख बघून, देह घाणीची कल्पना राखून निर्वासन होणें. ( २ ) सर्वांपूर्वील चिन्मात्र आनंदघन अशा आपल्या स्वतःसिद्ध, नित्य, निर्विकल्प रूपाच्या दृष्टीनें उठलेल्या वृत्ति, स्फुरण यांपासून कांहींच मला लाभ नाहीं. चंचल म्हणून माझ्यांत कांहींच नाहीं, मी निश्चल आनंदरूप आहें, असें आत्मतत्त्व जाणणें. ( ३ ) असा निश्चय बाळगून वृत्तीच न उठूं देण्याचा अभ्यास करणें. इत्यादि मनोजयावर अचूक उपाय लागू पडतात. ‘मुख्य शक्तिपात ऐसा। नाहीं चंचळाचा वळसा।’ असें श्रीसमर्थांचें सांगणें आहे.

## आत्मानंदाच्या धारणेचा अभ्यास

भगवद्गीतेच्या ६ व्या अध्यायांतल्या १० व्या श्लोकापासून योगाभ्यासाच्या उपदेशाला प्रारंभ होऊन सुमारें २८ श्लोकांपर्यंत तो तसाच चालू आहे. त्यांपैकीं २४ ते २८ पर्यंतचे श्लोक फार महत्त्वाचे

आहेत ते देतों : 'संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः। मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ॥ २४ ॥ शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया। आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥ २५ ॥ यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम्। ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥ प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम्। उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥ युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः। सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥२८॥' — 'त्या त्या कल्पनेनें उत्पन्न होणाऱ्या अखिल कामनांना त्यांच्या वासनेसह व आसक्तिसह कशाचीहि कल्पना मनांत न उठूं देतां निःशेष नष्ट करून, आनंदस्वरूपाच्या भानानें इंद्रियें अंतर्मुख करून, आत्मनिश्चयाच्या धैर्यानें हळूहळू आनंदच एक उरवून वृत्तिशून्य व्हावें. एका आनंदाच्या जाणिवेशिवाय अन्य कशाचेंहि चिंतन होऊं देऊं नये. निःस्फूर्तिक निर्विकल्प, आनंदरूप अशा मला कोणत्याहि स्फूर्तीपासून, वृत्तीपासून, कल्पनेपासून, कोणत्याहि नामरूपात्मक भानापासून काय प्रयोजन, म्हणून विवेक आणून इकडे-तिकडे धांवणाऱ्या मनाला कुठेंच न जाऊं देतां, वृत्तीच न उठूं देतां, पुनः पुनः निर्विकल्प अनुभवरूप, एक जाणीवरूप आनंदच उरवीत असावा. अशा अधिक कालाच्या अभ्यासानें मन शांत झालें, रजोगुणात्मक कामक्रोधादि विकार नष्ट झाले म्हणजे त्या योग्याला अत्यंत पवित्र, अति निष्पाप सर्वोत्कृष्ट परब्रह्माचें निरवधि सुख प्राप्त होत. आनंदाविर्भाव होईपर्यंत अभ्यास पुरेसा झाला नाहीं, असें जाणून अधिक काळ अभ्यासांत घालवावा. 'ब्रह्माकारमनोवृत्तिप्रवाहोऽहंकृतिं विना। संप्रज्ञातसमाधिः स्याद्ध्यानाभ्यासप्रकर्षतः ॥' मी असें एकदेशीय भान न स्फुरतां आनंदस्वरूपांत, ब्रह्माकारतेंत सर्व मनोवृत्ति विरघळून गेल्या आणि एका आनंदाच्या संवेदनेशिवाय कांहींहि स्फुरलें नाहीं म्हणजे उत्कट ध्यानाभ्यासानें साधणारी ही संप्रज्ञात समाधि म्हणविते. 'प्रशान्तवृत्तिकं चित्तं परमानंददायकम्।

असंप्रज्ञातनामायं समाधिर्योगिनां प्रियः।' (मुक्ति. ५३–५४). सावकल्पांतील ती वेदनाहि हळूहळू विरघळून, प्रभाशून्य, मनःशून्य अशी निर्विकल्प आनंदमात्र स्थिति राहिली म्हणजे ती असंप्रज्ञात समाधि म्हणवून घेते. अन्य योगधारणेसाठीं शांडिल्य आणि श्रीजाबालदर्शनोपनिषद् पहाणें. या संदेशांत साक्षात् आत्मज्ञानाला अनुकूल असा आत्मानंदाच्या धारणेचा अभ्यास गीतादिकांतून असलेला सांगितला आहे.

उगीच बसलें म्हणजे आपण मुखाच्या भागांत केवळ एक जाणीवरूपानें आहों असें प्रत्ययास येतें. नाभीपासून हृदयापर्यंतच्या भागांतून म्हणजे खालून वृत्ति स्फुरून वर तिचा स्फोट होऊन ती कल्पना दृश्य झाल्यानंतर द्रष्टृत्वाचाहि एक भाव उमटून, ती कल्पना अनुकूल-प्रतिकूल असल्याप्रमाणें, तिच्यापासून आनंद अथवा उद्विग्नता त्या द्रष्टेपणाच्या अनुभवांत प्रगटते. कांहींहि कल्पना नसतांना आपण जें एक केवळ जाणीवरूपानें होतों तें आपलें आनंदरूप, हा सर्व मागचा खेळखंडोबा होण्यापूर्वी, जसें होतें तसेंच, तो होत असतांना व होऊन मावळला तरी, जशाचें तसेंच असतें. तें निर्विकल्प ज्ञानरूप आपण सदाचेंच; वृत्ति, तिचें उत्पन्न होऊन नाश होणें, तिच्यांतील ती कल्पना, द्रष्टृत्वाचें प्राकट्य आणि त्या कल्पनेच्या इष्टानिष्टतेप्रमाणें झालेले सुखदुःखादि परिणाम या सर्वांचेच केवळ जाणीवरूपानें साक्षी म्हणजे प्रकाशक आपण आहों आणि त्या आपल्याला याचा कधीं स्पर्श सुद्धां होत नाहीं, ना झाला आहे व आपल्या त्या ज्ञानानंदरूपांत कसलाहि बिघाड झाला नाहीं, ना कधीं होणें शक्य आहे, हा निश्चय वाढविण्याचा आणि होईल तितका अधिक वेळ त्या स्थितींत रहाण्याचा हा अभ्यास म्हणजे स्वरूपस्थितीचा अथवा स्वरूपनिष्ठेचा अभ्यास आहे. वृत्ति अधोभागांतून उठत असतां असतांनाच तिच्या बुडाशीं असणाऱ्या निर्विकार ज्ञानांत ती विरवून टाकली, तिचा

स्फोट होऊं दिला नाहीं म्हणजे कोणतीच कल्पना जाणवत नाहीं, इष्टानिष्ट परिणामहि होत नाहीं; एक ज्ञानानंदच शिल्लक उरतो.

**'श्रीरामो ब्रह्मतारकम्'**

'चिद्धीदं सर्वं काशते काशते च।' (नृ. उ. ता. खं. ७) 'चिद्रूपं ब्रह्म।' 'जगदांतरीं अनुसंधान। बरें पाहाणें हेंचि ध्यान। ध्यान आणि तें ज्ञान। एकरूप ॥ (दा. २०–४–१२) प्रगट रामाचें निशाण। आत्माराम ज्ञानघन। विश्वंभर विद्यमान। भाग्यें कळें ॥ १४ ॥' अशी श्रीरामोपासना म्हणजे ब्रह्मोपासनाच श्रीसमर्थांनीं सांगितली. उपासनेच्या ठिकाणीं ब्रह्मभाव ठेवून 'सोऽहं भावेन पूजयेत्' तें आपलें शुद्धरूप आहे म्हणून उपासना करावी, असा तत्त्वप्रधान श्रुतिशास्त्रांचा मूलग्राही उपदेश आहे. 'तत्सद्यत्परं ब्रह्म रामचन्द्रश्चिदात्मकः। सोऽहमों तद्रामभद्रपरं ज्योतिः सोऽहमोमित्यात्मानमादाय मनसा ब्रह्मणैकीकुर्यात् ॥' (श्रीराम उ. ता. उ.) ज्ञानघन श्रीरामचंद्र जें एक अविनाशी परब्रह्म आहेत तेंच मी ओंकारलक्ष्य सर्वप्रकाशक श्रेष्ठ स्वयंज्योतिस्वरूप श्रीरामभद्ररूप आहें अशी ऐक्यरूप श्रीरामरायांची उपासना करण्याविषयीं श्रीरामोत्तरतापिनींत सांगितलें आहे. 'सदा रामोऽहमस्मीति तत्त्वतः प्रवदन्ति ये। न ते संसारिणो नूनं राम एव न संशयः ॥' (श्रीराम उ. ता. उ.). तात्त्विक सत्य ओळखून जे सदैव मी तें परब्रह्मरूप श्रीराम आहें असें म्हणतात, ते खरोखरच निःसंशय श्रीरामच, ते प्राणिमात्राचें शुद्धरूप परब्रह्मच होऊन असतात, असेंहि पण पुढच्या मंत्रांत आलें आहे. 'रमन्ते योगिनो यस्मिन्नित्यानंदे चिदात्मनि। इति रामपदेनासौ परं ब्रह्माभिधीयते।' कांहीं ठिकाणीं 'रमन्ते योगिनोऽनंते नित्यानंदे चिदात्मनि।' (श्रीराम पू. ता. १–६) असें आहे. एकंदरींत महान् योगी ज्या एका अविनाशी, अपार, आनंदघन, संविन्मात्र अशा आत्मरूपाच्या ठिकाणीं अखंड रममाण झालेले असतात, तेंच श्रीरामाचें

यथार्थरूप असल्यामुळें श्रीराम प्रत्यक्ष परब्रह्मच आहेत, असें श्रीराम-पूर्वतापिनींत आलें आहे. श्रीरामरहस्यांतहि असाच एक मंत्र आला आहे तो हा – 'राम एव परं ब्रह्म राम एव परं तपः। राम एव परं तत्त्वं श्रीरामो ब्रह्मतारकम्।' (श्रीरामरहस्य उ. १–६), 'गर्भजन्मजरामरण-संसारमहद्भयात्संतारयतीति। तस्मादुच्यते तारकमिति।' (श्रीराम. उ. ता. २) श्रीरामाला तारकब्रह्म म्हणून कां म्हटलें या प्रश्नाचें उपनिषत् 'श्रीराम गर्भ, जन्म, म्हातारपण, मरण इत्यादिकांनीं युक्त असणाऱ्या संसाराच्या महद्भयापासून भक्तांना तारतात म्हणून त्यांना तारकब्रह्म अथवा श्रीगुरु असें म्हणतात' याप्रमाणें उत्तर देऊन समाधान करतें.

'उपासना ह्मणिजे ज्ञान। ज्ञानें पाविजे निरंजन। योगियांचें समाधान। येणें रितीं॥' (दा. २०–४–२२) श्रीराम या शब्दांत हरिहरैक्य आहे म्हणून व शैव तसेंच वैष्णव या दोघांनाहि श्रीराम आपलें उपास्य-दैवतच आहेत हें समजावें म्हणून फोड करून उपनिषत् असें सांगतें: 'नारायणाष्टाक्षरे च शिवपञ्चाक्षरे तथा। सार्थकार्णद्वयं रामो रमन्ते यत्र योगिनः।' (रामरहस्य उ. ५–३) 'ॐ नमो नारायणाय' आणि 'ॐ नमः शिवाय' या दोन मंत्रांतील सारार्थगर्भित असे महत्त्वाचें 'रा' आणि 'म' हे दोन शब्द घेऊन 'राम' हा मंत्र झाला आहे. 'आद्यो 'रा' तत्पदार्थः स्यात् 'म'कारस्त्वं पदार्थवान्। तयोः संयोजनमसीत्यर्थे (मुनयः) तत्त्वविदो विदुः॥' (रामरहस्य उ. ५–१३). राम हा मंत्र सर्वांना 'तें परब्रह्म तूं आहेस,' 'तत्त्वमसि,' म्हणून उपदेश करतो, हें या वचनानें व्यक्त केलें आहे. आद्य 'रा' तत्पदवाच्य परमेश्वर आणि नंतरचें 'म' हें त्वंपदवाच्य जीव अशा या दोन नांवांना कारणीभूत होणाऱ्या माया आणि अविद्या या दोन उपाधि यांच्यांतून काढून टाकल्यानंतर यांच्या ठिकाणीं जें एक चिदानन्द परब्रह्म सर्वाधिष्ठानरूप उरतें तेंच तूं असा अर्थ ज्या असि पदानें होतो तें रा आणि म या दोन अक्षरांच्या एकदम

उच्चारानें झालेल्या ऐक्यांत आहे असें हा मंत्र सांगतो. रा हें स्वयंप्रकाश परब्रह्मरूप आहे आणि म मायारूप आहे. प्रथम अग्निबीजरूप ( रं ) रा उच्चारलें जाऊन नंतर ( मं ) म चा उच्चार होत असल्यामुळें स्वयंप्रकाश चिदग्निरूप परंब्रह्मांत, रामनामाचा उच्चार केल्याबरोबर, म कारानें लक्षित होणारी माया हुत होते, यामुळें मायानाशक हें नाम आहे. या नामांत प्रकृतिपुरुषांचें ऐक्य होऊन उच्चाराअंतीं प्रगटणाऱ्या मौनांत निःशब्द परब्रह्माचा साक्षात्कार होतो. मायाबीज आणि ब्रह्मबीज या मंत्रांत असल्यामुळें मोक्षाचीहि प्राप्ति होते आणि इच्छिल्यास वैभवाचीहि प्राप्ति होते, म्हणून हा मंत्र, हें नाम, भुक्तिमुक्ति देणारें, अभ्युदयनिःश्रेयसात्मक आहे, इत्यादि अनेक प्रकारांनीं रामरहस्याच्या शेवटच्या विभागांत 'राम'-नामाचा विचार केला आहे.

## 'तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य'

'धर्ममार्गचरित्रेण ज्ञानमार्गं च नामतः । तथा ध्यानेन वैराग्यमैश्वर्यं स्वस्य पूजनात् ॥' ( श्रीराम पू. ता. उ. १–४–५ ) श्रीराम हे आपल्या चरित्रानें धर्ममार्गाची, नामस्मरणानें ज्ञानमार्गाची, ध्यानानें वैराग्याची आणि पूजनानें ऐश्वर्याची प्राप्ति करून देतात, असा या मंत्राचा अर्थ आहे. निःस्पृहांना सर्वाऐवजीं ज्ञान, वैराग्य आणि एक मोक्ष मिळाला म्हणजे झालें, बाकी कांहीं नको, हें उघड आहे. श्रीरामाच्या उपासनेची ओळख पटवून देण्याकरितांच जणुं रचलेला एक श्रीसमर्थांचा अभंग येथें देतों : 'रामदास्य आणि हें वाया जाईल । ऐसें न घडेल कदाकाळीं ॥ १ ॥ कदाकाळीं रामदासां उपेक्षीना । राम उपासना ऐसी आहे ॥ २ ॥ ऐसी आहे सार राघवाची भक्ति । विभक्तांची शक्ति जेथें नाहीं ॥ ३ ॥ जेथें नाहीं कांहीं वाउगें माईक । राम उपासक दास म्हणे ॥ ४ ॥' श्रीरामउपासनेंत विभक्तांची भक्ति, भेदभक्ति नाहीं. विभक्तीची शक्ति म्हणजेहि तोच अर्थ. या ठिकाणीं

वाउगें, व्यर्थ दिसून येणारें मायिक असें कांहीं नाहीं. भरगच्च ब्रह्मरसच या उपासनेंत एक भरला आहे, असें शेवटीं श्रीसमर्थ आपलें नांव देऊन ग्वाही पटवितात. रामदास्य केव्हां व आपण कसें वागलें असतां श्लाघ्य-वाणें होतें तें कोठें बघावयाचें झाल्यास खालील पद्य बघा : ' कायावाचामनें यथार्थ रामीं मिळणें। तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ १ ॥ कामक्रोध खंडणें मदमत्सर दंडणें। तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ २ ॥ परस्त्रीनपूं-सक होणें परद्रव्यें न पोसणें। तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ ३ ॥ जैसें मुखें बोलणें तैसीच क्रिया चालणें। तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ ४ ॥ मायानिवर्तक ज्ञानें ज्ञेयचि पै होणें। तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ ५ ॥ रामदास म्हणे निर्गुणसुख लाधणें। तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ ६ ॥ '

रामदास हें नांव कोणाला केव्हां प्राप्त होतें तें या पुढच्या पद्यानें स्पष्ट होतें : ' भव्यरूप अतिसुंदर दीक्षा। रामनामस्मरणें करि भिक्षा। वृत्ति होइल उदासीन जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ १ ॥ नाठवे धन-सुतालय जाया। मृगजळापरि भावित काया। परवधू जननीसम जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ २ ॥ शुद्ध भक्त हरिची करि पूजा। विश्व पाहे आपणासम वोजा। शांति पूर्ण बरवी धरि जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ३ ॥ करि कथा परि न वांछित कांहीं। चित्तवृत्ति अवघी हरिपायीं। कल्पना समुळ तोडिल जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ४ ॥ नित्य नेम बरवा जगीं ज्याचा। प्रतिदिनीं हरिचे भजनाचा। गुरुपदीं रचना असे जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ५ ॥ सर्व लोक भजनाप्रति लावी। लालुची धनिं कदापि नसावी। बोलणें सम क्रिया घडे जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ६ ॥ विमल ज्ञान बोले जगीं स्पष्ट। ब्रह्म निर्गुण कळे जगीं श्रेष्ठ। सर्व माईक असे कळे जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ७ ॥ बोलणें प्रचितिचें जगीं मान्ये। निवडं जों सकळांप्रति जाणें। वांछिती जन सज्जन जेव्हां। राम-

दास म्हणणें मग तेव्हां ॥ ८ ॥ निश्चयें करि रामउपासना। रामनौमि रघोत्तमपूजना। तृप्त होती द्विज याचक जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ९ ॥ यत्न साधुन करी पुढें पाठ। अर्थ जाणुनि वदे जगीं स्पष्ट। मागिलें उजळणी करी जेव्हां। रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ १० ॥'

रामदासी संप्रदायाचीं लक्षणें कोणतीं अशी जिज्ञासा असेल तर निःस्पृहांनीं खालील पद्य वाचून निश्चय करावा आणि निवृत्तिमार्गानें कृतार्थ व्हावें – 'जाणावा रामदासांचा हाचि संप्रदाय ॥ ध्रु. ॥ व्रत ज्याचें ब्रह्मचारी। वस्त्रें ज्याचीं हुर्मुजी बरीं। विवेक वैराग्य तें भारी। तारी जडजीवांतें ॥ १ ॥ नित्य वाची दासबोध। शोधी सारासार शोध। सांगे भाविकांसी बोध। करी रोध इंद्रियां ॥ २ ॥ सदा वृत्ति नित्य नेम। रामीं ज्याचें अखंड प्रेम। ऐसा देखोनि योगक्षेम। कांपे यम चळचळां ॥ ३ ॥ झोळी निरापशाकर। भिक्षा मागे घरोघर। देखोनियां चमत्कार। नारी नर धांवती ॥ ४ ॥ ऐसी निस्पृहाची रीत। सांगितली यथास्थित। हरिरंगीं अति प्रीत। तेणें कीर्ति विस्तारे ॥ ५ ॥'

## आदर्श साधकावस्था

'तो जातचि असतां मेला। मरणास मारून ज्याला। जन्ममृत्य न स्मरे त्याला। विवेकबळें ॥' (दा. ७–१०–३०) असेंच कठरुद्रोपनिषदाचें एक वाक्य आहे : 'स्वयं मृत्वा स्वयं भूत्वा स्वयमेवावशिष्यते।' (क. रु. उ. ४३) या परमार्थात, मेलेल्या माणसांचा जसा देहाशीं कांहीं संबंध नसतो, त्याप्रमाणें देहाचा संबंध न बाळगतां देहाभिमान आणि संबंध घालवून म्हणजे मरून मग आत्मनिश्चयाचा नवा जन्म घेऊन आपल्या एका ज्ञानमात्र अथवा ज्ञप्तिमात्र आनंदाहून दुसरें कांहींच नाहीं असें ओळखून आपणच एक उरून निःस्पृहांनीं साधन करावयाचें असतें. मी श्रीबद्रीनारायणाला गेलों असतां तिथल्या साधकांचा

योग्यक्षेम विचारण्याकरितां " कसें काय ? सर्व बरें आहे ना ? ठीक चाललें आहे ना ? कसला त्रास अथवा कांहीं कमी नाहीं ना ? " म्हणून चौकशी केली असतां " हम सब मुड्दे बन कर साधन कर रहें हैं, । " असें त्यांनीं उत्तर दिलें. मीहि तशाच भूमिकेंतून गेलों असल्यामुळें त्याचा मला अर्थ लागला. शवाला सुख-दुःख, काम-क्रोध, मान-अपमान, देहाच्या कोणत्याहि कष्टाचें परिज्ञान जसें नसतें, त्याप्रमाणेंच निःस्पृहानें रहावें. कशाकडे आणि कोणाकडे न बघतां कसलाहि विचार मनांत न आणतां केवळ शवासारखें सहनशील व बाह्य विचारशून्य होऊन निःस्पृहांनीं साधन करावयाचें असतें.

'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ।' बाह्य उपकरणांच्या अनुकूलतेनें आजपर्यंतच्या निःस्पृह साधकांना परमार्थ साधला असें नसून केवळ एक त्यांच्या सत्त्वबळानेंच साधला हें अगदीं न खोडतां येणारें निर्भेळ सत्य आहे. 'मागें ज्ञानी होऊन गेले ।' ( दा. १२-८-१० ) त्यांना विघ्नें कमी आलीं नाहींत. 'विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः । प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥' हेंच खरें. विघ्नांच्या गारांचा पाऊसच त्यांच्यावर पडत होता तरी प्रारंभिलेलें तडीस नेल्याशिवाय सोडावयाचें नाहीं, असा त्यांचा निर्धार होता. 'देहं वा पातयामि अर्थं वा साधयामि ।' हा उत्तम पुरुषांचा बाणा असतो व त्यामुळेंच केवळ सर्व सहन करून पुढें ते सिद्ध झाले. 'यशाचा मार्ग दुःख-संकटांच्या खाईतून गेलेला असतो ' असे उद्गार राज्यादि ऐहिक ध्येयपूर्तीकरितां झटणाऱ्याच्या तोंडूनहि निघतात; तर मग अशा ध्येयाच्यापेक्षांहि 'कोटि गुणें विचार' म्हणून ज्या परमार्थाविषयीं समर्थांनीं सांगितलें त्या परमार्थांत कशीं मोठमोठालीं किती विघ्नें येत असतील याची कल्पना करावी तितकी थोडी आहे. जितकें ध्येय मोठें तितके कष्ट अधिक, या दृष्टीनें ज्याच्याहून कांहीं मोठेंच नाहीं, त्या सर्वातिशय परमार्थाचें ध्येय बाळगणाऱ्याला किती कष्ट होत अस-

तील, हें सांगतां येत नाहीं. ' यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह । ' हें आत्मरूपाचें लक्षण इथेंहि लागू पडतें. ' हा धकाधकीचा मामला ' असतो. विघ्न-दुःख-संकटें यांच्या गर्दीतून, या सर्वांना धक्के देऊनच आपल्या बळानें इथें मार्ग काढीत पुढें जावयाचें असतें. कोणी कोणाला सुखासुखी मार्ग मोकळा करून देत नाहीं म्हणजे आपल्यापुढें जाऊं देत नाहीं. आपल्यापेक्षां याचें बळ अधिक आहे हें ओळखून हरूनच त्याला पुढें जाऊं देतो. हाच न्याय इथेंहि आहे. विघ्न करण्याकरितां जे म्हणून येतील ते कितीहि मोठे असोत, कोणालाच दाद न देतां सर्वांनाच हरवून, मार्ग टाकून निःस्पृहांनीं पुढें जावयाचें असतें.

## मोक्षाचा अति खडतर मार्ग

वर उडी घेणाऱ्याला खालचें गुरुत्वाकर्षण असतेंच. विद्यार्थ्यांची परिक्षा घेतल्याशिवाय वरच्या वर्गांत जसें जाऊं देत नाहींत; त्यांच्याकरितां जसे परीक्षक सरकारकडून नेमलेले असतात; त्याप्रमाणें निःस्पृह साधकांची परीक्षा घेऊन त्यांना कसाला लावण्याकरितां परमेश्वरानें तसेच मोठमोठे परिक्षक नेमले आहेत. त्या सर्वांच्या कठीण परीक्षेंत उतरूनच निःस्पृहांनीं इथें पहिला नंबर मिळवायचा असतो. प्रवृत्तिमार्गांतल्या अभिमानी देव-सैनिकांची फळी फोडूनच निःस्पृहांना पुढें जावयाचें असतें, यांच्या व्यूहांतून बाहेर पडावयाचें असतें. जग चालविणारे अधिकारी व जगाला निर्माण करणाऱ्या देवदेवता सर्व थोड्याफार अंशानें प्रवृत्तिमार्गाचा अभिमान बाळगणाऱ्या आहेत, हें उघड आहे. हे निवृत्तिमार्गीयांना बंडखोर लेखतात आणि आपलें सामर्थ्य असेल-नसेल तितकें वेंचूं म्हणून अस्तन्या चढवूनच येतात ! यांची कोंडी फोडून निःस्पृहाला जावयाचें असतें, हें त्यांनीं ध्यानांत ठेवावें. तेजस्वी मनुष्य आपल्या तेजानें सर्वांना गप्प बसवितो हें वेगळें; पण त्याचा द्वेष आंतून सर्वांनाच असतो. आणि हा

केव्हां घसरून पडेल आणि याच्या उरावर केव्हां बसून मागच्या सर्वांचें उट्टें काढूं म्हणून सर्व टपलेले असतात.

जगाचें साम्राज्य मिळविणाऱ्या तेजस्वी माणसांपेक्षां आत्मीय मोक्षसाम्राज्य मिळविणारा किती तरी पटीनें तेजस्वी असावा लागतो. तसेंच त्याच्या ठिकाणीं वीर्य, धैर्य, शौर्य आणि चिकाटी असावी लागते. 'बलादाकृष्य मोहाय महामाया नियच्छति।' ( सप्तशति ) निःस्पृहांच्या प्रतिपक्षाच्या सैन्याचें नेतृत्व महामायेनेंच आपल्याकडे घेतलेलें असतें. प्रवृत्तिमार्गाची शक्ति म्हणजेच तें हिचें रूप. कामक्रोधादि सर्व विकार हिचे सैनिक आहेत. अति दुष्ट म्हणून यांची ख्याति आहे. 'आपल्या तेजस्वितेची आणि विवेकाची घमेंड बाळगून प्रौढी मिरविण्याकरितां प्रवृत्तिमार्ग डावलून जातोस काय? शास्त्रीय प्रवृत्तिमार्गाला डावलून जाणाऱ्या तुला शेवटीं त्याचीहि प्राप्ति न होऊं देतां निषिद्ध मार्गालाच खेचून ब्रह्मराक्षस, पिशाचादि योनींत घालून हजारों-शेंकडों वर्षें विकारांच्या आगींत नाहीं पचविलें तर नांव बदलूं! हा नरदेहहि येऊं न देतां त्या पापानें कृमिकीटकांच्या जन्मापासून तुला वर वर यावयाला नाहीं लावलें तर बघ!' – असें म्हणून कामादि वीर आपल्या मिशांना पीळ भरीत मधें उभे असतात. यांच्या छातीवर पाय देत मोक्षाचा मार्ग निःस्पृहांना चालून जावयाचा असतो, हें विसरून भागावयाचें नाहीं. परमार्थाच्य आखाड्यांत उतरल्याबरोबर जो प्रथम सलामी द्यावयाला येतो, तोच हा सर्वांत मोठा पहिलवान काम! प्रधानमल्लनिबर्हणन्यायानें याला प्रथम चीत केलें म्हणजे मग इतरांची काळजी करण्याचें कारण नाहीं. असें म्हटलें तरी क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ईर्षा, दंभ, असूया यांचेंहि सामर्थ्य कांहीं कमी नाहीं. या सर्वांना चीत करूनच खरा निःस्पृह परमार्थी अथवा मोक्षार्थी व्हावयाचें असतें.

दारेषणा, वित्तेषणा, पुत्रेषणा, देहवासना, शास्त्रवासना, लोकवासना असे हे मोठमोठे घाट चढून जाऊनच मग वैराग्याच्या खऱ्या सपाटीवर पाऊल पडतें, हें निःस्पृहांनीं ध्यानांत बाळगावयाला पाहिजे. हे सर्वच रडतोंडीचे घाट आहेत. निःस्पृहांचा मोक्षमार्ग प्रथम माणसांच्या वस्तींतून व नंतर स्मशानांतून जातो. हें स्मशान भूत, पिशाच्च, डाकिण्या, शाकिण्या आदिकांनीं नुसतें गजबजून राहिलेलें असतें. त्याच्यापुढें देवांच्या वस्तींतून निःस्पृह पुढें जातो. इथें अप्सरा, रंभा, मेनका असतात. अस्खलित ब्रह्मचर्यानें हे तीन टप्पे ओलांडल्यानंतर निःस्पृहांना खरा मोक्षाचा मार्ग लागतो, हेंहि पण निःस्पृहांनीं लक्षांत ठेवावयाला पाहिजे. या मार्गांतून जात असतां तिथें तिथें देहाचें अस्वास्थ्य, शोक, दुःखाची भावना, भय, रोगाच्या कल्पना, शंका, संशय, विपर्यय, दुराग्रह इत्यादि कुत्रीं पाठीमागें लागतातच. यांचा जबडा फार मोठा असतो. एकानेंहि तोंड टाकलें तरी पुरे ! साधक लुळा व्हावयाला दुसरा कुत्रा नको ! त्या त्या ठिकाणीं ( Red Signal ) धोक्याच्या सूचनांच्या पाट्या लावून ठेवून हवालदिल झालेल्या साधकांच्या योगक्षेमाची सोय व्हावी म्हणून तिथें तिथें आश्रम करून राहिलेल्या महात्म्यांची भेट सहारा वाळवंटांतल्या ( Oasis ) उद्यानाप्रमाणें थकवा घालवून पुन्हा जोमानें पुढें जावयाला फारच उपयोगी पडते. वस्त्र फ ` ्यांना इथें वस्त्र मिळतें. क्षुधा-तृषार्तांना अमृतोपम अन्नपाणी मिळतें. रोग्यांना औषधोपचार होतो. इथले सर्व उपचार घेऊन प्रवासी सर्व साधनांनिशीं नव्या हुरूपानें पुन्हा पुढें चालूं लागतो. पुढच्या मार्गाचीहि इथें माहिती मिळते. इथली मंडळी वळणापर्यंत येऊन वाटेला लावून परत येतात. ही एक ईश्वराची या मार्गांत मोठी दया आहे.

मार्ग सोडून आडवळणांत कांहीं मोठ्या भपक्याचीं मोठमोठीं घरें या मार्गांतून चालले असतांना दिसतात. मात्र ओढाळ इंद्रियरूपी

दुष्टांच्या या मोठमोठ्या हवेल्या आहेत; आपल्या शोभेनें व वैभवानें साधकाचें चित्त आपल्याकडे ओढून घेण्याइतक्या आकर्षक आणि सुंदर त्या असतात. तिकडे चुकून गेलेल्या साधकांना लुबाडून, त्या संपत्तीवरचें, यांना पाहून पुन्हा अधिक साधकांनीं आपल्याकडे यावें म्हणून सुंदर सुंदर हवेल्या या वाटमाऱ्यांनीं उभारलेल्या असतात. महात्म्यांनीं सांगितलेलें विसरून अथवा तिकडे दुर्लक्ष करून एकदां का इकडे साधक गेला कीं तिथें कांहीं मिळण्याऐवजीं असलेलेंहि घालवून वशीकरणामुळें त्या इंद्रिय-दुष्टांच्या हाताखालीं शेवटपर्यंत राबत रहावें लागतें. तिथून सुटका होतच नाहीं. मग असे भ्रष्ट खऱ्या साधकाला आपण फसल्यासारखेच फसविण्याकरितां चिथावणीवरून मार्गाच्या कडेकडेनें फिरत असतात. तसे हे भ्रष्ट फार मायावी असतात. यांचें बोलणें-चालणें, यांची ठेवण फार मोहक असते. यांकडे मात्र साधकांनीं ढुंकूनहि पाहूं नये.

या इंद्रियांच्या हस्तकांतून स्त्री-साधकांना भुलविण्याकरितां म्हणून कांहीं पुरुष आणि पुरुष-साधकांना भुलविण्याकरितां म्हणून कांहीं स्त्रिया असे दोन प्रकार असतात. माणसें, ब्रह्मराक्षस, शाकिण्या, डाकिण्या, भूतपिशाच्च, अप्सरा इत्यादि इत्यादि निःस्पृह साधकांना भुलवितात. असे प्रयत्न करून करूनतेंच यांचें एक तप झालेलें असतें. आणि त्या मानानें त्यांना तशी सिद्धीहि लाभलेली असते; नाहीं असें नाहीं. यांचे मुग्ध करून टाकणारे हावभाव, 'बेमालूम' रीतीनें आपल्या जाळ्यांत गुंतविण्याचें तें नाटकी प्रेम, तें मृदु-मधुर मोह पाडणारें बोलणें, भपकेदार पोशाख, शरीराची आकर्षक ठेवण आणि इतर यांच्या शक्तियुक्तीचे प्रयोग एकीकडे आणि ओढ लावून वशीकरणाचे चाललेले इंद्रियांचे बलवान् प्रयोग दुसरीकडे — असें होऊन मूलतःच विषयी, चपळ असणाऱ्या फितूर विकारी मनाला आवरतां आवरतां सामान्य साधकाच्या नाकीं नऊ येतात. सारखें वारीत असतांनाहि

निसटून मन पुनः पुन्हा तिकडेच धांव घेतें, त्यांचेंच ध्यान करीत सुटतें. ही एक परीक्षाच असते. हीच संधि साधून दुष्ट देवदेवता आणि त्यांचे दुष्ट आराधक मांत्रिक या भुलभुलावणीला शक्यतों हातभार लावतातच. इंद्रियप्रेरक देवताहि त्यांना होकार देतातच.

मीं चौकस बुद्धीनें विचारलें असतां एका विघ्नदेवतेनें मला सांगितलेलें आठवतें. – 'आम्ही भ्रष्टविण्याच्या उद्देशानें जख्ख म्हाताऱ्यालाहि चेतना आणून त्यापुरता तरणाबांड बनवितों; म्हणजे नष्ट झालेली इंद्रियशक्तीहि निर्माण करतों. त्याला असह्य होईल इतकी इंद्रियाला चेतना आणतों. कुठेंहि लपून असला तरी नेमक्या वेळेला त्याला खेचल्यासारखें आणून निषिद्ध कर्म करावयास लावतों. यांतून आमच्या शक्तीपेक्षांहि त्याची शक्ति तत्त्वनिष्ठेमुळें अत्यधिक वाढली असल्यास मात्र आमचें कांहीं चालत नाहीं. शेवटपर्यंत आमचे प्रयत्न मात्र चाललेलेच असतात. आमचें चालो अथवा न चालो, प्रयत्न करण्याचें आम्ही शेवटपर्यंत सोडीत नाहीं.' 'बलिष्ठ गुरु असून, त्याची त्यानें सेवा करून कृपा मिळविली असल्यासहि तो गुरु धांवून येऊन आमची हकालपट्टी करतो,' असेंहि तिनें शेवटीं सांगितलें. यांच्या अशा जबरदस्तीनेंच कांहीं साधक अवश होऊन दीपपतंगन्यायानें पारमार्थिक जीवनाला मुकतात. तसें पाहूं गेलें तर कसल्याहि भोगादिकांची इच्छा होणार नाहीं, असें त्यांचें तें गलिच्छ रूप आहे. एकंदरींत या दुष्ट मायावी विघ्नदेवतांना जिंकण्याचें सामर्थ्य आल्याखेरीज परमार्थ सुखाचा होत नाहीं. सारखी ओढाताण चालूच असते. अशा प्रसंगीं साधकांनीं कसोशीनें, निर्धारानें दृढ, प्रखर प्रयत्न करून, आपल्या तत्त्वदृष्टीच्या गांभीर्यानें आणि आत्मनिष्ठेच्या शांतीनें लाजवून इंद्रियांना आणि त्यांच्या हस्तकांना खालीं माना घालून निराश होऊन मनगटें चावीत परत जाण्याचा प्रसंग ओढवून द्यावयाला पाहिजे. निःस्पृहांच्या अंगचें पाणी

त्यांना दाखवावयाला पाहिजे. 'हरलों आणि चुकलों' म्हणून त्यांचें नाक घांसवून घेऊन पुढें कोणत्याहि साधकांकडे त ढुंकूनहि पहाणार नाहींत अशी त्यांची खोड मोडून त्या सर्वांना दहशत बसवावयाली पाहिजे. यांचें रान सोडून परमार्थमार्गावर सुंदर आश्रम निर्माण करावयाला पाहिजे.

'यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः। इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः॥ तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः। वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥' (भ. गी. २—६०, ६१) 'ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते। आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः॥' (भ. गी. ५—२२) बुद्धिमान् साधक पुढचें भविष्य ओळखून आपला यांत नाशच आहे म्हणून मनाला आवरतोच. एवढ्या अशा या ओढाळ इंद्रियांना आणि यांना सामील असलेल्या चंचल मनालाहि दाद न देतां आपलें हित साधण्याच्या अढळ दृष्टीनें कोणाचेंहि चालूं न देतां त्या सर्वांचीच खोड मोडून खरोखरच योग्य अधिकारी साधक — भगवान् म्हणतात — 'तत्स्वरूपभूत अशा माझ्याकडेच धांव घेतो, मत्परायण होतो, स्वरूपनिष्ठच असतो.' खरें सांगावयाचें झाल्यास इंद्रियांच्या ओढीला जो बळी पडत नाहीं, त्यालाच आपल्या हिताची खरी दृष्टि आली. परमार्थाचें त्यालाच एक महत्त्व समजलें. त्यालाच आत्मानंदाचें निरतिशयत्व पटलें. त्याचीच एक बुद्धि स्वरूपनिष्ठेंत स्थिर राहिली, असें समजावें. हा एक आत्मनिष्ठेचा कस आहे. ही एक खऱ्या साधकाची परीक्षा आहे.

## तो आनंदरूपच तूं आहेस

'विषईं वैराग्य उपजलें। तयासीच पूर्ण ज्ञान जालें। मणी टाकितांचि लाधलें। राज्य जेवीं॥' (दा. ५—६—६१) ज्याची कल्पना निमाली तो पुरुष 'आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु। बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः

अनुक्र. 303358 विभाग आ. आ. 2508

प्रग्रहमेव च । इन्द्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।' (क. उ. अ. १ व ३. ३–४ ) श्रुतिमाता प्रेमानें कुरवाळून साधकाला सांगते, 'बाळ, तूं ज्या रथांत बसला आहेस तो रथ म्हणजे हा देह. तुझी सदसद्विवेक शक्ति-बुद्धि हा रथ-हांकते; म्हणजे बुद्धि सारथी आहे. हिच्या हातांत असलेला लगामच मन. या रथाला लावलेले मोठे उद्दाम घोडे म्हणजेच हीं इंद्रियें. साहजिक विषयाकडे असणारी यांची धांव चुकवून तुला ब्रह्म-रूपाच्या वैराग्य-मार्गानें यांना न्यावयाचें आहे. त्याकरितां तुझा विचार सारथ्याला कळवून, मनाचा लगाम घट्ट आवळायला लावून, इंद्रियें तुझ्या इच्छेप्रमाणें वागतील असें त्यांना वळवून तुझें उद्दिष्ट मोठ्या शिताफीनें पार पाड. ब्रह्मस्वरूपाकडे जा. 'यस्तु विज्ञानवान्भवति स मनस्कः सदा शुचिः । स तु तत्पदमाप्नोति यस्माद्भूयो न जायते ॥ विज्ञान-सारथिर्यस्तु मनः प्रग्रहवान्नरः । सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदम् ॥' (क. उ. अ. १ व उ. ३. ८–९ ) ज्याची बुद्धि आत्मज्ञानपूर्ण आहे, ज्याचें मन शुद्ध होऊन आत्मध्यानासक्त झालें आहे, तो जन्ममरणात्मक वैषयिक मार्गाच्या पार पलीकडे असणाऱ्या पुनर्जन्म-शून्य परमपदाकडे वेगानें रथ न्यावयाला लावून तेथेंच स्थिर होतो. हेंच तें ब्रह्मपद. हेंच विष्णुपद. हेंच आत्मपद. 'इंद्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः । मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान्परः ॥ महतः परमव्यक्त-मव्यक्तात्पुरुषः परः । पुरुषान्न परं किंचित्सा काष्ठा सा परागतिः ॥' (क. उ. अ. १ व. ३।१०–११ ) विषयांच्याकरितांच इंद्रियें असल्यामुळें इंद्रियांपेक्षां विषय श्रेष्ठ, विषयांपेक्षां मन, मनापेक्षां बुद्धि, बुद्धीपेक्षां महत्तत्त्व, महत्तत्त्वापेक्षां अव्यक्त, अव्यक्तापेक्षां पुरुष श्रेष्ठ. पुरुषापेक्षां मात्र दुसरें कोणीहि मोठें नाहीं. 'पुरुष एवेदं सर्वं ।' (पु. सू. ) तोच हें सर्व आहे, असें पराकाष्ठेचें आनंदरूपच जर तूं जाणलेंस, तर तें तुझें आणि या अखिल जगाचें यथार्थ रूप आहे.

'श्रद्धत्स्व।' श्रद्धा ठेव. 'यत्परं ब्रह्म सर्वात्मा विश्वस्यायतनं महत्। सूक्ष्मात्सूक्ष्मतरं नित्यं तत्त्वमेव त्वमेव तत्॥' (कै. उ. १६) जें अतिसूक्ष्म, संविन्मात्र आनंदरूप, या विश्वांतल्या सर्व सुखाचें खरें आधारभूत आहे तें सर्वात्मरूप असल्यामुळें तुला सोडून नाहीं. तें आनंदरूप ब्रह्मच तूं आहेस. शंका न धरतां अखिल जगाचा आनंदच तूं होऊन निरंकुश नांद. 'ॐ यो ह वै श्रीपरमात्मा नारायणः स भगवाँतत्परः परमपुरुषः पुराणपुरुषोत्तमो नित्यशुद्धबुद्धमुक्तसत्य-परमानन्ताद्वयपरिपूर्णः परमात्मा ब्रह्मैवाहं रामोऽस्मि।' (तारसारोप. ३–८). ॐकारलक्ष्य जो परमात्मा श्रीमान् नारायण, भगवान्, मायेहून पर परमपुरुष, पुराणपुरुषोत्तम, नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सत्य परम अनंत, अद्वय, आनंदरूप तो परमात्मा, तो राम, तें परब्रह्म मीच – ही जाणीव ठेव. 'भूर्भुवः सुवस्तस्मै वै नमो नमः।' (श्रीराम उ. ता. १). म्हण – तुझें अस्तित्व, भातित्व, प्रियत्व, त्या मूळच्या सच्चिदानंदरूपीं, नमो नमः म्हणून, एकरूप करून टाक. 'सोऽहंभावो नमस्कारः।' सोऽहंभाव म्हणजेच नमस्कार. आतां स्वस्थ ऐस. अभय आनंद-मात्रच तूं. तुझ्या चिंतनानें इतर प्रारंभींच्या साधकांची भीति नाहींशी होत जाईल. 'देखतां मृगजळाचे पूर। म्हणे कैसा पावों पैलपार। कळतां तेथींचा विचार। सांकडें कैचें॥' (दा. ८–८–४५). स्वरूप-निष्ठेनें जे, या आपल्या अज्ञानानें केवळ भासणाऱ्या मायानदीच्या उगमा-पलीकडे गेले, आनंदस्वरूपांत एकरूप झाले आणि मग पोहून आलेली नदी किती मोठी आहे पहावें म्हणून त्यांनीं मागें वळून पाहिलें–'तंव तें पाणीच आटलें। कांहीं नाहीं॥' (दा. ११–७–२१). 'आहे तितुकें नाहीं जालें। नाहीं नाहींपणें निमालें। आहे नाहीं जाऊन उरलें। नसोन कांहीं॥ (दा. ६–१०–३८). वृत्तिसून्य योगेश्वर। याचा पाहावा विचार। दास म्हणे वारंवार। किती सांगों॥' (दा. ११–७–२२).

महाराज, आतां सांगणें पुरे. आमचा निश्चय झाला. आम्ही नित्य, निर्विकार, अद्वितीय आनंदरूपच आहोंत.

जय जय रघुवीर समर्थ ।

श्रीसद्गुरु समर्थ रामदासस्वामी महाराज की जय ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम 30337
विभाग बा. वा.
क्रमांक 2408
नों. दि. 8-1-51

म. ग्रं. सं. ठाणे. बालवाङमय शाखा.
ग्रा. क्र. ८९९७ नों दि
वि. बा. वा.

IRBK-0108997

IRBK-0108997

भगवान् श्रीमत् प. प. श्रीधरस्वामी महाराज यांचा परिचय आतां महाराष्ट्राला तरी कांहीं नव्यानें करून द्यावयास नको. शुद्ध परमार्थाची परमपावन गंगा त्यांच्या मुखांतून आणि लेखणींतून अखंड स्रवत असते हें आतां जिज्ञासूंना चांगलें माहीत झालेलें आहे. प्रस्तुत 'मोक्ष-संदेश' हा लहानसा ग्रंथ त्या गंगौघांतून निघालेला एक लहानसा झरा. तो दिसावयाला लहान असला तरी आपल्यापरी परिपूर्ण आहे. निःस्पृह विरक्त साधकांना तर ती एक समर्थ-संजीवनीच लाभल्यासारखें वाटेल.

श्रीस्वामी महाराजांनीं यापूर्वीं परमार्थ-भक्तिपर असे अनेक उत्तमोत्तम व मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवलेले आहेत. ते प्रसिद्ध होऊन आपल्या हातीं केव्हां पडतील अशी अनेक जिज्ञासू साहजिकच वाट पहातांना दिसतात. त्यांची ती अपेक्षा लवकरच पूर्ण होवो अशी श्रीचरणीं प्रार्थना आहे.

• • •

*श्रीमत् श्रीधरस्वामी महाराज यांचें कांहीं प्रकाशित साहित्य :*

**आर्य संस्कृति :** *( पहिली आवृत्ति संपली; नवी सुधारलेली आवृत्ति तयार होत आहे. )*

**शिवशान्तस्तोत्रतिलकम् :** *संस्कृत काव्य मराठी अर्थासह : ७५ न.पै.*

**श्रीरामपाठ, श्रीसमर्थपाठ** व **श्रीमारुतिमाहात्म्य :** स्तोत्रें : ५० न.पै

*श्रीस्वामी महाराजांच्या चरित्राचा पहिला भागहि प्रसिद्ध झाला*

**श्रीधरस्वामी महाराज :** *पहिला भाग — साधना : रु. १-५०*

*( १ ) समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, पो. परळी, जि. सातारा.*
*( २ ) समर्थ सेवा मंडळ, १९० मंगळवार पेठ, सातारा शहर.*